जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार १२ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

अवघ्या १६व्या वर्षी गीत बागडेचा सलग तीन आठवडे 'परफॉर्मन्स ऑफ द वीक'

यवतमाळ : जिद्द, मेहनत आणि संगीतावरील निस्सीम प्रेमाच्या बळावर यवतमाळच्या गीत प्रशांत बागडे हिने वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी देशातील प्रतिष्ठित 'सारेगामापा २०२६' या गायन रियालिटी शोमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. झी टीव्हीच्या या पर्वात महाराष्ट्रातून निवड झालेली एकमेव गायिका म्हणून गीतने यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

एअर इंडियाच्या कोलकाता-मुंबई विमानाला हायजॅकची धमका

कोलकाता-एअर इंडियाच्या कोलकाता-मुंबई विमानातील शौचालयात बुधवारी सकाळी अपहरणाची धमकी देणारी एक चिठ्ठी सापडली. त्यात सकाळी ११:१० वाजता विमानाचे अपहरण केले जाईल असे म्हटले होते. वैमानिकाने तात्काळ एटीसीला माहिती दिली. त्यानंतर विमान कोलकाता विमानतळावरील आयसोलेशन बेमध्ये वळवण्यात आले आणि सुरक्षा यंत्रणांनी तपास सुरू केला. हे विमान कोलकाताहून मुंबईला जात होते.

भाजपा खासदाराचे वादग्रस्त विधान

शेतकरी 3 महिने काम करतात व ९ महिने पत्ते खेळून दारू पितात

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- 'शेतकरी वर्षातील केवळ तीन महिनेच शेतात राबतात आणि उरलेले नऊ महिने पत्ते खेळणे, गुटखा खाणे, दारू पिणे व गांजा ओढणे यात घालवतात,' असे वादग्रस्त विधान करणारे मध्य प्रदेशातील रेवा मतदारसंघाचे भाजपा खासदार जनार्दन मिश्रा यांनी अखेर जाहीर माफी मागितली आहे. चौफेर टीकेची झोड उठल्यानंतर त्यांनी स्पष्टीकरण देत म्हटले, 'शेतकऱ्यांचा अपमान करण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता, माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला.'

मऊगंज जिल्ह्यातील एका गोवर्धन पूजा कार्यक्रमात सोमवारी



बोलताना मिश्रा यांनी हे विधान केले होते. या भाषणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. व्हिडीओमध्ये खासदार मिश्रा शेतकऱ्यांना उद्देशून म्हणताना दिसत आहेत की, आजचा शेतकरी केवळ तीन महिने काम करतो. उरलेले नऊ महिने तो पत्ते खेळणे, गुटखा खाणे, दारू पिणे आणि जय भोले म्हणण्यातच वाया घालवतो. आजच्या शेतकऱ्यांना आरामाची सवय लागली असून ते पूर्वीसारखे कष्ट करत नाहीत, असा दावाही त्यांनी या भाषणात केला होता.

काँग्रेस आणि शेतकरी संघटना आक्रमक- खासदारांच्या या विधानावर शेतकरी संघटना आणि काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला आहे. राष्ट्रीय किसान मजदूर महासंघाने मिश्रा यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली. काही शेतकऱ्यांनी त्यांच्याविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यासाठी धाव घेतली. राष्ट्रीय किसान मजदूर संघटनेचे मऊगंज जिल्हाध्यक्ष नरेंद्र सिंह यांनी खासदारांच्या ➪(पान २ वर)

राज्यात थंडीचा कडाका वाढणार

मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्रातील वातावरणात आता लक्षणीय बदल जाणवू लागले आहेत. भारतीय हवामान विभागाने १२ नोव्हेंबर रोजी राज्याच्या हवामानाचा नवा अंदाज वर्तवला आहे. या अंदाजानुसार, राज्यातील सर्व पाचही विभागांमध्ये हवामान पूर्णपणे कोरडे राहण्याची शक्यता आहे. दिवसा उन्हाचा कडाका असला तरी, रात्री आणि पहाटेच्या तापमानात मोठी घट होत असल्याने राज्यात थंडीची चाहूल लागली असून लवकरच गारठा आणखी वाढण्याची शक्यता आहे.



हवामान खात्याच्या माहितीनुसार, कोकण विभागातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे राहील. येथे दिवसा उष्ण आणि दमट वातावरण असेल, तर संध्याकाळनंतर आणि पहाटे हवेत गारवा निर्माण होईल. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्येही दिवसा उन्हाचा प्रभाव कायम राहील. मात्र, रात्रीच्या तापमानात घट झाल्यामुळे पहाटे चांगलीच थंडी जाणवू शकते. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये रात्रीच्या किमान तापमानात घट अपेक्षित आहे. तापमानात मोठे बदल नसले तरी विशेषतः या भागातील ग्रामीण परिसरामध्ये थंडीचा प्रभाव जास्त जाणवेल. दुसरीकडे, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे राहणार आहे. येथे दिवसा उन्हाची तीव्रता अधिक असली तरी रात्री आणि पहाटे गारठा वाढल्याने नागरिकांना थंडीचा अनुभव येईल. विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया या दहा जिल्ह्यांमध्ये दिवसाच्या कमाल तापमानात किंचित वाढ होण्याची शक्यता आहे; मात्र रात्रीच्या तापमानातील घट कायम राहणार आहे. एकंदरीत, नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावर संपूर्ण राज्यात थंडी हळूहळू आपला जम बसवत असून, रात्री आणि पहाटेच्या तापमानातील घसरणीमुळे आगामी दिवसांत थंडीचा जोर अधिक वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

देवगिरीवरील सीसीटीव्ही फुटेज शोधू न शकणारे सरकार 'निरुपयोगी'

दादांच्या मृत्यूच्या CBI चौकशीची मागणी

अकोला/प्रतिनिधा : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे. या प्रकरणातील महत्त्वाचा पुरावा असलेले देवगिरी निवासस्थानावरील सीसीटीव्ही फुटेज शोधू न शकणारे सरकार 'निरुपयोगी' असल्याची जोरदार टीका त्यांनी केली आहे.



तसेच, मृत्यूला नऊ महिने उलटूनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सीबीआय चौकशी का केली नाही, असा सवाल त्यांनी विचारला आहे.म्हैसपूर येथील स्वतःच्या शेतात आयोजित करण्यात आलेल्या 'बळी महोत्सव' या कार्यक्रमात शेतकऱ्यांसमोर बोलताना मिटकरी यांनी हे गंभीर आरोप केले. अजितदादांचे मित्र म्हणवून घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांवर त्यांनी थेट निशाणा साधला. यासोबतच अजित पवारांचा अपघात नसून घातपात झाल्याच्या दाव्याचा त्यांनी पुन्हा एकदा पुनरुच्चार केला. मृत्यूबाबत संशय व्यक्त करताना मिटकरी यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. आदल्या दिवशी रस्ते मार्गाने जाण्याचे निश्चित झालेले असताना, अजित पवारांना तो निर्णय ऐनवेळी बदलायला लावणारे कोण होते? शेवटच्या क्षणी विमान प्रवासाचा सल्ला कोणी दिला? तसेच विमानाचे पायलट आणि 'क्रू मेंबर्स' बदलवणारे कोण आहेत, असे सवाल त्यांनी केले.

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाला सुनेत्रा पवारांचाच विरोध

मुंबई/प्रतिनिधी- राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चेला सध्या वेग आला असला, तरी या प्रक्रियेत मोठी अडचण निर्माण झाली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनीच पक्षावरील नियंत्रण सुटण्याच्या भीतीने या विलिनीकरणाला विरोध दर्शवला आहे. त्यामुळे सध्या ही प्रक्रिया थांबली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या या राजकीय चर्चेला अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी हवा दिली आहे. त्यातच आज अजित पवार गटाचे आमदार शरद पवार यांची भेट घेणार असल्याने



घडामोडींना वेग आला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाची धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे आली होती. मात्र, आता पक्ष पुन्हा नियंत्रणात आणून एकजूट टिकवण्यासाठी शरद पवार सक्रिय झाल्याचे सांगितले जात आहे.'इंडियन एक्सप्रेस'च्या वृत्तानुसार, संसदेत आपली स्थिती भक्कम करून विरोधकांना कमकुवत करण्यासाठी भाजपला शरद पवार व त्यांच्या लोकसभा खासदारांचे समर्थन हवे आहे. याच अनुषंगाने प्रफुल्ल पटेल यांनी रुग्णालयात जाऊन शरद पवार यांच्याशी दीड तास चर्चा केली. या दोन्ही नेत्यांमध्ये पुन्हा भेट होणार असल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत.

विलिनीकरणानंतर वर्चस्व संपेल, या चिंतेतून सुनेत्रा पवार आणि त्यांचे पुत्र पार्थ पवार यांनी या प्रक्रियेला विरोध केला आहे. शरद पवार आपली धर्मनिरपेक्ष विचारधारा सोडून मोदी-शाहांच्या नेतृत्वाखाली काम करतील का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. दुसरीकडे, दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक ➪(पान २ वर)

उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र येणार?

गुलाबराव पाटलांच्या विधानाने उडवली खळबळ

मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्राच्या राजकारणात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू असतानाच, आता उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. काल शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांची अचानक भेट घेतली. या भेटीनंतर नव्या राजकीय समीकरणांची चर्चा रंगली असून, आता शिंदे गटाचे नेते गुलाबराव पाटील यांनीही सूचक विधान करत या शक्यतेला बळ दिले आहे.



उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे खरोखरच एकत्र येणार का, असा थेट प्रश्न गुलाबराव पाटील यांना विचारण्यात आला होता. यावर तो शक्यता न फेटाळता त्यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. 'मी यावर काही सांगू शकत नाही. शेवटी मी एक आगगाडीचा डबा आहे आणि आमचे एकनाथ शिंदे हे ➪(पान २ वर)

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेदरम्यान सुनील तटकरेंनी घेतली फडणवीसांची भेट

मुंबई/प्रतिनिधी- राज्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चांना उधाण आले असतानाच, नव्या राजकीय घडामोडींनी लक्ष वेधून घेतले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी आज दुपारी साडेबारा वाजता 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दिवाळीच्या निमित्ताने ही सदिच्छा भेट असल्याचे सांगितले जात असले तरी, सध्या सुरू असलेल्या विलिनीकरणाच्या पार्श्वभूमीवर या संवादाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.अजित पवार यांच्या राष्ट्रवादी



काँग्रेसमधील आमदारांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितल्याची माहिती समोर आल्याने नव्या राजकीय भूकंपाची चर्चा सुरू झाली आहे. याच वातावरणात, मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यापूर्वी मंगळवारी सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांचीही भेट घेतली होती. या दोघांमध्ये तब्बल दीड तास चर्चा झाली. सुनेत्रा पवारांसोबतच्या या प्रदीर्घ चर्चेनंतर लगेचच तटकरे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. दुसरीकडे, राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' निवासस्थानी जाऊन भेट घेतली आणि त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मुंडे यांनी मराठवाड्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली.

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. या चर्चा सुरु असतानाच विविध नेतेमंडळींच्या भेटीगाठी होताना दिसत आहेत. या भेटीगाठी सुरु असतानाच शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले. 'दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या घातपातात ➪(पान २ वर)

ना भाजपा, ना सपा...उत्तर प्रदेशच्या राजकारणात तिसरी आघाडी?

लखनौ/वृत्तसंस्था- उत्तर प्रदेशच्या राजकारणात मोठा बदल होताना दिसत आहे. आतापर्यंत २ आघाड्यांमध्ये यूपी विधानसभा २०२७ मध्ये लढाई होईल असं चित्र दिसत होते. परंतु आता असदुद्दीन ओवैसी यांची ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) आणि चंद्रशेखर आजाद यांची आजाद समाज पार्टी यांच्यात आघाडी होण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात तिसरी आघाडी बनल्याने सर्वात जास्त डोकेदुखी विरोधी पक्ष अखिलेश यादव यांची होणार आहे. AIMIM-ASP मिळून १५० जागांवर उमेदवार उतरण्याचा निर्णय घेण्यात आल्याचं बोलले जाते. त्याचा निवडणुकीवर मोठा परिणाम पाहायला मिळू शकतो.





अखिलेश यादवांची वाढणार डोकेदुखी

मुस्लीम-दलित समीकरण बांधून हे दोन्ही नेते इतर राजकीय पक्षांसमोर आव्हाने उभी करू शकतात.

कोणत्या जागांवर लढणार तिसरी आघाडी?

AIMIM-ASP आघाडी पश्चिम उत्तर प्रदेश, पूर्वांचल आणि तराई प्रदेशातील मुस्लिम-दलितबहुल जागांना लक्ष्य करण्याची शक्यता आहे. असदुद्दीन ओवैसी हे पश्चिम उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर, सहारनपूर, बिजनौर, मेरठ, रामपूर, बरेली, मोरादाबाद आणि कैराना यांसारख्या भागांमध्ये सातत्याने सक्रिय आहेत. चंद्रशेखर आझाद यांनीही बागपत, बिजनौर, आग्रा, रामपूर आणि मोरादाबाद यांसारख्या ➪(पान २ वर)


वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

चंद्रपूर : शेतात रोजीरोटीसाठी काम करत असतानाच दबा धरून बसलेल्या वाघाने महिलेवर अचानक झडप घातली. या भीषण हल्ल्यात संगीता पेडुकार (५५) यांचा जागीच मृत्यू झाला. बुधवारी दुपारी मूल तालुक्यातील ताडाळा परिसरात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.संगीता पेडुकार या बुधवारी दुपारी शेतात काम करीत होत्या. यावेळी अचानक आलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. वाघाच्या तावडीत सापडलेल्या संगिता यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत शेतात काम करणाऱ्या अन्य महिलांनी आरडाओरड करून वाघाला पळवून लावले. मात्र, तोपर्यंत संगीता यांचा जीव गेला होता.घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे ताडाळा आणि परिसरातील गावांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या महिला आणि शेतमजुरांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे.

ऑस्करला जाईल म्हणत आधी कौतुक केलं अन् आता...;

'रामायण' पाहून भडकले नितीश भारद्वाज, सुनावले खडेबोल

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिग्दर्शक नितीश तिवारी यांचा 'रामायण' चित्रपटाची सध्या मनोरंजनविश्वात जोरदार चर्चा सुरू आहे. भव्य सेट, दमदार व्हीएफएक्स आणि कलाकारांची मोठी फौज यामुळे या चित्रपटाकडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत.दरम्यान, हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई करत असा तरी या पौराणिक सिनेमावरून सुरू झालेला वाद काही थांबण्याचा नाव घेताना दिसत नाही. आता या चित्रपटाबद्दल 'महाभारत' मालिकेत भगवान कृष्णाची भूमिका साकारून घराघरात पोहोचलेले नितीश भारद्वाज यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आहे.विशेष म्हणजे, ट्रेलर पाहिल्यानंतर नितीश यांनी चित्रपटाचं कौतुक केलं होतं आणि चित्रपटाला ऑस्कर मिळणार असं वक्तव्यही केलं होतं. मात्र, आता संपूर्ण चित्रपट पाहिल्यानंतर त्यांनी जाहीरपणे निराशा



व्यक्त केली आहे. नितीश भारद्वाज यांनी सोशल मीडियावर एक भलीमोठी पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्यांनी रामायण पाहिल्यानंतरची आपली प्रतिक्रिया लिहिली आहे. त्यांच्या मते, चित्रपटात प्रशंसा करण्यासारखं काहीच नाही.या पोस्टद्वारे त्यांनी 'रामायण' मधील रावणाच्या व्यक्तिरेखेवर आक्षेप घेतला आहे. रामायण ही केवळ एक कथा नाही, तर ते भारताच्या संस्कृतीचा आणि आध्यात्मिक विचार आणि सभ्यतेचा एक महत्त्वाचा भाग आहे, असं त्यांनी या पोस्टमध्ये नमुद केलं आहे.त्यांचा म्हणण्यांनुसार, चित्रपटात रावणाला ज्या प्रकारे चित्रित केलं आहे, त्यामुळे रामायणाची मूळ शिकवण आणि नैतिक मूल्ये बदलतात.

रावणाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह -नितीश यांनी आपल्या या पोस्टमध्ये लिहिलंय, 'चित्रपटाबद्दल केलेली माझी सुरुवातीची प्रशंसा मागे घेतो.'माझ्याकडे त्याबद्दल एकही चांगली गोष्ट सांगण्यासारखी नाही. केवळ नेत्रदीपक व्हीएफएक्स दाखवून एखाद्या महाकाव्याचा खरा आत्मा, विचार आणि आध्यात्मिक खोली व्यक्त करता येत नाही.' असं म्हणत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी पुढे म्हटलंय, 'आपला सांस्कृतिक वारसा जबाबदारीने सादर केला पाहिजे. त्यांच्या मते, जर एखाद्या चित्रपटाची कथा भारताचा इतिहास, संस्कृती आणि आध्यात्मिक मूल्ये चुकीच्या पद्धतीने मांडत असेल, तर त्या चित्रपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय सिनेमाचं प्रतिनिधित्व करू नये, असंही त्यांनी म्हटलं आहे.



राज्यात विजेचे चार संच बंद; उरण गॅस प्रकल्पही ठप्प!

नागपूर : राज्यातील विजेची मागणी सध्या घटल्याने वीजपुरवठ्याचे संकट तूर्त टळले आहे. मात्र, महानिर्मितीचे चार संच बंद असून उरण गॅस वीज प्रकल्पातूनही वीजनिर्मिती होत नाही. सध्या मागणी कमी असल्याने त्याचा फारसा परिणाम जाणवत नसला, तरी उन्हाचा कडाका वाढून विजेची मागणी पुन्हा ३० हजार मेगावॉटच्या आसपास पोहोचल्यास उपलब्ध वीजनिर्मिती क्षमतेवर ताण येण्याची शक्यता आहे.



paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

सोनियांनी पुस्तकात लिहिले- राजीव यांच्या हत्येची भीती होती

राहुल म्हणाले होते- सुरक्षा वाढवली नाही तर अमेरिकेतून अंत्यसंस्कारासाठी यावे लागेल



खान मार्केटमध्ये सोनिया गांधींचे पुस्तक बाहेरील भागात प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे
अनेक पुस्तकांच्या दुकानांमध्ये सोनिया गांधींचे पुस्तक विशेष कोपऱ्यात प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- सोनिया गांधी यांनी त्यांच्या 'बिलॉंनिंग: अ जर्नी ऑफ लव्ह' या पुस्तकात लिहिले आहे की, राहुल यांना वडील राजीव यांच्या हत्येची भीती होती. मार्च १९९१ मध्ये अमेरिकेला परत जाण्यापूर्वी राहुल यांनी म्हटले होते की, वडिलांची सुरक्षा वाढवली नाही तर लवकरच त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी घरी यावे लागेल. सोनिया यांच्या मते, त्यावेळी राजीव गांधी यांच्या जीवाला असलेला धोका सातत्याने वाढत होता; मात्र त्यांच्या सुरक्षेची व्यवस्था कमकुवत करण्यात आली होती. पंतप्रधानपद सोडल्यानंतरही धोका कमी झाला नव्हता. असे असूनही त्यांना पूर्वीसारखी सुरक्षा मिळत नव्हती.

सोनिया यांचे पुस्तक 'बिलॉंनिंग: अ जर्नी ऑफ लव्ह' मंगळवारी बाजारात आले. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील छायाचित्र राजीव गांधी यांनी १९६६ मध्ये काढले होते. राहुल यांनी बिहार दौऱ्यात वडिलांच्या सुरक्षेतील त्रुटी पाहिली होती.सोनिया लिहितात की, मार्च १९९१ मध्ये ईस्टरच्या सुट्टीदरम्यान राहुल अमेरिकेतून घरी आले होते. त्या वेळी ते शिक्षणासाठी अमेरिकेत होते. त्यांनी आपल्या वडिलांसोबत बिहार दौऱ्यावर जाण्याचा हट्ट धरला. या दौऱ्यात राहुल यांनी जे पाहिले, त्यामुळे ते हैराण झाले. राजीव ज्या खुल्या जीपमधून प्रवास करत होते, त्यावर विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दगड आणि विटांचा वर्षाव केला. हे सर्व स्थानिक पोलिसांच्या उपस्थितीत घडत होते, मात्र पोलिस कर्मचारी मूकदर्शक बनून राहिले. त्यांनी राजीव यांना वाचवण्यासाठी किंवा हल्ले थांबवण्यासाठी काहीही केले नाही. १९८४ मध्ये ३ दहशतवादी संघटनांकडून धोका होता, १९९० पर्यंत आणखी अनेक संघटना समोर आल्या. सोनिया लिहितात की, १९८४ मध्ये पंतप्रधान बनण्याच्या वेळी राजीव गांधी यांना ३ दहशतवादी संघटनांकडून धोका होता. १९९० पर्यंत अशा आणखी अनेक कट्टरतावादी संघटना समोर आल्या होत्या, ज्यांच्या निशाण्यावर राजीव हे सर्वांत प्रमुख व्यक्ती होते. अधिकाऱ्यांनाही या धोक्यांची माहिती होती. सोनिया यांच्या मते, डिसेंबर १९९० मध्ये झालेल्या एका समितीच्या बैठकीत राजीव यांना मिळणारी स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप सुरक्षा सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. धोक्याचे नव्याने मूल्यांकन केल्यानंतर त्याची गरज भासली, तरच त्यात बदल केला जाईल, असे ठरले होते. मात्र, व्ही. पी. सिंह सरकारने पुढच्याच महिन्यात एड्ज सुरक्षा काढून घेतली. राजीव यांच्या जवळच्या सुरक्षेसाठी खास प्रशिक्षण घेतलेल्या सुरक्षा दलाऐवजी स्थानिक पोलिसांना तैनात करण्यात आले. व्ही. पी. सिंह आणि चंद्रशेखर यांच्याकडे सुरक्षा वाढवण्याची मागणी केली होती.सोनिया लिहितात की, काँग्रेस पक्षाने व्ही. पी. सिंह आणि चंद्रशेखर या दोन्ही पंतप्रधानांकडे राजीव यांची सुरक्षा वाढवण्याची मागणी केली होती; मात्र ती मागणी दुर्लक्षित करण्यात आली.

राजीव जेव्हा दौऱ्यावर जात असत, तेव्हा त्यांच्यासोबत फक्त एक वैयक्तिक सुरक्षा अधिकारी असायचा. तोही एक पोलीस कर्मचारी होता. नंतर आलटून-पालटून दोन पोलीस कर्मचारी त्यांच्यासोबत राहू लागले. त्यांच्याकडे फक्त एक पिस्तूल असायचे. सोनिया यांच्या मते, देशातील कोणत्याही राज्याच्या पोलिसांना एखाद्या मोठ्या राजकीय व्यक्तीला सुरक्षा देण्यासाठी ना विशेष प्रशिक्षण मिळाले होते, ना आवश्यक साधनसामग्री होती. सोनिया लिहितात की, राजीव यांच्या विरोधकांनी सुरक्षा कमी करून त्यांना दबावाखाली आणता येईल असे वाटत असेल, तर ते चुकीचे होते. मात्र, सोनिया आणि प्रियंका सतत त्यांच्या सुरक्षेबाबत चिंतित असायच्या. राजीव एखाद्या दौऱ्यावरून सुरक्षितपणे घरी परत येईपर्यंत त्या दोघींनाही चैन पडत नसे.

'बिलॉंगिंग..'बद्दल सोनिया यांनी काय म्हटले आहे- सोनिया गांधी यांनी पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांनी आपल्या आयुष्याची कहाणी लिहिण्याचा निर्णय का घेतला, हे सांगितले आहे. त्यांनी म्हटले आहे की, हे राजकीय पुस्तक नसून त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची आणि कुटुंबाची कहाणी आहे. त्यांनी आपल्या कुटुंबाला ज्या रूपात पाहिले आणि ज्या प्रकारे त्यांच्यावर प्रेम केले, त्याच रूपात ते दाखवायचे होते. कुटुंबातील सदस्यांबद्दल बरेच काही लिहिले गेले आहे; मात्र त्यांचा स्वभाव, संघर्ष आणि भावना समजून घेण्याचा प्रयत्न फार कमी झाला. सोनिया लिहितात की, त्यांनी आपले वैयक्तिक जग लोकांपासून दूर ठेवले. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या हत्येनंतरच्या दुःखाने त्यांना राजकारणात आणले; मात्र त्यांनी आपले खासगी आयुष्य जपून ठेवण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या आयुष्याबद्दल मोकळेपणाने लिहिणे त्यांना जवळजवळ अशक्य वाटत होते. आता सार्वजनिक जीवनातील धावपळीपासून दूर राहून त्यांना आपल्या कहाणीचा मागे वळून विचार करण्याची संधी मिळाली. त्यांना भारतात घालवलेल्या पाच दशकांहून अधिक काळाचा अनुभवही शेअर करायचा होता. त्यांनी लिहिले की, या काळात त्यांनी देश बदलताना पाहिला. सुरुवातीला त्या हा बदल दूरून पाहत होत्या, पण नंतर स्वतःच त्याचा एक भाग बनल्या. हे पुस्तक त्याच प्रवासाची आणि ज्या देशाला त्यांनी आपले घर मानले, त्या देशाची कहाणी आहे.



फटाके फोडणाऱ्या टवाळखोरांकडून थेट महिला आयपीएस अधिकाऱ्याला मारहाण

मुदतीनंतर फटाके फोडताना घडली घटना

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- यंदाच्या दिवाळीत फटाके फोडण्याच्या कारणावरून देशभरात अनेक अप्रिय घटना घडल्याचे समोर आले आहे. फटाके हाताळताना लहान मुलांसह प्रौढांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागण्याच्या घटना घडल्या. तसेच फटाके फोडण्याच्या कारणावरून अनेक ठिकाणी हिंसक घटना घडल्या असून हत्येसारखे प्रकार घडले आहेत. ओडिशामध्ये तर एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. फटाके फोडण्यापासून रोखत असताना काही टवाळखोरांनी थेट महिला आयपीएस अधिकाऱ्यालाच धक्काबुक्की करत मारहाण केली. या प्रकरणी आता पोलिसांनी चार जणांना अटक केली असून इतरांचा शोध सुरू आहे.ओडिशाच्या कटक येथील नयासडक परिसरात ही घटना घडली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. परवानगी दिलेल्या वेळेनंतरही काही स्थानिक लोक फटाके फोडत होते. त्यांना रोखण्यासाठी पोलीस गेले असता हा प्रकार घडला. ओडिशा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने रविवारी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत फक्त दोन तासांसाठी फटाके फोडण्याची परवानगी दिली होती. त्यानंतरही काही लोक फटाके फोडत होते.

या परिसरातील मुख्य रस्त्यावर रात्री साडे दहा वाजेपर्यंत काही लोक फटाके फोडत होते. यामुळे याठिकाणाहून प्रवास करणाऱ्या लोकांना याचा त्रास होत होता. या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस आयुक्त अनन्या अवस्थी या पोलिस ताफ्यासह घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी फटाके फोडणाऱ्या लोकांना थांबविण्याचा प्रयत्न केला. यावेळी स्थानिक आणि पोलिसांमध्ये खडाजंगी झाली ज्यानंतर स्थानिकांच्या गटाने पोलिसांवर हल्ला केला.

पान १ व १० वरून

मोर्शीत ३५ लाखांचा गुटका

मोठा साठा आढळल्याने पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले. शाहरुख खान सर्फराज खान (वय ३२, रा. आवेजनगर, अमरावती) असे त्याचे नाव आहे. चौकशीदरम्यान शाहरुख खान याने हा गुटखा जावेद सेठ ऊर्फ जावेद हारून सुपारीवाला (रा. बडनेरा) याच्या पांढुर्णा येथील गोदामातून घेतल्याचे सांगितले. हा साठा चांद खान ऊर्फ चांदभाई याच्या गोदामात उतरविण्यात येणार असल्याची माहितीही त्याने दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यामुळे या कारवाईतून केवळ वाहतूक करणारा चालकच नव्हे, तर गुटख्याच्या साठवणुकीशी आणि वितरणाशी संबंधित व्यक्तींचे धागेदोरेही समोर आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी घनश्याम दंदे यांच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी ट्रकचालक शाहरुख खान, जावेद सेठ ऊर्फ जावेद हारून सुपारीवाला, चांद खान ऊर्फ चांदभाई (रा. अमरावती) आणि ट्रकमालक रेहान खान ऊर्फ रेहानभाई (रा. डी. एड. कॉलेजजवळ, धरमकाटा परिसर, अमरावती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश देशमुख, श्रीकांत पाटील, मोहम्मद अमीर, धनसिंग ठाकूर, मनोज गावंडे, राजकुमार थोटे, छत्रपती करपते आणि अथर्व कोहळे यांनी कारवाईत सहभाग घेतला. प्रतिबंधित गुटख्याची जिल्ह्यात होणारी आवक रोखण्याच्या दृष्टीने या कारवाईला महत्त्व प्राप्त झाले आहे.

वलगांव टी-पॉईंटवर गोवंश

कलमांन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

गायगोंधनसारख्या पवित्र सणाच्या दिवशीच गोवंश तस्करीचा प्रयत्न झाल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. ही जनावरे कुठून आणली गेली आणि कुठे कत्तलीसाठी नेण्यात येत होती, याचा शोध पोलीस घेत आहेत. या तस्करीमागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय पोलिसांना असून, त्यादृष्टीनेही तपास सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, गोवंश तस्करीची कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावी.

जबरी चोरीचा गुन्हा

पुढील तपासासाठी फ्रेजरपुरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला.

दरम्यान, ११ नोव्हेंबर रोजीच गुन्हे शाखेच्या पथकाने राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत बाटा शोरूमसमोरून शुभम राजू बोयत (३०, रा. साईनगर, अमरावती) या हद्दपार आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मसनगंज परिसरातील महापालिका उद्यानाजवळून जब्बार खान रऊफ खान (३१, रा. अन्सारनगर, वाडी परिसर, अमरावती) या हद्दपार आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याच्याकडून एक लोखंडी कोयता आणि दोन हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. नागपुरी गेट पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन हजार रुपयांची रोकड असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या कारवाईत एकूण २ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ १), शाम घुगे (परिमंडळ २), प्रांजळ सोनवणे (मुख्यालय) तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने, राहुल महानज, सचिन माकोडे यांच्यासह पोलीस अंमलदार सुनील लासुरकर, फिरोज खान, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, संभाजी केंद्रे, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, आस्तिक देशमुख, मंगेश लोखंडे, जहीर शेख, संजय भारसाकळे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, रंजीत गावंडे, नरेश मोहरील, सागर ठाकरे, राजीक रायलीवाले, सूरज चव्हाण, निखिल गेडाम, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, संदीप खंडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा आणि राहुल दुधे यांनी सहभाग घेतला.

कोकर्ड्यातील आमरण उपोषणाची

लवटे, आमदार बच्चू कडू आणि सुधाकर भारसाकळे यांच्या उपस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरण कार्यालयाच्या वतीने उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या लेखी स्वरूपात स्वीकारण्यात आल्या. त्यानंतर उपोषणकर्त्यांनी आमरण उपोषण सोडले.

या आमरण उपोषणात बुद्धभूषण गवई, शुभम घाटे, स्वराज बारबदे आणि सौरभ पुणसे सहभागी झाले होते. तसेच साखळी उपोषणात सौरभ माहोरे, शुभम इंगळे, विनोद दाकोडे, सोहम मोहल्ले, सत्यम राऊत, श्रीनिकेत बारबदे, सागर सुरजुसे आदी युवकांनी सहभाग नोंदविला.कोकर्डा ते कोकर्डा फाटा रस्त्याच्या कामाला गती मिळावी तसेच शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पॉवर हाऊस उभारण्यात यावे या प्रमुख मागण्यांसाठी युवकांनी आंदोलन सुरू केले होते. अखेर संबंधित विभागांकडून लेखी आश्वासनानंतर आज आमरण उपोषणाची सांगता करण्यात आली.

प्रवेशद्वार कोसळल्या प्रकरणी

शेख जमीर शेख शफीक (वय २९, लालखडी),शेख मुजफ्फर शेख बब्बू (वय ३२, उस्मान नगर) जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

महापौरांच्या प्रभागातील घटना- विशेष म्हणजे काही महिन्यांपूर्वी महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन झाले होते आणि गणेशोत्सवापूर्वी काम सुरू करण्यात आले होते. महापौरांच्याच प्रभागात हा अपघात झाल्याने राजकीय खळबळ उडाली आहे.नगरसेवक मनीष बजाज यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही ठेकेदारांवर गुन्हा दाखल केला. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दाखल कलमांमध्ये ७ वर्षांपेक्षा कमी शिक्षेची तरतूद असल्याने आरोपींना पोलीस ठाण्यात बोलावून मुचलक्यावर जामीन देण्याची प्रक्रिया राबवली जात आहे.

चौकशीची मागणी-

अपघातानंतर नगरसेविका स्नेहा आशिष लुल्ला यांनी बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित करत संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. जबाबदार अधिकारी आणि कंत्राटदारांचा निष्काळजीपणामुळे मजुरांचा जीव धोक्यात आला आहे. तसेच प्रशासनाने सर्व जखमी मजुरांना तात्काळ योग्य नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

स्लॅब कोसळण्यामागे निकृष्ट मटेरियल होते, डिझाईनमध्ये त्रुटी होती की सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले, याचा तपास पोलीस करत आहेत. मनपाच्या बांधकाम विभागाकडूनही कामाच्या परवानगी आणि गुणवत्ता अहवालाची मागणी करण्यात आली आहे.

भगवान बिरसा मुंडा

^ खालील विषयांपैकी कोणताही एक विषय निवडण्याची संधी विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे.

यामध्ये ऐतिहासिक 'भगवान बिरसा मुंडा : भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान' सांस्कृतिक : आदिवासी वारसा, संस्कृती आणि अस्मिता : आपल्या मुळांचे जतन' तसेच समकालीन : 'आधुनिक भारतातील आदिवासी विकास : संधी, आव्हाने आणि पुढील वाटचाल' या विषयांचा समावेश आहे.

स्पर्धकांनी ८०० ते १,२०० शब्दमर्यादेत मौलिक व अप्रकाशित निबंध तयार करून एकाच PDF फाईलमध्ये सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला केवळ एकच निबंध सादर करता येईल. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक २,५०० रुपये, द्वितीय पारितोषिक १,५०० रुपये आणि तृतीय पारितोषिक १,१०० रुपये रोख स्वरूपात देण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेच्या अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

या स्पर्धेकरिता दि. ७ ते १३ नोव्हेंबर २०२६ दरम्यान नोंदणी करता येणार असून, निबंध स्पर्धा व सादरीकरण १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. स्पर्धेचा निकाल १६ नोव्हेंबर २०२६ रोजी घोषित करण्यात येणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://forms.gle/Tta2aHHG5X3M1DQK6 या लिंकद्वारे नोंदणी करावी. स्पर्धेसंदर्भातील सविस्तर माहिती https://janjatiya-gwurav-diwas-2026.tribalstudy.workers.dev/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी TribalStudy@sgbau.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा. विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा असे आवाहन आदिवासी अध्यासन केंद्राच्या प्रमुख डॉ. मनीषा कोडापे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

माजी सरन्यायाधीश धनंजय

यांच्या व्याख्यानातून विचारमंथन होणार आहे. या व्याख्यानाला उपस्थित राहण्याचे आवाहन विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. प्रवीण जानी, सचिव सीए प्रकाश चोपडा, उपाध्यक्ष डॉ. ललित निमोदिया आणि विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेश मुनोत यांनी केले आहे.

शेतकरी 3 महिने काम

दाव्याचा समाचार घेत म्हटले, 'शेतीचे काम केवळ तीन महिन्यांचे नसते. शेतकरी वर्षभर पेरणी, तण काढणे, सिंचन, कापणी आणि पुढील हंगामाची तयारी या कामांमध्ये गुंतलेला असतो. याशिवाय मोकाट जनावरांपासून पिकांचे रक्षण करणे आणि खते-बियाणांची जुळवाजुळव करण्यात शेतकऱ्यांचा संपूर्ण वेळ जातो.'

काँग्रेस नेते राहुल राज यांनीही या वक्तव्याचा निषेध करत हे अत्यंत विकृत आणि निर्लज्ज मानसिकतेचे लक्षण असल्याचे म्हटले. एक लोकप्रतिनिधी अन्नदात्याबद्दल असे बेजबाबदार विधान कसे करू शकतो, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दरम्यान भाजपाच्या वरिष्ठ नेतृत्वानेही या विधानाबाबत मिश्रा यांना फटकारल्याचे समजते.

माफी मागत स्पष्टीकरण दिले

वाद वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर मिश्रा यांनी बुधवारी एक व्हिडीओ शेअर करत दिलगिरी व्यक्त केली. ते म्हणाले, 'गोवर्धन पूजेनिमित्त मऊगंज येथील गोशाळेत गेलो असताना शेतकऱ्यांच्या समस्या आणि गावांच्या स्थितीवर चर्चा सुरू होती. मी स्वतः शेतकरी कुटुंबातील असून शेतकऱ्यांच्या अडचणी, त्यांची आर्थिक स्थिती आणि कौटुंबिक समस्या यांची मला पूर्ण जाणीव आहे.'

आपल्या विधानाचा विपर्यास केल्याचा दावा करत ते पुढे म्हणाले, 'माझ्या भाषणातील विधानांचा चुकीचा अर्थ काढून ते सादर करण्यात आले. मात्र तरीही माझ्या शब्दांमुळे शेतकरी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील, तर मी मनापासून क्षमा मागतो. कोणाचाही अपमान करण्याचा किंवा मानसिक त्रास देण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. मी नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहिलो असून त्यांच्या हक्कासाठी भविष्यातही संघर्ष करण्यास तयार आहे.'

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाला

झाली, ज्यातून सुनेत्रा पवार यांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. भाजपने या बैठकीत विलिनीकरणाची प्रक्रिया वेगाने पुढे नेण्याचा आग्रह धरला असून, त्यासाठी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनाच पुढे केले जाणार असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. या भेटीनंतर नेत्यांच्या वागण्या-बोलण्यात फरक पडल्याचेही 'इंडियन एक्सप्रेस'ने म्हटले आहे. दरम्यान, शरद पवार यांनी आपले पर्याय खुले ठेवले असून सुप्रिया सुळे यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी देऊन त्यांना 'सेट' करण्याची त्यांची तयारी आहे. तसेच, पक्षाची कायदेशीर लढाई आपणच जिंकू, असा पवारांना विश्वास आहे.

उद्धव ठाकरे आणि एकनाथ

इंजिन आहेत. त्यामुळे इंजिन जिथे असेल, तिथेच डबा जाणार,' असे म्हणत पाटलांनी राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे.राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या आज शरद पवार यांची भेट घेणार आहेत. यावर बोलताना पाटील म्हणाले की, कोणी कोणासोबत एकत्र यावे किंवा येऊ नये हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. शरद पवार हे देशाचे नेते आहेत आणि त्यांच्या आजारपणामुळे सुनेत्रा पवार त्यांना भेटायला जाऊ शकतात. राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचीही चर्चा सुरू असू शकते, मात्र आपण त्या पक्षाचे नेते नसल्याने आपल्याला यातील कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.राष्ट्रवादीचे २० ते ३० आमदार पक्ष सोडणार असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला होता, त्यावरही पाटलांनी जोरदार टीका केली. राऊत यांचे किती दावे खरे ठरतात याची टक्केवारी काढली तर ती शून्य असल्याचे ते म्हणाले. राऊत कायम एखाद्या भविष्यकाराप्रमाणे बोलत असतात, मात्र त्यांची कोणतीही भविष्यवाणी खरी ठरत नाही. चुकीचा अंदाज वर्तवणारे ते एक फेल हवामान शास्त्रज्ञ आहेत, असा चिमटा त्यांनी काढला. दरम्यान, गोकुळच्या निवडणुकीवरून संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांनाही गुलाबराव पाटील यांनी सडेतोड उत्तर दिले. कोरम पूर्ण होत नसेल तर काही गोष्टींवर नाइलाज असतो, कारण शेवटी संस्था चालवणे हे सर्वात महत्त्वाचे असते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना जो निर्णय योग्य वाटला तो त्यांनी घेतला आहे. त्यावर टीका करणे हे विरोधकांचे कामच असून त्यांनी ते बोलत राहिले पाहिजे, असा टोला पाटील यांनी लगावला.

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या

सुनील तटकरे यांचा हात आहे का? असा संशय आहे. त्यामुळे त्या अँगलने देखील चौकशी व्हावी', असं वक्तव्य रामदास कदम यांनी केल्याने राजकारणात खळबळ उडाली. रामदास कदम यांच्या आरोपांना उत्तर देताना सुनील तटकरे यांनी रामदास कदम यांची मानसिक स्थिती बिघडल्याची खोचक टीका केली. या आरोप-प्रत्यारोपांनंतर सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. फक्त सुनील तटकरे यांनीच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनीदेखील मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आहे. सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी जात भेट घेतली. सुनील तटकरे यांनी एक्सवर मुख्यमंत्र्यांच्या भेटीचा फोटो पोस्ट करत भूमिका मांडली आहे. 'दिवाळीनिमित्त आज राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दिवाळीनिमित्त झालेली ही भेट आनंददायी ठरली', असं सुनील तटकरे आपल्या ट्विटमध्ये म्हणाले आहेत. दरम्यान, सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याच्या एक दिवसआधी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे तटकरे आणि फडणवीस यांच्या भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी जावून भेट घेतली. धनंजय मुंडे यांनीदेखील 'एक्स' पोस्ट करत या भेटीबाबत माहिती दिली. 'राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांची आज त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन दीपावलीच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. यावेळी मराठवाड्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीची माहिती देत भाऊंना राज्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्याची विनंती चर्चेदरम्यान केली. त्यास भाऊंनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वस्त केले', असं धनंजय मुंडे म्हणाले आहेत. एकीकडे या सर्व घडामोडी सुरु असताना सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. अजित पवार यांचा अपघात नाही तर घातपातच झाला आहे, असं उमेश पाटील 'टीव्ही ९ मराठी'ला प्रतिक्रिया देताना म्हणाले आहेत. 'तो घातपातच आहे, असं वाटतं. असं का वाटतं, त्याच्या खोलात गेलं तर त्यावर बरीच चर्चा झालेली आहे. पण माझं मन सांगतं की, हा अपघात नाही तर घातपातच आहे. त्याबाबत योग्य त्या प्लॅटफॉर्मवर योग्य त्या पद्धतीने खासदार पार्थ पवार, राष्ट्रवादीचे युवानेते जय पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पाठपुरावा करत आहेत', असं उमेश पाटील म्हणाले आहेत. सत्ताधारी राष्ट्रवादीचे उमेश पाटील यांनीच असं वक्तव्य केल्याने पडद्यामागे नेमक्या काय घडामोडी घडत आहेत? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. या प्रकरणात आगामी काळात काय-काय घडामोडी घडतात, ते पाहणं महत्त्वाचं आहे.

ना भाजपा, ना सपाउत्तर

भागांमध्ये आपली सक्रियता वाढवली आहे. ही आघाडी श्रावस्ती, बहराइच, सिद्धार्थनगर, बस्ती, आझमगड, गाझीपूर आणि पूर्वांचल व तराई भागातील इतर संवेदनशील भागांना टार्गेट करत आहे. ओवैसी आणि चंद्रशेखर यांनी या भागांमध्ये पाया रचण्यास सुरुवात केली आहे. या निवडणुकांमध्ये आपले मजबूत अस्तित्व निर्माण करण्याची दोन्ही पक्ष तयारी करत आहे.

PDM समीकरण साधणार- २०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी एकत्र येण्याचे संकेत देऊन असदुद्दीन ओवैसी आणि चंद्रशेखर आजाद उर्फ रावण यांनी राज्यातील राजकारणातील मागास दलित मुस्लिम (PDM) समीकरण संतुलित करण्याची तयारी केली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत AIMIM ने अपना दल (कॉमरावादी) सोबत युती केली होती. असदुद्दीन ओवैसी आणि पल्लवी पटेल यांनी मागास दलित मुस्लिम (PDM) समीकरणाचा पाया घातला होता. परंतु त्यावेळी ही युती करिष्मा दाखवू शकली नाही. कोणत्याही मतदारसंघात या युतीचा लक्षणीय प्रभाव दिसून आला नाही. दरम्यान, राज्यात भाजपाविरोधात आघाडीचा चेहरा म्हणून स्वतःला प्रस्थापित करण्यासाठी अखिलेश यादव सातत्याने प्रचारमोहीम राबवत आहेत. अलीकडेच मुस्लिम व्होटबँकेतील नाराजीचा मुद्दा समोर आल्यानंतर सपा अध्यक्षांनी रामपूरला पोहचून तुरुंगात आझम खानची भेट घेतली. यातून ते मुस्लिमांना खूश करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. मात्र आता अखिलेश यादव यांनी राम मंदिराला भेट देण्यासाठी अयोध्येचा दौरा जाहीर केला आहे. त्यांचा राम मंदिर दौरा १२ डिसेंबर रोजी होणार आहे. AIMIM कडून होणारे तीव्र हल्ले आणि चंद्रशेखर यांनी दलित व्होटबँक मजबूत करण्यासाठी केलेले प्रयत्न यामुळे समाजवादी पक्षाची चिंता वाढली आहे.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

लक्ष्मी जिनिंगमध्ये भीषण आग

अग्निशमन वाहनाचा जॉईंट तुटूनही कारंजा अग्निशमन दलाची शर्थीची धडपड

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा ते धनज रोडवरील मेहा फाट्याजवळ असलेल्या लक्ष्मी झिंटेक्स प्रायव्हेट लिमिटेड, धनज (ता. कारंजा) येथे बुधवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास कापसाच्या गंजींना भीषण आग लागल्याची घटना घडली. आगीचे स्वरूप पाहता मोठ्या प्रमाणात कापूस जळून खाक होण्याची भीती निर्माण झाली होती.

घटनेची माहिती सर्वधर्मीय सामाजिक कार्यकर्ते श्याम सवाई व लोकमतचे पत्रकार अंकुश कथे (धनज बुद्रुक) यांनी कारंजा अग्निशमन दलाचे फायरमन शुभम झोपाटे यांना दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे वाहन तातडीने घटनास्थळाकडे रवाना झाले.



मात्र, धनज रोडवरील बगी परिसरात पोहोचताच अग्निशमन वाहनाच्या जॉईंटचे नट-बोल्ट तुटल्याने वाहनात तांत्रिक बिघाड निर्माण झाला. ऐन आपत्तीच्या वेळी आलेल्या या अडचणीमुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता होती. मात्र, अग्निशमन दलाच्या जवानांनी हार न मानता तातडीने कारंजा येथून लहान अग्निशमन वाहन आणि मेकॅनिक घटनास्थळी बोलावून घेतला. वाहनाची दुरुस्ती करून पुन्हा अग्निशमन मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

तांत्रिक अडचणीवर मात करीत अग्निशमन वाहन घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर जवानांनी अथक परिश्रम घेत आगीवर नियंत्रण मिळविले. संभाव्य मोठे नुकसान टाळण्यासाठी जवानांनी दाखविलेली तत्परता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा निश्चितच कौतुकास्पद ठरली.

अग्निशमन दलात सहभागी पथकामध्ये अग्निशमन अधिकारी : विवेक माकोडे वाहन चालक : भारत जोंधळे, चंदू खराडे, जाहिद अली फायरमन : इमरान खान, राहुल गुल्हाने, संजय धुवारे सहभागी होते

एकीकडे अग्निशमन वाहनात तांत्रिक बिघाड, तर दुसरीकडे जिनिंगमधील कापसाला लागलेली भीषण आग, अशा दुहेरी आव्हानात्मक परिस्थितीतही कारंजा अग्निशमन दलाने दाखविलेली जिद्द आणि सेवाभाव उल्लेखनीय आहे. संकट कितीही मोठे असले तरी कर्तव्यापासून मागे न हटता नागरिकांच्या सुरक्षेसाठी धावून जाणाऱ्या अग्निशमन जवानांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

जनजातीय गौरव सेवा सप्ताहात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा – पालकमंत्री

■ प्रतिनिधी | वाशिम ■



क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जनजातीय गौरव सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, या सप्ताहात आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध जनकल्याणकारी, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी तसेच जल, जंगल आणि जमीन यांच्या संरक्षणासाठी दिलेला लढा आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांचे त्यागमय जीवन, संघर्ष आणि समाजसुधारणेचे कार्य आजही प्रेरणादायी आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत अकोला, वाशिम आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांमध्ये सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. १५ नोव्हेंबर रोजी शासकीय कार्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने १२ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून घोषित केला आहे. आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, संस्कृती आणि योगदान जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच विविध शासकीय योजनांची माहिती आणि लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती मोहनकुमार व्यवहारे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अकोला यांनी दिली.

एम.एस. परीक्षेत डॉ. नेहा पडवाल राज्यातून द्वितीय



प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोगशास्त्र विषयातील उल्लेखनीय यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या एम.एस. परीक्षेत प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोगशास्त्र या विषयात डॉ. नेहा दिवाल पडवाल यांनी संपूर्ण राज्यातून द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

या यशाबद्दल सरकार इंगोले, ॲड. संघनायक मोरे व श्री. बाजड यांच्या वतीने डॉ. नेहा पडवाल यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या आई-वडिलांची उपस्थिती होती.

डॉ. नेहा यांनी आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह परिसराचा गौरव वाढला असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीस मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

आसोला खुर्द येथे गो- मातेची वाजतगाजत मिरवणूक!

गोवर्धन पूजाची शेकडो वर्षांची परंपरा कायम!

■ प्रतिनिधी | मानोरा ■



व्हालुक्यातील मौजे आसोला खुर्द येथे दिवाळी गोवर्धन पूजेच्या निमित्ताने गोमातेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शेकडो वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने जपण्यात आली.

गोवर्धन पूजेच्या दिवशी सकाळी गावातील गो मातेला आंघोळ घालून हळद-कुंकू लावत सजवून फुलांच्या माळ अर्पण करत गावातील प्रमुख मार्गावरून गोमातेची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी डफडीची तालावर 'गो माता की जय' च्या जयघोषात संपूर्ण गाव दुमदुमून गेले होते.

मिरवणुकीत गायकी, बालक सहभागी झाले होते. महिलांनी औक्षण करून गोमातेचे स्वागत केले. ठिकठिकाणी गावकऱ्यांनी गाईची पूजा करून त्यांना गुळ, हरभरा आणि नैवेद्य दाखविला.

गोवर्धन पूजेनिमित्त गावातील गोठ्यात आणि गावातील महान तपस्वी परमहंस संत श्री सोहमनाथ महाराज, देवी जगदंबा माता, संत सेवालाल महाराज मंदिरात गोवर्धन पर्वताची प्रतिकृती तयार करून त्याची विधिवत पूजा करण्यात आली.

गायींचे रक्षण करणाऱ्या श्रीहरी, श्रीनारायण श्रीकृष्णाची आठवण या पूजेतून करण्यात आली. गाय ही आपली माता असून तिचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला. पूर्वजापासून चालत आलेली ही परंपरा आजची गायकी तरुण पिढीही तितक्याच उत्साहाने पुढे नेत आहे. मिरवणुकीमुळे गावात एकोपा आणि बंधुभाव वाढतो, असे याप्रसंगी दिसून आले. या मिरवणुकीत श्रीनारायणाच्या वेशभूषेत गायकी सुरेश महाराज, सुभाष महाराज, पांडुरंग महाराज, राजाराम महाराज यांच्यासह इतर सहभागी झाले होते. गाव प्रदक्षिणा फेरी नंतर शांततेत आणि आनंदी वातावरणात मिरवणुकीचा समारोप झाला.

१५ नोव्हेंबर पासून श्री वासुदेव आश्रमात श्री कूष्मांडनवमी महोत्सव

■ प्रतिनिधी | वाशिम ■



प.पू.पंडितकाका धनागरे महाराज यांनी श्री वासुदेव आश्रमाची स्थापना केली आणि या आश्रमात उपासना तथा वैदिक कर्म आणि यज्ञयाग सतत चालावेत म्हणून प.पू.विजयकाका पोफळी महाराजांनी पुढाकार घेतला आहे व त्यांच्याद्वारे हा उपक्रम सातत्याने सुरू आहे.या अनुषंगाने यंदा श्री वासुदेव आश्रमात श्री कूष्मांड नवमी महोत्सव रविवार १५ नोव्हेंबर पासून सुरू होत आहे.हा महोत्सव २२ नोव्हेंबर पर्यंत चालणार असून यंदा प्रथमच आश्रमात श्रीमद्भागवत ज्ञानयज्ञ साकार होणार आहे.विशेष म्हणजे या महोत्सवात करवीर मधील संकेश्वर पीठाचे प.प.सच्चिदानंद अभिनव विद्यानरसिंह भारती स्वामी शंकराचार्य यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या महोत्सवात रविवार १५ नोव्हेंबर रोजी श्रीमद्भागवत कथेस प्रारंभ होणार आहे.व शनिवार २१ नोव्हेंबर रोजी कथेचे समापन होणार आहे. १५ रोजी सकाळी ७.०० वाजता पीठस्थापना, सकाळी ७.३० वाजता श्री भागवत संहिता पठण, श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथील वेदमूर्ति श्री अनंतशास्त्री मुळे हे श्रीमद्भागवत कथा सांगणार आहेत.तसेच श्री ऋग्वेद संहिता स्वाहाकार व श्री चतुर्वेद पारायणास प्रारंभ होणार आहे.यावेळी प्रधानाचार्य वेदमूर्ति कृष्णाशास्त्री आर्वीकर हे राहतील. दुपारी ३.०० वाजता श्री भागवतकथा ज्ञानयज्ञ निरूपण राहील तर सायंकाळी ६.३० वाजता त्रिपदी सायंप्रार्थना असेल. गुरूवार १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता वणीचे विद्यावाचस्पती स्वानंद पुंड यांच्या १०० व्या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.शनिवार २१ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६.३० वाजता या महोत्सवानिमित्त शहरातून विशाल अशी शोभायात्रा काढली जाणार आहे.रविवार २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता पूर्णाहुती होवून महोत्सवाचे समापन होणार आहे.

मौलाना आझाद यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान देश कधीही विसरणार नाही! - राजु चौधरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान देश कधीही विसरू शकणार नाही. ते महान विचारवंत, विद्वान, शिक्षणतज्ज्ञ आणि स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री होते. त्यांनी देशाच्या शैक्षणिक विकासासाठी दिलेले योगदान सदैव प्रेरणादायी राहील, असे प्रतिपादन वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजुभाऊ चौधरी यांनी केले.

भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त ११ नोव्हेंबर रोजी मंगळवारीवेश येथील मौलाना आझाद हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मौलाना आझाद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी आर्थिक परिस्थितीवर मात करून वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मोहम्मद फरान अब्दुल हकीम याची बीएएमएस अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. त्याच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला काँग्रेसचे पदाधिकारी मधुकरराव जुमडे, उज्वल देशमुख, समाधान माने, मनीष भालेराव, सागर गोरे, सुनील मापारी, डॉ. तस्लिम शेख, अजय मोतीवार, प्रतीक कांबळे, मुन्ना राठी, राजू पुणेवार यांच्यासह अब्दुल हक बाबा भाई, हाजी असलम कुरेशी, फरीद बाबा, इब्राहिम भाई, मुजफ्फर उल्ला खान, जफर खान, शेख अजीम, इमरान हुसेन, अब्दुल सईद, अलीम काझी, खालीक अहमद, शेख वकील, मुजाहिद अली, शेख निसार, जावेद खान आदी मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

दिवाळीच्या आनंदात निसर्गसेवेचा अनोखा उपक्रम

कारंजा : दिवाळी म्हटली की घराघरांत सुगंधी तेल, उटणे आणि अभ्यंगस्नानाची लगबग सुरू असते. मात्र, कारंजा येथील वैकुंठ सेवा समितीच्या सदस्यांनी दिवाळीच्या पवित्र दिवशी स्वतःच्या आनंदासोबत निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा अनोखा उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

स्मशानभूमी परिसरात समितीच्या वतीने लावण्यात आलेल्या विविध झाडांना पाणी घालून त्यांचे अभ्यंगस्नान करण्यात आले. झाडांचे संगोपन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम दिवाळीच्या उत्सवात विशेष ठरला. वैकुंठ सेवा समितीच्या सदस्यांनी गेल्या तीन वर्षांपासून दर रविवारी सकाळी एक तास स्मशानभूमीत श्रमदान करून स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली आहे. याच सेवाभावी कार्यातून परिसरात अनेक वृक्षांची लागवड करण्यात आली.

विधी सेवा दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■



नागरिकांना कायद्याची माहिती मिळावी, त्यांना उपलब्ध असलेल्या मोफत विधी सेवा व शासकीय योजनांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने ९ नोव्हेंबर रोजी विधी सेवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांच्या मार्गदर्शनाखाली मालेगाव तालुक्यातील वरदरी, उडी (वडी) व धमधमी या गावांमध्ये कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम यांनी उपस्थित ग्रामस्थांना उपलब्ध विधी सेवा, मोफत कायदेविषयक मदत आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच ग्रामस्थांच्या विविध अडचणी जाणून घेत त्यांना मार्गदर्शन केले.

गावकऱ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण व्हावी आणि विधी सेवा प्राधिकरणाच्या योजनांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचावी, यासाठी विधी स्वयंसेवकांमार्फत माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा विधिज्ञ मंडळाचे सदस्य ॲड. संतोष गिते आणि पंचायत समिती सदस्य रंजीत घुगे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला संबंधित गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिसोडमध्ये कचऱ्याला आग

रिसोड : रिसोड भोकरखेड रोडवर (मंगळवार रोजीआज दुपारीच्या सुमारास दरम्यान अज्ञात व्यक्ताकडून कचऱ्याला आग लावण्यात आल्याची घटना घडली. कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरले होते. त्यामळे स्थानिक नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक विजय जाधव यांनी दखल घेत आंग्निशमन दलाला घटनास्थळी पाचारण केले. त्यांच्या तत्परतेमुळे अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाल. यावेळी पोलास प्रशासनही घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आल्याने संभाव्य धोका टाळण्यासाठी मदत झाली, शहरात सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याला आग लावण्याचे प्रकार घडत असल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखत झाली आहे.

जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार सौ. मालती धनराज राठोड रा. जनुना पो.ता. कारंजा जि. वाशिम यांनी श्री.सुरज माणिकलाल मुंदडा रा. कारंजा जि. वाशिम यांच्या सोबत त्यांची शेती खरेदीचा सौदा करण्याचे ठरविले आहे व तसा इसारपट नोटरीद्वारे दिनांक २६/१०/२०२६ ला केलेला आहे.

या शेती मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे - मौजे रामनगर, ता. कारंजा, जि. वाशिम येथील गट क्रमांक व उपविभाग १०/१, मध्ये क्षेत्रफळ ०.४० आर असलेली शेतजमीन शेतात विहीर पाणी घेण्याच्या निम्म्या हक्कासह खरेदी करण्याचा सौदा केला आहे. या जमिनीच्या चतुः सिमा पुढीलप्रमाणे: पूर्व: गावठाण, पश्चिम:गंगाराम नारायण जाधव यांची शेतजमीन, उत्तर: जगदेवराव गावंडे यांची शेतजमीन, दक्षिण: अंबादास नारायण जाधव यांची शेतजमीन अशी आहे.

तरी या जाहीर सुचनेद्वारे सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की उपरोक्त खरेदी/विक्री व्यवहाराबाबत कोणासही कोणताही आक्षेप असल्यास तसेच उपरोक्त मालमत्तेवर या आधी कोणताही खरेदी, विक्री, बोझा, गहाणखत, कर्ज व्यवहार, न्यायालयीन मनाई हुकुम, भाडेपट्टा, जप्ती वारसंबंधी कोणतीही काही, तसेच इतर कोणताही व्यवहार झाला असल्यास व कोणत्याही नागरिकाचे कोणताही कायदेशीर हक्क तसेच वारसांसंबंधित व इतर कायदेशीर कोणताही आक्षेप असल्यास ही जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यासपासून १५ दिवसांचे आत आमचे पक्षकार यांचेशी संपर्क करावा.

मुदतीत कोणाचाही लेखी आक्षेप न आल्यास, सदर मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क वा बोजा नाही असे समजून आमचे पक्षकार सदर शेतजमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत पूर्ण करतील. त्यानंतर आलेला कोणताही आक्षेप किंवा दावा आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

संपर्कासाठी पत्ता: धनराज किसनराव राठोड
रा. जनुना पो.ता. कारंजा जि. वाशिम - ४४४१०५
मो.नं. ९९२०९१२७८५
दिनांक - ११/११/२०२६

पक्षकारातर्फे वकील
ॲड. सुजय दिलीप राऊळ

इंगलवाडीतील ग्रामस्थ मूलभूत सुविधांपासून वंचित!

अंतर्गत रस्त्यांवर गटारगंगा वर्षानुवर्षे वाहत असल्याने नागरिकांचा सवाल!

■ प्रतिनिधी | मानोरा ■



तालुक्यातील इंगलवाडी या १०० टक्के मागासवर्गीय नागरिकांचे निवास असलेल्या गावातील अंतर्गत रस्त्यांवर वर्षभर गटारीचे सांडपाणी वाहत आहे. त्यामुळे गावातील वातावरण दूषित झाले असून मानवी आरोग्य धोक्यात आले आहे.

९०० ते १००० लोकसंख्या असलेल्या या गावात ७०टक्के बंजारा (भटके विमुक्त), २८ टक्के अनुसूचित जमाती (आंध) आणि २ टक्के अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिक राहतात. गट ग्रामपंचायत असलेल्या या गावचे सरपंच अनुसूचित जाती प्रवर्गातील आहेत.

गावकरी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत मतदान करून मूलभूत सुविधा मिळतील, अशी अपेक्षा करतात. मात्र वर्षानुवर्षे गटारीच्या समस्येकडे डोळेझाक केली जात आहे. रस्त्यावर साचलेल्या घाण पाण्यामुळे डासांचे प्रमाण वाढले असून ताप, सर्दी-खोकला, त्वचारोग यांसारख्या आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी नागरिकांचा वापर केवळ मत घेण्यासाठीच करतात की काय, असा सवाल ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे. गटारीची तातडीने दुरुस्ती व सांडपाण्याची कायमस्वरूपी विल्हेवाट लावावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

संकल्प जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. विजय जाधव

■ प्रतिनिधी | वाशिम ■



रिसोड येथे होऊ घातलेल्या चौथ्या संकल्प जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कथालेखक प्रा. डॉ. विजय जाधव यांची निवड आज करण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे यांच्या उपस्थितीत, या संमेलनाचे संयोजक प्रा. गजानन वाघ, डॉ. विजय काळे आणि चाफेश्वर गांगवे यांनी संयुक्तपणे ही घोषणा केली.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांच्या अनुदानातून, संकल्प फाऊंडेशन रिसोड यांच्या वतीने हे संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. वाशीम जिल्ह्याचे शिल्पकार स्व. पुंडलीकरावजी गवळी साहित्य नगरी, भोमावत मंगल कार्यालय, संत श्री अमरदास बाबा संस्थान परिसर, रिसोड येथे पाच आणि सहा डिसेंबर रोजी हे संमेलन होणार आहे.

संमेलनाध्यक्ष म्हणून निवड झालेले डॉ. विजय जाधव हे मराठी भाषेचे अभ्यासक, साहित्याचे जाणकार आणि एक सिद्धहस्त कथालेखक आहेत. त्यांनी केलेले शैक्षणिक व साहित्यिक कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या विद्वत्तेचा, साहित्यविषयक चिंतनाचा आणि मराठी भाषेप्रती असलेल्या योगदानाचा गौरव व्हावा, या भावनेतून संमेलनाध्यक्षपदासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनाच्या माध्यमातून वाशीम जिल्ह्यातील साहित्यिक, कवी, लेखक, वाचक आणि साहित्यप्रेमींना एकत्र आणून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, वर्तमान आणि भविष्य यांवर विचारमंथन करण्याचा संकल्प आहे. डॉ. विजय जाधव यांच्या अध्यक्षीय उपस्थितीने या संमेलनाला वैचारिक उंची आणि साहित्यिक प्रतिष्ठा लाभेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

संमेलनाध्यक्षांचा परिचय

प्रा.डॉ. विजय मेरसिंग जाधव हे वाशीम येथील राजस्थान आर्य महाविद्यालयाच्या मराठी विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विज्ञान भाषा अभ्यास मंडळाचे ते सदस्य आहेत. अखिल भारतीय तांडा सुधार समितीचे ते अध्यक्ष आहेत. त्यांचे अस्वस्थ तांडा, गोरवेणा, बंजारा परंपरा आणि भोगवटा, क्रांतीनायक संत सेवालाल : जीवन व कार्य, अशांत भूमिकेचे अंतरंग, सामकीयाडी, असे विविध ग्रंथ प्रकाशित आहेत.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३४४ ■ गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्वाचा त्रिवेणी संगम असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे दत्ताजी मेघे - पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

दत्ताजी मेघे यांच्या जयंतीनिमित्त मेघेवाडी, पवनार येथे आदरांजली कार्यक्रम

वर्धा जनमाध्यम : नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्व यांचा त्रिवेणी संगम असलेले दत्ताजी मेघे यांच्यासारखे नेतृत्व लाभणे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. राजकारणासोबतचा समाजकारणाला प्राधान्य देत त्यांनी आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मदतीचा हात दिला. अनेक आमदार, खासदार आणि मंत्री घडविण्याचे कार्य त्यांनी केले. विरोधकांबद्दलही कधी कटुता न ठेवता प्रत्येकाला मदत करण्याची भूमिका त्यांनी आयुष्यभर जपली. त्यांच्या कार्यातून समाजकारणाची नवी शिकवण मिळते, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.



पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी मेघेवाडी, पवनार येथे दत्ताजी मेघे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या समाधीस्थळी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार अभिजीत वंजारी, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार सागर मेघे, स्मिता मेघे, नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगूळ, ह.भ.प. सयाजी महाराज, प्रकाश वाघ महाराज, किरण पांडव, सुनील गफाट, संजय गाते, अशोक कलोडे, अजय गांडोळे, अभ्युदय मेघे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ.भोयर पुढे म्हणाले, दत्ताजी मेघे यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या कार्याचा आणि मदतीचा अनुभव आला आहे. अनेकांनी आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात त्यांनी केलेल्या सहकार्याच्या आठवणी यावेळी व्यक्त केल्या. राजकीय प्रवासात अनेक सहकारी सोबत आले, काही काळानंतर दूर गेले; मात्र अशा कोणत्याही व्यक्तीबद्दल त्यांनी कधीही चुकीचे बोलणे केले नाही. विरोधी पक्षातील व्यक्तींबाबतही त्यांनी नेहमीच सन्मानाची भूमिका ठेवली. दुसऱ्याला मदत कशी करता येईल, याचाच विचार त्यांनी सातत्याने केला. त्यांच्या या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे विविध सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार अभिजीत वंजारी यांनी दत्ताजी मेघे यांच्या आठवणींना उजाळा देताना ते कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्व यांचा त्रिवेणी संगम असलेले व्यक्तिमत्त्व होते, असे सांगितले. माजी खासदार रामदास तडस म्हणाले, दत्ताजी मेघे आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजामध्ये जिवंत आहे. त्यांनी अनेकांच्या सुख-दुःखात सहभागी होत गरजूंच्या मदतीसाठी नेहमीच दातृत्वाची भूमिका बजावली.

यावेळी संजय गाते यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर मेघे यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी दत्ताजी मेघे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

मुख्यालयाचे नियम धाब्यावर; सरकारी कर्मचारी गावकऱ्यांनाच विचारतात, 'तुम्ही कोण

सेलू तालुक्यात ग्रामसेवक, पटवारी, कृषीसेवकांची मनमानी; ग्रामसभांना दांडी, बायोमेट्रिक हजेरीचा बोजवारा

सेलू / जनमाध्यम : गावाच्या विकासासाठी शासन कोट्यवधींचा निधी खर्च करते. गावकऱ्यांच्या समस्या तातडीने मार्गी लागाव्यात म्हणून ग्रामपंचायत स्तरावर अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. मात्र, ज्यांच्यावर गावाच्या विकासाची आणि नागरिकांच्या प्रश्नांची जबाबदारी आहे, तेच कर्मचारी मुख्यालयात राहत नसतील, ग्रामसभांना उपस्थित राहत नसतील आणि जाब विचारणाऱ्या नागरिकांनाच उलट दमदाटी करीत असतील, तर प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. सेलू तालुक्यात ग्रामसेवक, पटवारी, कृषीसेवक आणि शिक्षकांच्या मुख्यालयी उपस्थितीचा प्रश्न ऐरणीवर आला असून, शासनाचे नियम केवळ कागदावरच असल्याचे चित्र ग्रामस्थांनी मांडले आहे.

सेलडोह येथील ग्रामसभेच्या प्रकाराने या कारभाराची पोलखोल केली आहे. २ ऑक्टोबर रोजी आचारसंहितेचे कारण देत ग्रामसभा झाली नव्हती. त्यानंतर आयोजित ग्रामसभेत प्रशासक आणि ग्रामसेवक ग्रामपंचायतीत उपस्थित असल्याचा दावा ग्रामस्थांकडून करण्यात येत असतानाही ते ग्रामसभेला उपस्थित राहिले नाहीत. अखेर रोजगार सेवकाकडून ग्रामसभेचे इतिवृत्त वाचून दाखवत सभा आटोपण्यात आल्याचा आरोप आहे.

ग्रामस्थांनी प्रशासक अजय वानखडे यांच्याकडे जाब विचारला असता आठ दिवसांत समस्या ऐकून घेण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, त्यानंतर ग्रामस्थांना विश्वासात न घेता ग्रामसभा उरकल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, प्रशासकांनी आपण उपस्थितच नव्हतो, अशी भूमिका घेतल्याचे सांगितले जात असताना ग्रामसेवकांकडून मात्र प्रशासक आले होते, असे सांगितले जात असल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.





ग्रामसेवक मुख्यालयात राहत नसल्याबाबत आणि वेळेवर उपस्थित राहत नसल्याबाबत नागरिकांनी विचारणा केली असता हलोडी येथील ग्रामसेवक मेघा थुल यांनी, 'तुम्ही कोण आमची विचारणा करणारे?' अशा शब्दांत उत्तर दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. 'मीच सरकार आहे, मुख्यालयी कोण राहते अशी भाषा वापरल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. लोकांच्या करातून वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांकडूनच नागरिकांना अशा प्रकारची वागणूक मिळत असेल, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा तरी कुणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बायोमेट्रिक हजेरीचा आदेश कुठे गेला

शासकीय कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून निर्धारित वेळेत कार्यालयात उपस्थित राहणे अपेक्षित आहे. बायोमेट्रिक हजेरीची व्यवस्था असतानाही तिची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप आहे. सकाळी ९.४५ वाजताच्या कार्यालयीन उपस्थितीच्या नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्याची जबाबदारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची आहे. मात्र, प्रत्यक्षात कर्मचारी मुख्यालयात आहेत की नाहीत, यावर नियमित नियंत्रण नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे.

कर्मचाऱ्यांना अभय कोणाचे

गावकऱ्यांनी समस्या मांडल्या की त्यांचे निराकरण करण्याऐवजी त्यांनाच उलट उत्तरे मिळत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे सेलू तालुक्यातील मुख्यालयी वास्तव्यासंबंधीचे नियम, बायोमेट्रिक हजेरी आणि ग्रामसभांना कर्मचाऱ्यांची उपस्थिती यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक तपासणी करावी. सेलडोह ग्रामसभेच्या प्रकाराची चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी विजय उराडे यांच्यासह ग्रामस्थांकडून होत आहे. शासनाचे नियम पाळायचे कर्मचाऱ्यांनी आणि त्यांची अंमलबजावणी करायची अधिकाऱ्यांनी; मग दोघेही जबाबदारी झटकत असतील तर ग्रामीण जनतेने दाद मागायची कुणाकडे हा प्रश्न आता सेलू तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक; स्वार गंभीर

साहूरच्या वसंतवाडी परिसरात भीषण अपघात; दुचाकीचा चक्काचूर, जखमीला नागपूरला हलविले

आष्टी शहीद जनमाध्यम : वर्धा-वरूड मार्गावर भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार कृष्णकुमार उन्होने (४७, रा. साहूर) गंभीर जखमी झाले. साहूर येथील वसंतवाडी परिसरात रात्री १०.३० वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. धडकेची तीव्रता एवढी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, १० नोव्हेंबर रोजी कार क्रमांक एमएच ४० बीई ९६६४ वर्धा येथून वरूडच्या दिशेने भरधाव वेगाने जात होती. याचदरम्यान साहूरच्या वसंतवाडी परिसरात कारने दुचाकी क्रमांक एमएच २७ एएच ३६४७ ला जोरदार धडक दिली. या धडकेत



दुचाकीस्वार कृष्णकुमार उन्होने रस्त्यावर फेकले गेले. त्यांना गंभीर दुखापत झाली असून दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्तबंबाळ अवस्थेतील जखमी उन्होने यांना तातडीने आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आल्याची माहिती आहे. सुदैवाने कारमधील सर्वजण सुखरूप असल्याचे समजते. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच आष्टी पोलीस ठाण्याचे ठाणेदार देविदास गजरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल सचिन सोनवणे आणि पोलीस चालक सचिन शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुढील तपासाची कार्यवाही सुरू केली आहे.

जिल्ह्यातील १,०९७ शस्त्रधारी आरोपींची पोलिसांकडून पडताळणी

२९२ आरोपी बेपत्ता; २३ जणांचा मृत्यू, २२४ आरोपी कारागृहात

वर्धा जनमाध्यम : जिल्ह्यात शस्त्रांचा वापर करून गुन्हे करणाऱ्यांवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले आहे. सन २०२१ पासून आतापर्यंत शस्त्र अधिनियम तसेच शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांत चाकू, तलवार यांसारख्या शस्त्रांचा वापर करणाऱ्या १ हजार ९७ आरोपींची माहिती संकलित करण्यात आली. या सर्व आरोपींच्या सद्यस्थितीची पडताळणी करण्यासाठी पोलिस विभागाने विशेष मोहीम राबविली.

पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम राबविण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेसह जिल्ह्यातील १९ पोलिस ठाण्यांनी यात सहभाग घेतला.

मोहिमेदरम्यान ७०६ आरोपींचे प्रत्यक्ष सत्यापन करण्यात आले. त्यापैकी ३६७ आरोपी पोलिसांना मिळून आले. तब्बल २९२ आरोपी नोंदविलेल्या पत्त्यावर आढळून आले नाहीत. तर २३ आरोपींचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. याशिवाय २२४ आरोपी सध्या कारागृहात बंद असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी मिळून आलेल्या आरोपींची चौकशी करून झडती घेतली. मात्र, कोणतीही आक्षेपार्ह वस्तू अथवा शस्त्र जप्त करण्यात आले नाही. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

समृद्धी महामार्गावर दरोडेखोरांची आता खैर नाही

वर्धा पोलिसांचा ६१ किलोमीटर महामार्गावर पहारा

वर्धा जनमाध्यम : समृद्धी महामार्गावर प्रवाशांना लक्ष्य करून होणाऱ्या जबरी चोरी, दरोडे आणि वाहनचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी वर्धा पोलिसांनी कंबर कसली आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या ६१ किलोमीटर महामार्गावर पोलिसांचा विशेष वॉच राहणार असून, संपूर्ण मार्गाचे ११ बीटमध्ये विभाजन करण्यात आले आहे. प्रत्येक बीटसाठी स्वतंत्र पोलीस अंमलदार आणि पोलीस उपनिरीक्षक दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. त्यामुळे महामार्गावरील गुन्हेगारी टोळ्यांसह संशयितांच्या हालचालींवरही पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

समृद्धी महामार्गावरील वाढत्या गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालकांनी विशेष उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा जिल्हा पोलिसांनी स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा उभारली आहे. सिंदी रेल्वे, सेलू, सावंगी आणि पुलगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून हा महामार्ग जातो. प्रत्येक पाच ते सहा किलोमीटर अंतराचा एक बीट तयार करण्यात आला असून, संबंधित ठाणेदारांकडे पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

महामार्गाचे चेनज मॅपिंग करून त्यालगतच्या आस्थापनांची पाहणी करण्यात आली आहे. तसेच महामार्गालगतच्या गावांमधील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्ती, कारागृहातून सुटलेले आरोपी, दरोडे, सशस्त्र दरोडे, वाहनचोरी तसेच चोरीचा माल खरेदी-विक्री करणाऱ्यांची माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वारंवार गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईसह एमपीडीएअंतर्गत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

चोरीचा माल खरेदी करणारेही पोलिसांच्या रडारवर

केवळ दरोडेखोरांवरच नव्हे, तर चोरीचा माल स्वीकारणाऱ्या आणि त्याची विक्री करणाऱ्यांवरही पोलिसांचा विशेष लक्ष राहणार आहे. भंगार व कवाड विक्रेते, जुने मोबाईल आणि वाहनांचे सुटे भाग विक्रेते तसेच अनधिकृत इंधन विक्री केंद्रांची नोंदणी व पडताळणी केली जाणार आहे. या सर्व घटकांच्या व्यवहारांवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येणार आहे.या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी ११ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांची बैठक घेण्यात आली. यावेळी अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, संबंधित पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, महामार्ग पोलीस, एमएसआरडीसी आणि एमएसएफचे अधिकारी उपस्थित होते.

संशयित दिसल्यास ११२ वर संपर्क साधा

समृद्धी महामार्गालगतच्या गावांमध्ये किंवा महामार्गावर संशयास्पद व्यक्ती आढळल्यास नागरिकांनी तातडीने डायल ११२ किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वर्धा पोलिसांनी केले आहे. महामार्गावरील प्रवाशांची सुरक्षितता आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आता पोलिसांची विशेष यंत्रणा सक्रिय झाली आहे.

एकाच भूमिपूजनाच्या दोन पत्रिका; सरकारी पत्रिकेत खासदार, भाजपच्या पत्रिकेतून गायब

वेळही वेगळी, पाहुणेही वेगळे; अमर काळेंचा प्रशासनाला प्रश्न

पवणारच्या भूमिपूजनावरून राजकीय वादंग

वर्धा । जनमाध्यम : सरकारी पैसा जनतेचा, योजना सरकारची आणि विकासकामाचे भूमिपूजनही शासकीय मात्र या कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी निघालेल्या पत्रिका दोन आणि त्यातील पाहुण्यांची यादीही दोन एका पत्रिकेत पालकमंत्री, खासदार आणि प्रशासकीय अधिकारी, तर दुसऱ्या पत्रिकेत खासदारांसह अधिकाऱ्यांनाच डच्चू देत भाजपच्या पदाधिकारी आणि नेत्यांना स्थान एवढेच नव्हे, तर कार्यक्रमाच्या वेळेतही अर्ध्या तासाचा फरक. पवणार येथील या प्रकाराने शासकीय शिष्टाचार आणि राजकीय श्रेयवादाचा प्रश्न ऐरणीवर आला





आहे. 'कार्यक्रम एक, पत्रिका दोन' असा प्रश्न खासदार अमर काळे यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्र राज्य महसूल विभागाच्या माध्यमातून मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेंतर्गत पवणार येथे भूमिपूजन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या अधिकृत पत्रिकेत पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह प्रमुख उपस्थितीमध्ये खासदार अमर काळे, प्रशासकीय अधिकारी आणि अन्य लोकप्रतिनिधींची नावे होती. मात्र, याच कार्यक्रमासाठी भाजपने स्वतंत्र पत्रिका प्रकाशित केली. त्यावर स्वर्गीय दत्ताजी मेघे यांच्या जयंतीनिमित्त भूमिपूजन समारंभ असा उल्लेख करण्यात आला. या पत्रिकेत खासदार अमर काळे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची नावे गायब होती. त्यांच्या जागी भाजपच्या पदाधिकारी आणि नेत्यांची नावे झळकत होती. भाजपच्या पत्रिकेत सकाळी ८ वाजता, तर सरकारी पत्रिकेत ८.३० वाजता कार्यक्रमाची वेळ नमूद करण्यात आली होती.

खासदारांचा प्रश्न; सरकारी कार्यक्रम की पक्षीय सोहळा- शासकीय निधीतून होणाऱ्या विकासकामाच्या कार्यक्रमाला स्वतंत्र पक्षीय स्वरूप देण्याची गरज काय शासनाच्या पत्रिकेत असलेल्या खासदारांना दुसऱ्या पत्रिकेतून वगळण्याचा निर्णय कुणाचा? प्रशासकीय अधिकाऱ्यांची नावेही का हटविण्यात आली असा प्रश्न खासदार अमर काळे यांनी उपस्थित केला. या प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. मग शासकीय कार्यक्रमाच्या निमंत्रणालाच पक्षीय रंग देण्याची गरज काय, हा प्रश्न पवणारच्या दोन पत्रिकांनी उपस्थित केला आहे.

वर्ध्यात १३ नोव्हेंबर रोजी नांदी संमेलन

डॉ. अभय बंग यांच्या हस्ते उद्घाटन; भूदान चळवळ, सामाजिक परिवर्तन आणि विनोबांच्या साहित्यिक योगदानावर होणार मंथन

वर्धा जनमाध्यम : आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या जीवनकार्याचा सामाजिक आणि साहित्यिक दृष्टिकोनातून वेध घेण्यासाठी वर्ध्यात १३ नोव्हेंबर रोजी विशेष साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यात जानेवारीत होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित ९९ नांदी संमेलनांच्या उपक्रमातील हे महत्त्वाचे संमेलन ठरणार आहे. स्थानिक लोक महाविद्यालयात शुक्रवारी 'आचार्य विनोबा भावे जीवनकार्य, विचार आणि साहित्य संमेलन' रंगणार आहे.

आचार्य विनोबा भावे यांचे जीवन, विचार , कार्य आणि साहित्य याला अधोरेखित करणारे असे सर्वस्पर्शी संमेलन प्रथमच होत असून मसाप पुणे , समर्थ युवा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्यशासनाचा मराठी भाषा विभाग, विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखा आणि लोकशिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा यांच्या पुढाकारातून होणाऱ्या या संमेलनाला उद्घाटक म्हणून ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग लाभले असून संमेलनाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार आहेत . याप्रसंगी स्वागताध्यक्ष मा. प्रदीप दाते माजी अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, प्रमुख पाहुणे मा. डॉ. नितीन संगमनेरकर कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि प्रमुख उपस्थिती मा. विलास मानेकर सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, मा. डॉ. राजेंद्र मुंढे, संमेलन कार्याध्यक्ष तथा शाखाध्यक्ष विदर्भ साहित्य संघ वर्धा हे असतील, तर उद्घाटन सत्राच्या उत्तरार्धात डॉ. गणेश राऊत, पुणे यांचे 'भूदान चळवळ आणि महाराष्ट्र' यावर विशेष व्याख्यान होईल.



दुसरे सत्र : दुपारी २ ते २.४५ वाजता एकपात्री सादरीकरण : मी सावित्री बोलतेय! सादरकर्ती: हर्षदा इंदाने, अकोट

तिसरे सत्र: दुपारी २.४५ ते ३.४५ वाजे दरम्यान होईल या या कथाकथन सत्रात

अध्यक्ष : डॉ. सतीश तराळ ज्येष्ठ कथाकार, अमरावती

कथाकार: मा. अ. भा. ठाकूर आर्णी , जि. यवतमाळ प्रा. मीनल रोहणकर वर्धा सहभागी होतील . तर समारोप सत्र: सायंकाळी ४ वा. असेल यात अध्यक्ष मा. प्रा. डॉ. गजानन कोटेवार अध्यक्ष, म.रा. ग्रंथालय संघ, मुंबई प्रमुख अतिथी मा. डॉ. नितीन संगमनेरकर कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मा. डॉ. विलासराव देशमुख माजी प्राचार्य, यशवंत महाविद्यालय, वर्धा, मा. डॉ. ललितकुमार वाघमारे, कुलगुरू, अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च, सावंगी मेघे, मा. प्रदीप दाते आणि डॉ. राजेंद्र मुंढे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

मा संमेलनास वर्धेकर साहित्य रसिकानी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे .

या संमेलनाच्या संयोजनात आयोजक संस्थेचे प्राचार्य डॉ. महेंद्र साहारे , सौ रंजना दाते , प्रा उल्हास लोहकरे , महेश मोकलकर, डॉ. राजेश देशपांडे आणि प्रा मोहन सोनुरकर यांचेसह विविध संघटनाचे प्रा. शेख हाशम, शेषराव बिजवार , मुरलीधर बेलखोडे, प्रा. मोहन गुजरकर, आकाश दाते परिश्रम घेत आहेत.

शेतजमिनीच्या व्यवहाराचे आमिष; दीड लाखांचा गंडा

पुलगाव जनमाध्यम : शेतजमिनीचा व्यवहार करून देण्याचे गाजर दाखवायचे, शेतकऱ्याचा विश्वास संपादन करायचा आणि इसारापोटी दीड लाख रुपये उकळायचे; मात्र प्रत्यक्ष खरेदीखताची वेळ येताच हात वर करायचे, असा प्रकार देवळी तालुक्यातील मौजा एकांबा येथील कथित जमीन व्यवहारात समोर आला आहे. खरेदीखतही नाही आणि दिलेले पैसेही परत नाहीत, अशा दुहेरी कोंडीत सापडलेल्या शेतकरी दिनेश श्यामराव घोडमारे यांनी पुलगाव पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणात श्रीहरी बिडकर, आरिफ कुरेशी, सय्यद अलीम अहमद सय्यद अमीरल्लाह यांच्यासह चार व्यक्तींच्या सहभागाचा आरोप करण्यात आला असून, चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी श्रीहरी बिडकर यांनी घोडमारे यांना एकांबा येथील शेतजमीन दाखवून व्यवहाराची माहिती दिली. त्यानंतर नाचणगाव येथे झालेल्या बैठकीत जमिनीची कागदपत्रे दाखविण्यात आली. ३० सप्टेंबरपर्यंत व्यवहार पूर्ण करून खरेदीखत करून देण्याचे आश्वासन देण्यात आले. जमिनीचा दर प्रतिएकर १२ लाख ५० हजार रुपये ठरविण्यात आला. व्यवहारावर विश्वास ठेवून घोडमारे यांनी एक लाख रुपये रोख, तर ५० हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने इसारापोटी दिले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

स्वच्छता सर्वेक्षण-२०२५, सुपर स्वच्छ लीगमध्ये नवी मुंबई अव्वल

सूरत दुसऱ्या क्रमांकावर; राजस्थानमध्ये जयपूर, मध्य प्रदेशात ग्वाल्हेर सर्वात स्वच्छ



नवी दिल्ली/वृत्तसंस्था- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी स्वच्छता सर्वेक्षण-२०२५ चे पुरस्कार प्रदान केले. यावेळी सुपर स्वच्छ लीगमध्ये नवी मुंबई पहिल्या, सुरत दुसऱ्या आणि आंध्र प्रदेशातील विजयवाडा तिसऱ्या स्थानावर राहिले. मागील सर्वेक्षणात सुपर स्वच्छ लीगमध्ये इंदूर पहिल्या, सुरत दुसऱ्या आणि नवी मुंबई तिसऱ्या स्थानावर होते. याशिवाय राजस्थानमधील जयपूर आणि मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर यांना सर्वात स्वच्छ शहरे घोषित करण्यात आले आहे. अहमदाबादला मेंटर सिटी श्रेणीत पहिले, इंदूरला दुसरे आणि तिरुपतीला तिसरे स्थान मिळाले. स्वच्छ शहर जोडी उपक्रमांतर्गत यांच्यासोबत अनुक्रमे साणंद, देपालपूर आणि कुप्पम यांना मेंटी सिटी बनवण्यात आले होते.

१. स्वच्छ शहर जोडी: मार्गदर्शक आणि मार्गदर्शन घेणाऱ्या शहरांसाठी नवीन पुरस्कार योजना.

२. रिव्हर टाउन/अर्बन रिव्हर फ्रंट्स: नदीकाठी वसलेल्या शहरांसाठी विशेष मूल्यांकन.

३. किनारी क्षेत्र: समुद्रकिनारी शहरांसाठी स्वतंत्र मूल्यांकन मॅट्रिक्स.

सात वर्षांच्या मेहनतीनंतर भोपाळ टॉप-२ मध्ये, आता शर्यतीतून बाहेर- ५० हजार ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या श्रेणीत देवासला प्रथम स्थान मिळाले आहे.५० हजार ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या श्रेणीत देवासला प्रथम स्थान मिळाले आहे. भोपाळने सलग सात वर्षांच्या मेहनतीनंतर मागील स्वच्छता क्रमवारीत देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात स्वच्छ शहर होण्याचा मान मिळवला होता. मात्र यावेळी शहराला राष्ट्रीय पुरस्कारांच्या शर्यतीत स्थान मिळाले नाही. यामागचे प्रमुख कारण आदमपूर छावणीत साचलेल्या सुमारे ५ लाख टन जुन्या कचऱ्याची विल्हेवाट न लागणे हे मानले जात आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात खटला सुरू आहे.

राजस्थानमध्ये जयपूरला सर्वात स्वच्छ शहराचा पुरस्कार- राजस्थानमधील कोणत्याही शहराचा कोणत्याही श्रेणीत टॉप ३ मध्ये समावेश झालेला नाही. मात्र, जयपूरला स्टेट फर्स्ट ऑफ स्वच्छ सिटी पुरस्कार मिळाला आहे. तसेच १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या देशातील स्वच्छ शहरांमध्ये जयपूरचा समावेश नाही. मागील वेळी जयपूर टॉप २० मध्ये होते.

३ लाख ते १० लाख लोकसंख्या असलेल्या स्वच्छ शहरांमध्ये चंदीगड दुसऱ्या क्रमांकावर

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ चे निकाल बुधवारी जाहीर करण्यात आले. यामध्ये चंदीगडने ३ लाख ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीत स्वच्छतेच्या बाबतीत देशभरात दुसरे स्थान मिळवले आहे. या श्रेणीत मध्य प्रदेशातील उज्जैनने पहिले स्थान पटकावले.

स्वच्छ सर्वेक्षणात शहरांचे मूल्यांकन ४३ वेगवेगळ्या निकषांच्या आधारे करण्यात आले. यामध्ये कचरा संकलन, ओला आणि सुका कचरा वेगवेगळ्या पद्धतीने हाताळणे, कचऱ्याची विल्हेवाट, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि स्वच्छता अभियानात लोकांचा सहभाग यांसारख्या बाबींचा समावेश आहे.

देशातील तिसरे सर्वात स्वच्छ शहर बनले लखनौ

लखनौ देशातील तिसरे सर्वात स्वच्छ शहर बनले आहे. स्वच्छ सर्वेक्षण- २०२५-२६ ची यादी जाहीर झाली आहे. यामध्ये लखनौला सर्वात स्वच्छ शहरांच्या यादीत तिसरे स्थान मिळाले आहे. गेल्या वर्षी लखनौने मोठी झेप घेत ४४व्या स्थानावरून तिसरे स्थान मिळवले होते. यावेळीही महानगरपालिकेने आपले स्थान कायम राखले आहे.स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये विशाखापट्टणमने प्रथम आणि जबलपूरने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. लखनौ या यादीत तिसऱ्या क्रमांकावर राहिले. हे सर्वेक्षणाचे दहावे पर्व होते. यात देशातील ४,७५१ हून अधिक शहरांचा समावेश करण्यात आला. शहरांची १० प्रमुख क्षेत्रे आणि ४३ निकषांवर तपासणी करण्यात आली.

ज्या रंगाचा चष्मा, त्या रंगाचेच जग दिसते

सोनिया गांधींच्या पुस्तकातील दाव्यावर अण्णा हजारेंची टीका

अहिल्यानगर/प्रतिनिधी- सन २०१२ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांना राष्ट्रीय पातळीवर आणण्यासाठी अण्णा हजारे यांच्या दिल्लीतील आंदोलनाची पायाभरणी केली असल्याचा दावा सोनिया गांधी यांनी आपल्या बिलॉगिन्ग : अ जर्नी ऑफ लव्ह (ँत्युग्हु:ँ व्दल्हाब दि थ्दन) या पुस्तकात केला आहे. तसेच समाजसेवक अण्णा हजारे यांनी केलेल्या या आंदोलनाला भाजपा व आरएसएस पाठिंबा असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे सोनिया गांधींच्या या पुस्तकाने नवा वाद निर्माण केला असून ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी मात्र ज्या रंगाचा चष्मा, त्या रंगाचे जग दिसते अशा शेलक्या शब्दात बुधवारी सोनिया गांधी यांना माध्यमांशी बोलताना प्रत्युत्तर



या आंदोलनात सहभागी असलेल्या काही प्रमुख व्यक्तींनी नंतर हे आंदोलन भाजप आणि संघाच्या पाठिंब्याने आयोजित करण्यात आल्याची कबुली दिल्याचं देखील पुस्तकात नमूद असल्याचा दावा केला जात आहे. या आंदोलनाचा प्रमुख मुद्दा असलेल्या लोकपाल विधेयकाबाबत देखील सोनिया गांधी यांनी भाष्य केले आहे.त्यामुळे या नव्या वादाला तोंड फुटले आहे. सन २०१४ मध्ये लोकपाल आणि लोकायुक्त कायदा मंजूर झाला. या कायद्यानुसार केंद्रात लोकपाल आणि राज्यांमध्ये लोकायुक्तांची व्यवस्था करण्यात आली. सार्वजनिक पदांवरील व्यक्तींविरोधात भ्रष्टाचाराच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी ही यंत्रणा निर्माण करण्यात आली. मात्र, भाजप सत्तेत आल्यानंतर ही व्यवस्था प्रभावीपणे काम करू शकली नाही, अशी टीका देखील पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. सोनिया गांधी यांनी केलेल्या दाव्यानुसार, सरकार विरोधातील आंदोलनाचा राजकीय उद्देश सध्या झाल्यानंतर अण्णा हजारे आणि त्या आंदोलनाची चर्चा हळूहळू कमी झाली होती. या आंदोलनाच्या काळात आरएसएस पडद्यामागे नरेंद्र मोदी यांना राष्ट्रीय पातळीवर पुढे आणण्याची तयारी करत होता असा दावा देखील सोनिया गांधी यांनी पुस्तकात केला आहे.समाजसेवक अण्णा हजारे यांनी देशातील भ्रष्टाचाराविरोधात दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर २०१२ मध्ये आंदोलनाची सुरुवात केली होती. या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात सामान्य जनतेचा पाठिंबा मिळाला होता. तसेच तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर अनेक गंभीर आरोप देखील करण्यात आले होते. आता काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी या आंदोलनावर मोठा दावा केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.ज्या रंगाचा चष्मा, त्या रंगाचेच जग दिसते. त्यांचा चष्माच त्या रंगाचा असेल तर त्यांना वेगळे काय दिसणार? कोण काय म्हणतो, यापेक्षा समाज काय म्हणतो हे महत्त्वाचे आहे. मी कधीही कोणत्याही पक्षाच्या किंवा पार्टीच्या जवळ गेलो नाही, मी फक्त समाज आणि देश पाहिला. कोण निंदा करतो किंवा वंदन करतो, याकडे लक्ष न देता आपण आपले काम करत राहिले पाहिजे. कोण काय बोलते यापेक्षा समाज आपल्याकडे काय पाहतो.

महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

समुद्रकिनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय 'ब्ल्यू फ्लॅग' पुरस्कार

मुंबई - महाराष्ट्राच्या शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक पर्यटनाच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळाले आहे. आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग ज्युरीने २०२६-२७ या हंगामासाठी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील लाडघर व गुहागर आणि रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन या तीन समुद्रकिनाऱ्यांना प्रथमच प्रतिष्ठेचा 'इंटरनॅशनल ब्ल्यू फ्लॅग' पुरस्कार जाहीर केला आहे. या यशामुळे महाराष्ट्राने आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग समुद्रकिनाऱ्यांच्या यादीत प्रथमच स्थान मिळवले आहे.पर्यावरण संवर्धन, समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, जैवविविधतेचे संरक्षण, पर्यटकांची सुरक्षितता, आवश्यक पायाभूत सुविधा आणि शाश्वत पर्यटन व्यवस्थापन या आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता केल्याबद्दल या समुद्रकिनाऱ्यांना हा सन्मान प्राप्त झाला आहे. या महत्त्वपूर्ण यशामागे राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, पर्यटन विभाग, संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, बीच मॅनेजमेंट



कमिटी तसेच स्थानिक नागरिक आणि विविध यंत्रणांचे समन्वित प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले आहेत. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला असून महाराष्ट्राच्या विस्तीर्ण किनारपट्टीवरील इतर पात्र समुद्रकिनाऱ्यांचाही आंतरराष्ट्रीय दर्जानुसार विकास करण्यासाठी ब्ल्यू फ्लॅग कार्यक्रमाचा उपयोग करण्यात येणार आहे. यामुळे किनारपट्टीवरील पर्यावरण संरक्षणासोबतच स्थानिक रोजगार, पर्यटन व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल.नव्याने पुरस्कारप्राप्त या तिन्ही समुद्रकिनाऱ्यांचा ब्ल्यू फ्लॅग हंगाम १५ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होणार आहे. या पुरस्काराचे प्रतीक असलेले प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग नेदरलँड्स येथून प्राप्त होत असून ते राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. त्यानंतर संबंधित विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन आहे. देशात २०२६-२७ हंगामासाठी एकूण २२ समुद्रकिनाऱ्यांना ब्ल्यू फ्लॅग मान्यता मिळाली असून, त्यामध्ये १३ समुद्रकिनाऱ्यांचे नूतनीकरण आणि ९ नवीन समुद्रकिनाऱ्यांचा समावेश आहे.

अजित दादांनंतर पक्षाचा कोण वाली राहिलेला नाही

दानवेंचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई/प्रतिनिधी- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारवर विविध राजकीय व सामाजिक मुद्द्यांवरून जोरदार शब्दांत टीका केली आहे. दिवंगत नेते अजित पवार यांच्या गटातील आमदारांना निराधार म्हणत, या आमदारांना आता कोणताही वाली उरलेला नाही, असा बोचरा टोला त्यांनी लगावला. या गटात गेल्यानंतर त्यांचे वजन कमी झाले असून हे आमदार आता स्वतःचे राजकीय भवितव्य शोधत असल्याची शक्यता दानवे यांनी वर्तवली. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीतील कथित अनियमितता आणि सरकारी हस्तक्षेपावरही त्यांनी कडक ताशेरे ओढले. जनतेने महायुतीला पराभूत केले असले तरी, लोकशाहीचा खून करून अध्यक्ष निवडल्याचा गंभीर आरोप दानवे यांनी केला. अध्यादेश काढून संचालक नेमण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, हा धोका केवळ गोकुळपुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील इतर सहकारी संस्थांपर्यंतही पोहोचू शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.



तसेच, अन्नदात्या शेतकऱ्यांच्या समस्यांवरूनही त्यांनी सरकारला धारेवर धरले. सोनिया गांधींच्या पुस्तकाचा संदर्भ देत दानवे यांनी अण्णा हजारेंचे आंदोलन हे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने घडवून आणलेले षडयंत्र असल्याचा दावा केला. यासोबतच, काँग्रेस नेते जयराम रमेश यांच्या मागणीला दुजोरा देत, राम मंदिराच्या देणग्यांमधील कथित गैरव्यवहारांची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

केंद्र व राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधार देत दुष्काळावर मात करणार -केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

लाडकी बहीण, पीएम किसान, कर्जमाफी आणि नदीजोड प्रकल्पातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न

बुलढाणा/प्रतिनिधी- अल-निनोच्या प्रभावामुळे राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, खरिपाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरी, महिला आणि ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक आधार देऊन दुष्काळावर मात करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. खामगाव तालुक्यातील अतिदुर्गम व डोंगराळ घारोड गावात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. साऊ एकल महिला पुनर्वसन समितीच्या वतीने आयोजित भाऊबीज कार्यक्रमानिमित्त दि. १० नोव्हेंबर रोजी रात्री केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी घारोड येथे भेट देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी एकल निराधार महिला देवकाबाई अढाव आणि दुर्गा अनंता कड यांच्या घरी भेट देत त्यांच्यासोबत भाऊबीज साजरी केली.

यावेळी बोलताना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा आर्थिक मदत मिळत असून, दुष्काळाच्या परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ही योजना मोठा आधार ठरत आहे. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये दिले जातात. राज्य शासनानेही त्यात अतिरिक्त मदतीची भर घातली आहे. तसेच दिवाळी अग्रीम म्हणून पाच हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात आले आहेत. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन विविध स्तरांवर उपाययोजना करीत आहे.

शेतकऱ्यांना आर्थिक मदत



देण्याबरोबरच कर्जमाफी, नदीजोड प्रकल्प आणि जलसंधारणाच्या माध्यमातून दीर्घकालीन उपाययोजना करण्यावरही शासनाचा भर आहे. पाण्याची उपलब्धता वाढवून शेतीला सिंचनाची सुविधा मिळावी आणि भविष्यातील दुष्काळी परिस्थितीचा प्रभाव कमी व्हावा, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी देवकाबाई अढाव यांच्या घरी जाऊन भाऊबीजेची ओवाळणी स्वीकारली आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. एकल निराधार महिलेला भाऊ म्हणून आधार देण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच शेतकऱ्यांसोबत बसून त्यांच्या शेतीतील अडचणी, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, कर्जाचा बोजा आणि शासनाकडून मिळालेल्या मदतीबाबत सविस्तर चर्चा केली.

घारोड हे अतिदुर्गम डोंगराळ भागातील गाव असून, दुष्काळाचा मोठा फटका येथील शेतकऱ्यांना बसला आहे. अशा परिस्थितीत केंद्रीय राज्यमंत्र्यांनी थेट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दिवाळी साजरी केल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण होते. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्या केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर मांडण्यासाठी अशा संवादात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. दरम्यान, घारोड गावातील पाणीपुरवठा योजनेच्या अपूर्ण कामासंदर्भातही महत्त्वपूर्ण निर्णयाची माहिती देण्यात आली. जलजीवन मिशनअंतर्गत अपूर्ण असलेल्या पाणीपुरवठा योजनेस राज्य शासनाच्या पाणीपुरवठा विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या मंजुरीचे पत्र केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच वैभव ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी सरपंच वैभव ठाकरे, अमोल अंधारे, राजेंद्र बघे, साऊ एकल महिला पुनर्वसन समितीचे जिल्हा समन्वयक तथा इलेक्ट्रॉनिक मीडिया पत्रकार सचिन ठाकरे, अक्षय मातनकार, राजेश कड, अनंता नरवाडे यांच्यासह समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

ऐन दिवाळीत पंतप्रधान मोदींची शेतकऱ्यांसाठी मोठी भेट; खत अनुदानास मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- रब्बी हंगाम २०२६-२७ साठी फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खतांवरील 'पोषकद्रव्य आधारित अनुदाना'च्या सुधारित दरांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. १ ऑक्टोबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सरकारने तब्बल ६२,३७०.०२ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद केली आहे. मागील रब्बी हंगाम २०२५-२६ च्या ३७,९५२.२९ कोटी रुपयांच्या तरतुदीच्या तुलनेत ही रक्कम २४,४१७.७३ कोटी रुपयांनी अधिक आहे. पीआयबीकडून याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या आणि कच्च्या मालाच्या किमतीत सातत्याने चढ-उतार होत असतानाही, देशातील शेतकऱ्यांना डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) आणि एनपीकेएसच्या विविध ग्रेडची खते वाजवी आणि परवडणाऱ्या दरात मिळावीत, यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचे केंद्र सरकारच्या वतीने सांगण्यात येत आहे.

'जागतिक संकटातही बळीराजाला दिलासा'

मंत्रिमंडळाच्या या निर्णयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स' वर पोस्ट करत म्हटले की, सरकारने नेहमीच शेतकऱ्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले. 'जगातील प्रतिकूल आणि कठीण परिस्थितीमध्येही बळीराजाचे जीवन सुकर करण्यासाठी आम्ही कोणतीही कसर सोडत नाही आहोत,' असे पंतप्रधानांनी नमूद केले. आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढीचा फटका शेतकऱ्यांना बसू नये आणि त्यांना वाजवी दरात खतांचा अखंड पुरवठा व्हावा, यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



डीएपी आणि एनपीकेएस खतांचे दर नियंत्रणात राहणार

मंजूर करण्यात आलेल्या नव्या रचनेनुसार, रब्बी २०२६-२७ हंगामासाठी अधिसूचित केलेल्या दरांनुसार खत कंपन्यांना पी अँड के खतांवर (ज्यामध्ये डीएपी आणि एनपीकेएसच्या विविध ग्रेडचा समावेश आहे) अनुदान वितरित केले जाईल.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा जाणवणार नाही आणि परवडणाऱ्या किमतीत खते उपलब्ध होतील, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. हे अनुदान थेट खत उत्पादक आणि आयातदारांना दिले जाते, जेणेकरून ते शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात खतांची विक्री करू शकतील.पोषकद्रव्य आधारित अनुदान योजना नेमकी काय आहे?

केंद्र सरकार सध्या खत उत्पादक आणि आयातदारांच्या माध्यमातून डीएपीसह पी अँड के खतांचे २८ प्रकार (ग्रेड्स) शेतकऱ्यांना अनुदानित दरात उपलब्ध करून देते. ही योजना एप्रिल २०१० पासून लागू आहे. या प्रणालीअंतर्गत सरकार खतांमध्ये असलेल्या नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश आणि सल्फर या पोषक घटकांनुसार प्रति किलो अनुदानाचे दर निश्चित करते.

या दरांच्या आधारे खत कंपन्यांना सरकारकडून अनुदान दिले जाते, ज्यामुळे बाजारपेठेत या खतांचे किरकोळ दर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्यात राहतात. सध्या जागतिक पातळीवर युरिया, डीएपी, म्युरिएट ऑफ पोटॅश (एमओपी) आणि सल्फरच्या किमतींमध्ये होत असलेले बदल लक्षात घेऊन ही दरवाढ मंजूर करण्यात आली आहे. रब्बीच्या पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक पोषकद्रव्ये योग्य भावात मिळावीत, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

दुष्काळातही दोन दिवाळ्या!

यक्षरात्री, दीपालिका, दीपमाला ही या सणाची नागर रूपे वसुबारसपासून सुरू होणाऱ्या अनागर सणाइतकीच जुनी. पण यंदाच्या दुष्काळामुळे त्यांतील तफावत दाहक 'इडा-पीडा टळो, बळीचे राज्य येवो', ही प्रार्थना आजच्या इतकी करुण आणि पोकळ कधीही वाटली नसणार. बलिप्रतिपदेला पुजला जाणारा बळीराजा आज बहुजनांच्या अस्मितेचे प्रतीक म्हणून उभा आहे. सांस्कृतिक घुसळणीत जुन्या प्रतीकांना नवे अर्थ दिले जातात,नवी मिथके तयार केली जातात. बळीराजाच्या पौराणिक कथेचेही ते होऊन, ही कहाणी म्हणजे दोन संस्कृतींमधील वा वर्णांतील संघर्षाचा इतिहास अशा दृष्टीने पाहिली जात आहे. यातील बळीराजा हा येथील शेतांचा स्वामी, 'बळीचे राज्य' म्हणजे शेतकऱ्यांचे राज्य अशी एक बहुजनप्रिय मांडणी आहे. शेतकऱ्यास बळीराजा संबोधण्याच्या या प्रथेत त्याच्या गौरवाचा कितीही प्रामाणिक भाव असला, तरी आज व्यवहारात या बिरुदास काडीमात्र किंमत नाही. वर्तमानावर नजर टाकली तरी हे वास्तव लक्षात येईल. हे वर्तमान आहे दुष्काळाचे आणि दिवाळीचे.गेल्या काही दशकांतील सांस्कृतिक सपाटीकरणाच्या रेट्याने आपल्याकडील अनेक सणांचे जे झाले तेच दिवाळीचेही झाले. या सणाची दोन रूपे. नागर संस्कृतीमध्ये तो प्रकाशाचा सण आहे. त्यालाही सुमारे दोन हजार वर्षांची परंपरा आहे. त्याचा एक उल्लेख वात्सायनाच्या 'कामसूत्रा'त येतो. ते इसवी सनाच्या पहिल्या ते चौथ्या शतकादरम्यानचे. त्यात हा सण 'यक्षरात्री' म्हणजे 'दीपालिका' म्हणून येतो. कनौजचा सम्राट हर्ष याने सातव्या शतकात लिहिलेल्या 'नागानंद' या नाटकात त्यास 'दीपप्रतिपदुत्सव' म्हटलेले आहे. आठव्या शतकातील 'नीलमत' या काश्मिरी पुराणात 'दीपमाला' नामक सण सांगितलेला आहे. सर्वत्र दिव्यांची, पुष्पमालांची आरास, ब्राह्मण आणि दासांना नव्या कोऱ्या वस्त्रांचे दान, प्रियजनांना वस्त्रांची भेट, नवे कपडे परिधान करणे, दागिन्यांनी सजणे ही 'दीपमाला' साजरी करण्याची रीत. आजही दीपावलीच्या उत्सवात याच रीतीचे काही अंश दिसतात. या सणाचे दुसरे रूप आहे अनागर. त्यात तो शेतीशी निगडित आहे. 'दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी' हे दीपावलीत आजही म्हटले जाणारे लोकगीत/कृषीगीत. ते या सणाचे अनागरत्व, कृषी संस्कृतीशी असलेले नाते अधोरेखित करते. दिवाळीतील पहिला सण हाही पुन्हा वसुबारस आहे. यात अवैदिक मानल्या जाणाऱ्या बळीराजाचेही पूजन केले जाते. याच बरोबर या उत्सवाचा संबंध शेतीच्या चक्राशीही आहे. पावसाळी हंगाम संपून, नवे पीक हातात येण्याचा हा काळ. तो शेतकरी मोठ्या थाटामाटात साजरा करतो.यंदा दुष्काळाने तो सर्व थाटमाट हिरावून घेतला. तसा महाराष्ट्राला दुष्काळ नवा नाही. इतिहासात डोकावून पाहिले, तर येथील शेतकऱ्यांनी सलग १२ वर्षांचा दुर्गादेवीचा दुष्काळ, पंधराव्या शतकातील दामाजीपंतांचा दुष्काळ, 'बहु कष्टले कष्टले कितीयेक मेले वीसा लोकांत लोकांत एकचि राहिले' असे समर्थांनी ज्याचे वर्णन केले आहे तो सतराव्या शतकातला 'थोरला' दुष्काळ या भूमीने सोसलेला आहे. गावेच्या गावे ओस करणाऱ्या १९७२ च्या दुष्काळाच्या कटूभीषण आठवणी अजूनही अनेकांच्या स्मरणात आहेत. या वर्षीचा दुष्काळ त्याहून भयावह असल्याचे जाणकार सांगतात. राज्यातील ३५८ पैकी ३०५ तालुके दुष्काळाने ग्रासलेले आहेत. शेते करपली आहेत. जलसाठे खपाटीस गेले आहेत. विंधन विहिरी आटल्या आहेत. प्यायला पाणी नाही. टँकरांच्या येरझारा जोरात सुरू आहेत. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आता उभा राहील. आणि अजून चैत्र-वैशाख तर दूर आहे. याची मोठी झळ नेहमीप्रमाणेच बसली ती मराठवाड्यास. त्या प्रदेशात दुष्काळाचा अनुशेष तेवढा कधीच शिल्लक राहात नाही. या दुष्काळाच्या किती तरी वेदनादायी कहाण्या माध्यमांतून समोर येत आहेत. कुठे वाळलेल्या पिकांवर नांगर घालणारे शेतकरी आहेत आणि बापाने कुठे गळफास घेऊ नये यासाठी सतत त्याच्या मागेमागे जाणारे शाळकरी पोर आहे. कुठे शाळेचे 'बुक' घ्यायचे पण घरात दमडी नाही म्हणून रडणारा मुलगा आणि शरमेने पाणीपाणी झालेला त्याचा बाप आहे. अशा परिस्थितीत त्या आनंदाच्या, प्रकाशाच्या सणाचे काय?या दुष्काळग्रस्त महाराष्ट्रात यंदा दोन दिवाळ्या होत्या की काय असे वाटावे असे वातावरण आहे. एकीकडे असा महाराष्ट्र, की जेथून बाजारपेठांत ग्राहकांची गर्दी उसळल्याच्या, दिवाळी खरेदीला (त्यात फटाके आलेच) उधाण आल्याच्या बातम्या आहेत. हा खरेदी सोहळा दिवाळीतलाच असेही नाही. याआधी दसऱ्याच्या आगेमागे वाहन उद्योगाने नवा विक्रीविक्रम प्रस्थापित केला होता. नवरात्रोत्सवातील तुळजाभवानी मंदिरातील 'उत्पन्ना'ची आकडेवारीही अशीच चक्रावून टाकणारी. तेव्हाही दुष्काळ होताच. पण त्यातही सात कोटी ३० लाख रुपयांहून अधिक रक्कम या काळात मंदिराच्या तिजोरीत जमा झाली. गेल्या वर्षीच्या नवरात्रोत्सवाच्या तुलनेत ही रक्कम १.७५ लाखांनी अधिक आहे. अन्य मंदिर-संस्थानांच्या उत्पन्नाची आकडेवारी याहून वेगळी नसणार. एरवी त्याचे काही कोणास वाटले नसते. कोणी कधी काय खरेदी करावे हा ज्याचा-त्याचा, त्याच्या-त्याच्या ऐपतीचा प्रश्न. इतरांस त्याचे मुळीच वैषम्य वाटण्याचे कारण नाही. प्रश्न एवढाच, की हे कोण आहेत?हा महादुकानांत, बाजारपेठांत, वाहनविक्री दुकानांत आणि सराफी पेढ्यांत दिसणारा भारत आहे दहा टक्क्यांचा. देशाच्या एकूण उत्पन्नाचा ५८ टक्के वाटा खिशात घेऊन फिरणाऱ्यांचा. देशाच्या एकूण संपत्तीपैकी ४० टक्क्यांहून अधिक संपत्ती असणाऱ्या एक टक्क्यांचा. सातव्या वेतन आयोगाने दिलेल्या भरगच्च वेतनचिठ्ठ्या मिरवणाऱ्या नोकरदारांचा आणि ग्रामीण अर्थकारणावर मांड ठोकून बसलेल्या मोजक्या सधन बागायतदारांचा. यात महिन्याला हजार रुपयांचा 'सन्मान निधी' मिळणारे ९१ लाख १२ हजार ७६५ महाराष्ट्रीय शेतकरी नाहीत. मासिक दीड हजार रुपये मिळणाऱ्या सुमारे एक कोटी ६५ लाख लाडक्या बहिणी नाहीत. मोफत शिधा घेणारे सुमारे सहा कोटी 'लाभार्थी' नाहीत की पाच हजार रुपयांची 'अग्रिम मदत' घेणारे ८७ लाखांहून अधिक दुष्काळग्रस्त शेतकरी नाहीत. दुष्काळामुळे ज्यांची हातातोंडाची गाठ पडत नाही असे हे लक्षावधी लोक. त्यांच्याशी दिवाळी भांडलेली आहे, असे नाही. परंपरा आहे. लोकापवादाचे भय आहे. भावकीतील सन्मानाचा प्रश्न आहे. त्यांच्याही घरी गोडधोड झाले. फटाक्यांच्या एक-दोन सरी फुटल्या. पण ही वेगळीच दिवाळी होती. अल्पभूधारकांची, जिरायती शेतकऱ्यांची, 'बळीराजा'ची दिवाळी.तिला दुष्काळाचा मोठा फटका बसला, यात नवल नाही. जेथे एकूण शेतीपैकी सुमारे ८० टक्के क्षेत्र जिरायती असते, तेथे पावसाने डोळे फिरवल्यानंतर हेच होणार असते. प्रश्न आहे तो हे चित्र कधी बदलणार? कर्जमाफी आणि वीजबिलमाफी हे त्यावरील तोडगे नाहीत. 'सन्माननिधी' नामक मिंधेपणा देणारी योजना हे त्यावरील उत्तर नाही. यातून बळीराजा सक्षम नाही होत. तो केवळ शासनाचा 'लाभार्थी' बनतो. शेतीविषयक धोरणांतील सुधारणा, सिंचनक्षमतेतील वाढ, भांडवल पुरवठ्याची सक्षम आणि सुलभ यंत्रणा, शेतमाल प्रक्रिया उद्योगांची, शीतगृहांची साखळी अशा विविध उपाययोजनांशिवाय बदल संभवत नाहीत, हे अनेक तज्ज्ञांनी, अभ्यासकांनी कानीकपाळी ओरडून सांगितलेले आहे. पण लक्षात कोण घेतो? ते जोवर लक्षात घेतले जात नाही, तोवर महाराष्ट्रात दिन दिन नव्हे, तर दोन दोन दिवाळी साजरी होत राहणार.

भातुकलीचा खेळ खेळणारे नेतृत्व

भारतीय मतदाराचा सूज्ञपणा लक्षात येण्याएवढा राहुल गांधी यांच्या आकलनाचा पैस व्यापक नाही. बिहारमधील अनेक मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळली गेली असा प्रचार राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेऊन केला होता. मात्र तक्रार करण्यास बिहारमधील एकही मतदार न्यायालयापर्यंत गेला नाही.



देशाच्या राजधानीत राहुल गांधी हे दररोज आपल्या अकलेचे दिवाळे निघाल्याचे दररोज दाखवून देत आहेत. यासाठी ते मनोरंजनाचे प्रयोग दररोज सादर करत आहेत. १४० वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या काँग्रेस पक्षाच्या अब्रूची लक्तरे आपण दररोज वेशीवर टांगत आहोत, हेही काँग्रेसच्या सध्याच्या नेतृत्वाला उमजेना झाले आहे. ज्या लोकशाहीसाठी काँग्रेसने ब्रिटिशांशी लढा दिला त्याच लोकशाहीचे राहुल गांधींकडून दररोज वस्त्रहरण होत आहे. यातील दुर्दैवाचा भाग म्हणजे काँग्रेस नेतृत्वाला चार उपदेशाचे बोल सुनावण्याचे धाडस एकही ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत दाखवत नाही. याला अपवाद एकच, तो म्हणजे इंडियन एक्स्प्रेसच्या स्तंभलेखिका तवलीन सिंह यांचा. गेल्या अडीच वर्षांत राहुल गांधींनी संसदेचे एकही अधिवेशन शांततेत पार पाडू दिलेले नाही. प्रत्येक अधिवेशनात सभात्याग करून, गोंधळ घालून राहुल गांधींनी आपल्याला लोकशाहीशी काहीच देणेघेणे नसल्याचे दाखवून दिले होते.

संसदेचे कामकाज बंद पाडल्याशिवाय आपली आक्रमक विरोधी पक्षनेता अशी प्रतिमा जनतेच्या मनात ठसणार नाही, अशी समजूत करून घेऊन राहुल गांधी हे संसद कामकाज बंद पाडत आहेत. बाहेर मेळावे घेऊन, सभा घेऊन राजकीय पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन जरूर करता येते. मात्र विविध विषयांवर, सरकारी विधेयकांवर आपली बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी विरोधकांनी संसद कामकाजात भाग घेणे अपेक्षित असते. लोकशाहीने विरोधकांना सरकारला कोंडीत पकडण्यासाठी विविध नियमांद्वारे आयुधे दिली आहेत. या आयुधांचा प्रभावी वापर करत एखाद्या विधेयकावर असलेले आक्षेप संसदेच्या व्यासपीठावर प्रभावीपणे मांडता येतात. संसदेतील चर्चा ही केवळ सरकारी उपचाराचा भाग नसते. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, बॅ. नाथ पै, प्रा. मधु दंडवते, पिलू मोदी, मधु लिमये, चंद्रशेखर, सोमनाथ चटर्जी, सुषमा स्वराज यांसारख्या मंडळींनी विरोधी पक्षात असताना संसदेतील चर्चेद्वारे, संसदीय आयुधांच्या आधारे त्यावेळी सत्तेत असलेल्या प्रबळ काँग्रेस पक्षाला अनेकदा माघार घेणे भाग पाडले होते. संसदेतील प्रश्नोत्तराचा तास हा सरकारला अडचणीत आणण्याची नामी संधी असते. जागरूक विरोधक या प्रश्नोत्तराच्या तासाचा वापर करून सरकारला कोंडीत पकडू शकतात. अशा पद्धतीने बौद्धिक चर्चेत भाग घेऊन आपण सरकारला कोंडीत पकडू शकत नाही, हे राहुल गांधींच्या केव्हाच लक्षात आले असावे. यामुळेच त्यांनी संसदेतील चर्चामध्ये सहभागी न होण्याचा 'बुद्धिमान' मार्ग पत्करला असावा. त्यांच्या पक्षात शशी थरूर यांच्यासारखे बुद्धिमान नेते आहेत. हे नेते संसदेतील चर्चेत भाग घेऊन काँग्रेस पक्षाची भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडू शकतात. मात्र राहुल गांधींच्या अडेलतट्टूपणामुळे शशी थरूर यांच्यासारख्यांना महत्त्वाच्या विधेयकांवरील चर्चेमध्ये भाग घेण्याची संधीच मिळत नाही.

संसद कामकाजात गंभीरपणे भाग घेण्याची कुवत नसलेल्या राहुल गांधींनी अलिकडेच मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर अभिरूप संसद (मॉक पार्लमेंट) आयोजित केली होती. संसद कामकाजात प्रत्यक्ष भाग घेऊन मतदार यादी पुनरीक्षणाबाबतचे आक्षेप राहुल गांधींना संसदेत मांडण्याची चांगली संधी होती. अशा संधीचा सदुपयोग करण्याची बुद्धी राहुल गांधींना का होत नसेल, असा प्रश्न बुद्धिदात्या गणरायालाही पडला असेल. पत्रकार परिषदा, सभा मेळावे यामध्ये आपल्या ज्ञानाचा 'प्रचंड उजेड' पाडण्यात राहुल गांधींना मोठा आनंद मिळतो. जुलैमध्ये काही विद्यार्थ्यांनी नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीविरोधात आंदोलन केले होते. नीट परीक्षा व्यवस्थेतील प्रणाली सुधारणेसाठी मोदी सरकार वेगवेगळे निर्णय घेत होते. अशा प्रसंगी या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी राहुल गांधींना मिळाली होती. त्यावेळी संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होते. त्या अधिवेशनात नीट परीक्षा प्रणालीत करावयाच्या सुधारणा संबंधित सूचना काँग्रेसमधील जाणकार सदस्यांना करता आल्या असत्या. नीट परीक्षा प्रणालीतील सुधारणेसाठी केंद्र सरकारने नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. या समितीला लोकसभेतील प्रमुख विरोधी पक्षाकडून सूचना सुचविल्या गेल्या असत्या तर सुदृढ लोकशाहीचे ते उत्तम उदाहरण ठरले असते. नीट परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी सार्वजनिक परीक्षा कायद्यात सुधारणा, जलदगती न्यायालयांची स्थापना, संगणकीय परीक्षा पद्धतीची घोषणा यासारखे अनेक निर्णय मोदी सरकारने घेतले होते. अशा निर्णयापूर्वीच्या चर्चेत सत्ताधारी आणि सर्व विरोधकांनी सहभागी होणे हेच निरोगी लोकशाहीचे लक्षण समजले जाते. मात्र राहुल गांधींना अशा बौद्धिक, अभ्यासपूर्ण चर्चेत भाग घेण्याची इच्छा नसल्यामुळे ते आपल्या पक्षातील अन्य सदस्यांनाही चर्चेत भाग घेण्यापासून रोखतात. परिणामी क्षमता असलेल्या काँग्रेसमधील नेत्यांची पंचाईत होते.

नीट परीक्षा फुटीच्या मुद्द्यावर सरकारने अनेकवेळा चर्चेचे आमंत्रण देऊनही राहुल गांधींनी ते कधीच स्वीकारले नाही. मतदार यादी दुरुस्ती अभियानासंबंधी काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आदी पक्षांना जे काही आक्षेप होते ते लोकसभेच्या व्यासपीठावर मांडून त्या आक्षेपांचे, शंकांचे निराकरण करण्याची मोठी संधी विरोधकांनी दवडली. एकीकडे अभिरूप संसद भरवून आपण लोकशाहीचे कैवारी असल्याचे नाटक करायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष संसदेतील चर्चेपासून पळ काढायचा, असा डबलरोल राहुल गांधींनी सुरू केला आहे. आपला दुटप्पीपणा सामान्य माणसाच्या लक्षात येत नसेल, असे राहुल गांधींना कोणत्या आधारावर वाटते, याचे कोडे अजूनही उलगडलेले नाही. भारतीय मतदाराचा सूज्ञपणा लक्षात येण्याएवढा राहुल गांधी यांच्या आकलनाचा पैस व्यापक नाही. बिहारमधील अनेक मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळली गेली, असा प्रचार राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेऊन केला होता. मात्र अन्याय्य पद्धतीने नावे वगळली गेली अशी तक्रार करण्यास बिहारमधील एकही मतदार न्यायालयापर्यंत गेला नाही. मुळात निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना मतदारांच्या नावावरून ते कोणत्या पक्षाचे समर्थक आहेत हे कळण्याएवढी सिद्धी परमेश्वराने दिलेली नाही. एवढे प्राथमिक ज्ञान राहुल गांधींकडे असल्याचे दिसत नाही. राहुल गांधींसारखे उथळ नेतृत्व लाभणे हे काँग्रेसचे दुर्दैव आहे, असे म्हणण्याजोगी परिस्थिती राहुल गांधींनी आपल्या वर्तनाने निर्माण करून ठेवली आहे.

- केशव उपाध्ये

झाडे आणि जंगलतोड: विरोध की निव्वळ देखावा?

आजच्या काळात जंगलतोड किंवा झाडे तोडण्यास विरोध करणे हा एक अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय बनला आहे. परंतु, या विषयावर भूमिका घेणाऱ्या लोकांचे आणि संघटनांचे स्वरूप पाहिल्यास दोन अत्यंत विरोधी प्रवाह प्रकर्षाने समोर येतात.

एक वर्ग असा आहे ज्यांच्यासाठी पर्यावरण रक्षण हा जगण्याचा प्रश्न आहे. चिपको आंदोलनापासून ते आजपर्यंतच्या अनेक संघर्षांमध्ये स्थानिकांनी, आदिवासींनी आणि निस्सीम पर्यावरणप्रेमींनी जंगले वाचवण्यासाठी प्राणांची बाजी लावली आहे. हे लोक केवळ झाडतोडीच्या वेळी विरोधाचा बॅनर्स घेऊन उभे राहत नाहीत, तर वर्षानुवर्षे झाडे जगवणे, पाणी मुरवणे आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी तळागाळात प्रामाणिकपणे काम करतात. यांच्या संघर्षामागे कुठलाही स्वार्थ नसून भावी पिढीसाठी शुद्ध हवा आणि पाणी वाचवण्याची तळमळ असते.

दुसरीकडे, अलीकडच्या काळात झाडतोडविरोधी आंदोलनांचे एक 'फॅशन' किंवा 'राजकीय स्टंट' झाले आहे. विकासाच्या एखाद्या प्रकल्पात झाडे तोडण्याचा विषय पुढे आला की, राजकीय नेते, विविध संघटना आणि तात्कालिक पर्यावरणवादी पावसाच्या छत्रीसारखे अचानक सक्रिय होतात. कॅमेऱ्यांसमोर येऊन आरडाओरडा करणे, भाषणे ठोकणे आणि स्वतःची प्रसिद्धी करणे एवढेच त्यांचे कार्य असते. प्रत्यक्ष रोपे लावून त्यांचे संगोपन करणे किंवा कायदेशीर लढा शेवटपर्यंत नेण्याचे कष्ट हे लोक घेत नाहीत. मुद्दा संपला की हेच नेते आणि तथाकथित कार्यकर्ते त्या जंगलाकडे किंवा रोपांकडे ढुंकूनही पाहत नाहीत. थोडक्यात सांगायचे तर, जंगलतोडीला होणारा विरोध हा दोन प्रकारचा आहे— एक खराखुरा आणि निस्वार्थ संघर्ष, तर दुसरा केवळ प्रसिद्धीसाठी केलेला दिखावा. जोपर्यंत या खोट्या दिखाव्याला आणि छत्रीसारख्या तात्कालिक आंदोलनांना थारा मिळणे बंद होत नाही, तोपर्यंत खऱ्या पर्यावरण रक्षकांचे कष्ट आणि त्यांची तळमळ झाकोळलीच राहील.

- अविनाश देशपांडे

एव्हरेस्ट. द अदर साईड

दोन तासांचा माहितीपट. हिमालयातल्या मनस्लू आणि एव्हरेस्ट या दोन शिखरांची मोहिम या चित्रपटात आहे. पाचेक वर्षाची मेहनत आहे. एलिझाबेथ चाय आणि जिमी चिन या दोघांनी हा चित्रपट केलाय.आयमॅक्स हे प्रभावी तंत्र वापरलंय. सुमारे १७ कॅमेरे. तीन मुख्य कॅमेरे, एक ड्रोनवरचा कॅमेरा आणि मोहिमेत भाग घेणाऱ्यांच्या अंगावरचे कॅमेरे. इतक्या वाटांनी चित्रीकरण झालंय.

अगदी सूक्ष्म तपशील हे कॅमेरे टिपतात.अशा चित्रीकरणासाठी तयार केलेले विशिष्ट कॅमेरे आणि लेन्सेसचा वापर झालाय. सणसणीत सूर्य प्रकाशातही लाईट वापरले आहेत. तीव्र प्रकाशातले चित्रण (वाळवंटे,बर्फ) हे कॅमेरे सुखकारक करतात. माणसाला जे दिसणार नाही ते हे कॅमेरे दाखवातात. परिणामी या चित्रपटात दिसलेला हिमालय पूर्वी कोणी पाहिलेला नाही.

हा चित्रपट नॉर्मल पडद्यावर पाहण्यासाठी नाही, विस्तृत आयमॅक्स पडदे-सिनेमाघर हवे. सेलफोनवरही तो पहाता येतो पण हिमालयाचे रौद्रविशाल रूप आयमॅक्स पडद्यावर दिसेल तसे इतर ठिकाणी दिसणार नाही.चित्रपटात जिम मॉरिसन आणि हिलरी नेल्सन हे गिर्यारोहक जोडपे आहे. दोघेही धाडसी, मनस्वी आहेत. मरण पणाला लावतात. हिमालयात अत्यंत सरळ उंच पर्वतांवर आरोहण सर्वच करतात पण त्यावर स्कीइंग कोणी करत नाही.तीव्र उतार असलेल्या उतारावर स्कीइंग करणे म्हणजे मरणच. म्हणूनच या जोडप्याला त्या स्कीइंगचे आकर्षण. २०१८ साली त्यांनी ल्होत्से पर्वतावर स्कीइंगचा पराक्रम केला होता. एव्हरेस्टवर उत्तर बाजूने आरोहण आणि स्कीईंग करायचे त्यांचे स्वप्न होते. कारण ती बाजू अत्यंत कठीण आहे. त्या बाजूने हिमालयाची चढण अनेक ठिकाणी साठ अंशाच्या कोनात आहे.

सराव करण्यासाठी त्यांनी २०२२ मधे हिमालयात मनस्लू शिखरावर चढाई केली. सोबत चिन आणि चाय यांची चित्रीकरण टीम होतीच. या मोहिमेत खाली उतरतांना एक ॲक्लान्स आला. क्षणभरात नेल्सन बर्फात गाडली गेली. दुसऱ्या दिवशी तिचे थिजलेले प्रेत मिळाले.

एव्हरेस्टवर उत्तरेकडून स्कीइंग करण्याचे मॉरिसन-नेल्सन यांचे आणि चिन व चाय यांचे स्वप्न अपुरंच राहिले. मॉरिसनशी बोलून चिन आणि चायनी एव्हरेस्ट स्कीईगचे चित्रण केले. चित्रपटात मनस्लू आणि एव्हरेस्ट ही दोन्ही चित्रणे एकत्र केली आहेत. तसेच चित्रपट परिपूर्ण व्हावा यासाठी इतरही दृश्ये चित्रीत करण्यात आली आहेत. उत्तर बाजूने म्हणजे चीनच्या बाजूने एव्हरेस्टवर जायला चीन परवानगी देत नाही. इतिहासात फक्त ५ जणांनी तो प्रयत्न केला होता. कष्टाने मॉरिसन आणि चिन-चायनी परवानगी मिळवली. एव्हरेस्टची पहिली मोहिम खराब हवामानाने थांबवावी लागली. दुसऱ्या मोहिमेत एका शेर्पाचा पाय मोडल्याने मोहिम स्थगीत झाली. तिसरी मोहीम मात्र पार पडली. मॉरिसन एव्हरेस्टवरून स्कीइंग करत करत पाच तासांनी बेस कँपला पोचला.

नेल्सनचा मृत्यू झाल्यानंतर तिचे दफन तिबेटमधे मॉरिसनने केले होते. काही राख त्याने जपून ठेवली होती. ती एव्हरेस्टवर पसरली. त्याचे चित्रण. दोघंही तिबेटमधे, नेपाळमधे जात तिथे काही प्रसंगांचे चित्रण झालेले होते. चित्रपटात अशी हिमालयातल्या जीवनाचे पैलू दाखवणारी दृश्य मिसळण्यात आली.नेल्सन ही मॉरिसनची दुसरी पत्नी. त्याची पहिली पत्नी केटी जॉन्सन. ती पायलट होती. मॉरिसन-केटीला दोन मुले होती.एके दिवशी केटी मुलांना घेऊन विमानाने निघाली असताना विमानाला अपघात झाला आणि त्यात तिघांचाही मृत्यू झाला. मॉरिसनला फार तीव्र धक्का बसला. त्यातून सावरण्यासाठी त्याने हिमालय आणि नेल्सन यांच्याशी दोस्ती केली. दुर्दैवाने नेल्सनही गेली. हा दुसरा धक्का. त्यातून बाहेर येण्यासाठी मॉरिसनने एव्हरेस्टवर स्वारी केली.

दिक्दर्शक जिमी चिन स्वतः धाडसी गिर्यारोहक आहे.



पीएचडीची वाट सोडून विद्यार्थी दशेत तो पर्वत चढू लागला. त्याला छायाचित्रणाचा नाद होता. डोंगर चढत असताना तो त्यावर फिल्म करू लागला. तेच त्याचे करियर झाले .एलिझाबेथ चाय आणि जिम्मी चिन यांच्या फ्री सोलो या माहितीपटाला २०१९ साली ऑस्कर मिळाले होते. ॲलेक्स होन्नॉल्ड हा गिर्यारोहक एक अत्यंत कठीण कडा चढून गेला होता त्यावर फ्री सोलो हा चित्रपट बेतलेला होता.

प्रस्तुत 'एव्हरेस्ट द अदर साईड' २०२६ च्या ऑगस्टमधे तयार झाला, आंतरराष्ट्रीय माहोत्सवात दाखवण्यात आला. त्याला बक्षिसे मिळत आहेत. चित्रपट ऑस्करच्या रांगेत आहे.चित्रपट बनवण्याच्या निर्णयाबद्दल मॉरिसन आणि दिक्दर्शक यांच्यावर टीका झाली. चित्रीकरण करणारी टीम आणि शेर्पा इत्यादींचे जीव धोक्यात घालणे अनैतिक होते अशी टीका झाली. मॉरिसनचे दुःख ठीक आहे, दिक्दर्शकांची व्यावसायिकताही समजण्यासारखी आहे,पण त्यासाठी इतक्या लोकांचा जीव पणाला लावणे बरोबर नाही असे काही समीक्षकांचे मत पडले.

पण...मॉरिसन आणि दिक्दर्शक या प्रकरणात फार गुंतलेले होते. एका परीने व्यावसायिकतेच्याही पलिकडच्या भावना गुंतलेल्या होत्या. तिघांनी चित्रपट ओढून आणला असे झाले नाही, तिघांनाही चित्रपटाने ओढून नेले. तिघांच्या अनेक मुलाखती यू ट्यूबवर आहेत.त्या बोलक्या आहेत.म्हणजे तिघंही कमी बोलतात, फार चर्चा टाळतात.काहीही असो. चित्रपट तयार झाला. एक ऐतिहासिक देखणा ऐवज तयार झाला.

पोस्टमन इन द माउंटन नावाची चिनी फिल्म काही वर्षांपूर्वी आली होती. आपल्याला बायजिंग आणि शांघाय दिसते, तिथले उंच टॉवर दिसतात. त्या पलीकडचा चीन अत्यंत सुंदर आहे. तो चीन 'पोस्टमनमधे' दिसतो. पोस्टमनमधे एक कथानक आहे; दुर्गम भागात लोकांचा जीव पणाला लावणे बरोबर नाही असे काही समीक्षकांचे मत पडले.

-निळू दामले

गुरूवार, दि. १२ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

महायुतीचा निधी, काँग्रेसची राजकीय वाढ,काळी परिसरात अंतर्गत नाराजीचा भडका!

विकासकामांचा निधी महायुतीच्या नेत्यांकडून,मात्र श्रेय काँग्रेसच्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ११ : विधानसभा मतदारसंघातील काळी (दौ.) व परिसरात सध्या महायुतीच्या अंतर्गत राजकारणाची चर्चा चांगलीच रंगली आहे. महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींकडून विकासकामांसाठी निधी व पाठबळ मिळवायचे आणि त्याच कामांच्या जोरावर काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढवायची, असा राजकीय विरोधाभास निर्माण झाल्याची चर्चा स्थानिक राजकीय वर्तुळात सुरू आहे.

त्यामुळे महायुतीच्या नेत्यांच्या भूमिकेवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. काँग्रेसचे जिल्हा पदाधिकारी सय्यद इरफान यांच्या माध्यमातून विविध विकासकामांचा पाठपुरावा होत असल्याचे



चित्र पुढे केले जात असल्याने, या कामांचे राजकीय श्रेय नेमके कोणाला मिळत आहे, हा चर्चेचा विषय ठरला आहे. निधी महायुतीच्या लोकप्रतिनिधींचा आणि राजकीय फायदा विरोधी पक्षाला, असे समीकरण प्रत्यक्षात आकार घेत आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

कार्यकर्त्यांनी झेंडा कोणाचा धरायचा?

वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणाऱ्या शिवसेना व राष्ट्रवादीच्या स्थानिक कार्यकर्त्यांना बाजूला ठेवून विरोधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा जनसंपर्क वाढत असेल, तर महायुतीच्या संघटनात्मक बांधणीचे काय, असा संतप्त सवाल निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून उपस्थित होत आहे. विकासकामांना विरोध नाही; मात्र त्यातून पक्षाची ताकद वाढण्याऐवजी विरोधकांना राजकीय लाभ मिळत असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची?

निवडणुकीत नाराजीचा फटका बसणार?

स्थानिक पातळीवरील ही कथित राजकीय तडजोड आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महायुतीला महागात पडू शकते. नेत्यांचे वैयक्तिक राजकीय समीकरण महत्त्वाचे की पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे हित, याचा निर्णय आता वरिष्ठ नेतृत्वाला घ्यावा लागणार आहे. काळी परिसरातील या घडामोडींची दखल महायुतीचे नेते घेणार की कार्यकर्त्यांची नाराजी अशीच धुमसत राहणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

उमरखेडमध्ये मोकाट श्वानांची दहशत आठवडाभरात २५ जणांवर हल्ले!

पाटील नगरात पिसाळलेल्या श्वानाचा सहा जणांना चावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. ११ : शहरात मोकाट आणि पिसाळलेल्या श्वानांचा प्रश्न गंभीर बनला असून, आठवडाभरात तब्बल २५ नागरिकांवर श्वानांनी हल्ले केल्याची माहिती समोर आली आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना नगरपरिषद प्रशासनाची निष्क्रियता नागरिकांच्या संतापात भर घालत आहे. श्वानांच्या दहशतीमुळे नागरिकांना घराबाहेर पडतानाही जीव मुठीत धरावा लागत आहे. गेल्या आठवड्यात एकाच दिवशी १५ नागरिकांना मोकाट श्वानांनी चावा घेऊन जखमी केले होते. त्यानंतर ९ व १० नोव्हेंबर रोजी पाटील नगर परिसरात एका पिसाळलेल्या श्वानाने धुमाकूळ घालत पाच ते सहा जणांवर हल्ला केला. याबाबत नगरपरिषदेला माहिती देऊनही श्वान पकडणारे पथक घटनास्थळी पोहोचले नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. दुसऱ्या दिवशीही त्याच श्वानाने नागरिकांना लक्ष्य केल्याने अखेर संतप्त नागरिकांनीच एकत्र येत त्याचा बंदोबस्त केला. या प्रकारात श्वान ठार झाल्यानंतर मात्र पालिकेचे कर्मचारी तातडीने पोहोचले आणि मृत श्वान उचलून घेऊन गेले. जिवंत श्वानाचा बंदोबस्त करण्यासाठी अनुपस्थित असलेली यंत्रणा मृत श्वानासाठी तत्पर कशी, असा सवाल उपस्थित होत आहे.



श्वानमालकांचीही जबाबदारी निश्चित करा!

शहरात पाळीव श्वानांना मोकाट सोडण्याचे प्रकारही वाढत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. श्वानांचे लसीकरण, नियंत्रण आणि मालकांची जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे. नगरपरिषदेने नियमभंग करणाऱ्या मालकांवर दंडात्मक कारवाई करावी. त्याचबरोबर मोकाट श्वानांचे लसीकरण, निर्बीजीकरण आणि नियमांनुसार सुरक्षित व्यवस्थापन करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची? एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच नगरपरिषद प्रशासन जागे होणार का? श्वानांच्या दहशतीवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी उमरखेडकरांकडून होत आहे.

थोडक्यात



'वोट बचाव, देश बचाव' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

झरी : खासदार प्रतिभाताई धानोरकर, माजी आमदार वामनराव कासावार आणि यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झरी-जामणी तालुक्यात 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तालुक्यातील प्रत्येक गावाला भेट देऊन नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये आणि मतदारांच्या अधिकारांविषयी जनजागृती केली जात आहे. याच अनुषंगाने जामणी येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अभियान राबविण्यात आले. यावेळी माजी सभापती तथा झरी तालुका काँग्रेस अध्यक्ष संदीप बुर्रेवार, माजी सभापती व जिल्हा सरचिटणीस प्रकाश मॅकलवार, माजी सभापती नागोराव उरवते, शहराध्यक्ष नंदू किनाके, महिला शहर काँग्रेस अध्यक्ष प्रतिभा लेंगुडे, नगरसेवक वामन भोंग, बाळू संदलवार, गुरनुळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जामणी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाहीचे संरक्षण, मतदानाच्या अधिकारांचे जतन आणि नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा संदेश या अभियानातून देण्यात येत आहे. झरी-जामणी तालुक्यातील प्रत्येक गावापर्यंत हा संदेश पोहोचविण्याचा निर्धार काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघात शिवरामजी मोघे महाविद्यालयाची भूमिका गेडाम हिची निवड



पांढरकवडा : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतरविद्यापीठीय महिला क्रिकेट संघासाठी शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील विद्यार्थिनी कु. भूमिका गेडाम हिची निवड झाली आहे. भूमिका गेडाम हिची राईट आर्म लेग स्पिन (R.A. Leg Spin) गोलंदाज म्हणून संघात निवड झाली आहे. विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. निवड झालेल्या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर १६ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर २३ ते २९ नोव्हेंबर २०२६ दरम्यान पी. पी. सवानी विद्यापीठ, सुरत येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय क्रिकेट स्पर्धा पार पडणार आहे. भूमिका गेडाम हिच्या या निवडीबद्दल संस्थेचे सचिव विजयरावजी मोघे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके, माजी क्रीडा संचालक डॉ. विनोद चव्हाण, प्रभारी क्रीडा शिक्षक डॉ. प्रदीप सुरुशे व डॉ.अमर वंजारी तसेच प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघात स्थान मिळविल्याने महाविद्यालयासह पांढरकवडा परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

मुकुटबनच्या देशी दारूचा ग्रामीण गावांत कथित पुरवठा, प्रशासनाचे डोळेझाक धोरण?

वणी रोडवरील दारू दुकानाच्या विक्रीची चौकशी करण्याची मागणी.

झरी : मुकुटबन परिसरात देशी दारूच्या कथित अवैध पुरवठ्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. वणी रोडवरील देशी दारू दुकानातून अडेगाव, गणेशपूर, खडकी, खातेरा यांसह ग्रामीण भागातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात दारू पोहोचविली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. या प्रकारामुळे गावागावांत दारूची उपलब्धता वाढत असून सामाजिक वातावरणावर त्याचे विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा अधिक पैसे ग्राहकांकडून वसूल केले जात असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे दारूच्या पुरवठ्याबरोबरच विक्रीच्या दरांबाबतही संशय व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात कथित अवैध विक्री सुरू असल्याच्या तक्रारी असताना राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासन नेमके काय करत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. हा प्रकार संबंधित यंत्रणांच्या नजरेतून सुटला आहे की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे.
संबंधित दुकानाची अचानक तपासणी करून साठा, विक्री नोंदी, वाहतुकीची कागदपत्रे आणि दरपत्रकांची पडताळणी करावी. ग्रामीण भागातील कथित विक्रीची स्वतंत्र चौकशी करावी. आरोपांत तथ्य आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आता प्रशासन केवळ तक्रारींची वाट पाहणार की प्रत्यक्ष कारवाई करणार, हा खरा प्रश्न आहे.

ऊसाला प्रतिटन ४२०० रुपयांचा दर द्या अन्यथा आंदोलनाचा इशारा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

उमरखेड, दि. ११ : पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांच्या संघर्षातून प्रतिटन ४२०० रुपयांच्या दराबाबत तोडगा निघत असेल, तर विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना वेगळा न्याय का? असा सवाल उपस्थित करीत ऊस उत्पादकांनी आता दराच्या लढ्याची तयारी सुरू केली आहे.

विदर्भ-मराठवाड्यातील साखर कारखान्यांनीही प्रतिटन ४२०० रुपये दर द्यावा, या मागणीसाठी बुधवारी (ता. ११) उमरखेड येथील जिजाऊ भवनात शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. माजी जिल्हा परिषद सदस्य चिंतांगराव कदम यांच्या पुढाकाराने आयोजित या बैठकीत उमरखेड व महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका मांडली. ४२०० रुपयांचा दर मिळाल्याशिवाय माघार नाही, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीत



अनिल महाजन यांच्या अध्यक्षतेखाली दरवाढीसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. मात्र, परिसरातील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता ऊस वाहतूक रोखण्यासारखे आंदोलन शेतकऱ्यांसाठीच नुकसानकारक ठरू शकते, अशी व्यावहारिक भूमिका महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी मांडली. त्यामुळे आंदोलनाची दिशा ठरविताना शेतकऱ्यांचे हित प्रथम ठेवण्याची मागणी करण्यात आली. वीज वितरण कंपनीच्या सदोष यंत्रणेमुळे शॉर्टसर्किटने ऊस जळण्याच्या घटना घडतात. नुकसानभरपाईसाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते, तर जळीत उसाच्या गाळपावर कारखानदारांकडून २० टक्के कपात केली जाते. ही दुहेरी अन्यायकारक परिस्थिती संपवून कपात बंद करावी आणि हंगाम संपण्यापूर्वी नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही करण्यात आली. संघटना केवळ दरवाढीपुरती मर्यादित न राहता कायमस्वरूपी, मजबूत आणि राजकारणविरहित व्यासपीठ व्हावे, यावर एकमत झाले. उमरखेड, महागाव, हदगाव व पुसद तालुक्यांतील शेतकऱ्यांना संघटित करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. चिंतांगराव कदम यांनी लवकरच सर्वांशी चर्चा करून आंदोलनाची पुढील दिशा जाहीर केली जाईल, असे स्पष्ट केले.

पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयातील डायलिसिस सेंटर बंद

आर्थिक थकबाकीमुळे सेवा ठप्प डायलिसिस रुग्णांसमोर उपचारांचे संकट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पांढरकवडा, दि. ११ : पांढरकवडा येथील उपजिल्हा रुग्णालयात गेल्या दीड वर्षापासून सुरू असलेले डायलिसिस सेंटर आर्थिक थकबाकी आणि आवश्यक निधीअभावी बंद करण्यात आल्याने डायलिसिसवर अवलंबून असलेल्या रुग्णांसमोर गंभीर उपचारांचे संकट निर्माण झाले आहे.

नियमित उपचारासाठी रुग्णांना आता इतर ठिकाणी धाव घ्यावी लागत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. डायलिसिस सेंटरची आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याने तसेच आवश्यक निधी व थकीत देयके न मिळाल्यामुळे सेवा बंद करण्याची वेळ आल्याचे समोर आले आहे. डायलिसिस हा नियमित उपचार



यांच्याशी संपर्क साधून डायलिसिस सेंटर बंद असल्याचा प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून दिला आहे. या प्रश्नावर लवकरच तोडगा काढून डायलिसिस सेवा पुन्हा सुरू करण्याबाबत आश्वासन देण्यात आल्याची माहिती आमदार तोडसाम यांनी दिली. डायलिसिससारखी अत्यावश्यक आरोग्यसेवा आर्थिक अडचणींमुळे बंद पडत असेल, तर गरीब व गरजू रुग्णांनी उपचारासाठी कुठे जावे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने विलंब न करता निधी व थकबाकीचा प्रश्न मार्गी लावून सेंटर तातडीने सुरू करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

आदिवासींच्या उन्नतीसाठी आठ दिवसांचा कृती कार्यक्रम,बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आयोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ११ : आदिवासी समाजाचे हक्क, स्वाभिमान आणि अस्मितेसाठी संघर्ष करणारे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागातर्फे ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभरात जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, हा सप्ताह केवळ जयंती उत्सवापुरता मर्यादित न राहता आदिवासी बांधवांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडविणारा ठरावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या सप्ताहांतर्गत ११ व १२ नोव्हेंबरला पत्रकार परिषदा, १३ नोव्हेंबरला पात्र लाभार्थ्यांना धनादेश वितरण, शासकीय योजनांचे लाभ आणि महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. १४ नोव्हेंबरला आदिवासी स्मारकांची स्वच्छता व दीपोत्सव, तर १५ नोव्हेंबरला भगवान



बिरसा मुंडा जयंतीचा मुख्य शासकीय कार्यक्रम होईल. यावेळी आदिवासी समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. १६ नोव्हेंबरला आधार व शासकीय कागदपत्रांसाठी सेवा शिबिर, १७ नोव्हेंबरला आरोग्य व पोषण जनजागृती, सिकलसेल तपासणी आणि माता-बाल आरोग्यविषयक मार्गदर्शन होणार आहे. १८ नोव्हेंबरला शिक्षण, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास, कृषी, पशुसंवर्धन आणि स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन करून सप्ताहाची सांगता होईल. भगवान बिरसा मुंडा यांचा संघर्ष हा अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणारा आहे. आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणे, ही केवळ शासनाची नव्हे तर सर्वांची जबाबदारी आहे. जयंती साजरी करण्यासोबतच शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि मूलभूत सुविधांमध्ये ठोस सुधारणा घडविणे गरजेचे आहे, असे आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी सांगितले. आर्णी-केळापूर विधानसभा मतदारसंघातील आदिवासी बांधव, युवक-युवती, महिला बचत गट, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या सप्ताहात सहभागी होऊन शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

विदर्भाच्या औद्योगिक विकासासाठी उद्योजक महेंद्र मानकर अशा दूरदृष्टीच्या नेतृत्वाची गरज – आमदार किरण सरनाईक

दिग्रस येथील रामदास आठवले सूतगिरणीला सदिच्छा भेट

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

दिग्रस, दि. ११ : विदर्भातील बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी केवळ नोकरीच्या संधी निर्माण होणे पुरेसे नाही, तर स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजकही घडणे आवश्यक आहे.

हजारो हातांना काम देण्याची क्षमता असलेल्या महेंद्र मानकर यांच्यासारख्या नवउद्योजकांची विदर्भाला खरी गरज आहे, असे प्रतिपादन अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ॲड. किरण रामराव सरनाईक यांनी केले. आमदार सरनाईक यांनी दिग्रस येथील रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूतगिरणीला सदिच्छा भेट दिली. यावेळी संचालक मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात



हे कार्य कौतुकास्पद आहे. मराठी तरुणांनी केवळ नोकरी मागणारे न राहता नोकरी देणारे उद्योजक बनण्याची मानसिकता विकसित केली पाहिजे. वस्त्रोद्योगात स्थानिक युवक-युवतींना प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यावरही त्यांनी भर दिला. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडण्यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे सामर्थ्य अशा उद्योगांमध्ये असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी अध्यक्ष महेंद्र मानकर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मिलिंद मानकर, जनरल मॅनेजर एल. आर. बेहरा, सुधीर देशमुख, ॲड. प्रवीण देशमुख, अमोल देशमुख, अतुल देशमुख, अमित देशमुख आणि संचालक प्रा. मधुकर वाघमारे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

न्यूमोनियाचा विळखा रोखण्यासाठी आरोग्य विभाग सरसावला!

बालमृत्यू रोखण्याचे आव्हान १२ नोव्हेंबरपासून जिल्हाभर 'सांस' मोहीम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ११ : पाच वर्षांखालील बालकांसाठी जीवघेणा ठरू शकणाऱ्या न्यूमोनियाच्या आजाराला प्रतिबंध घालण्यासाठी आरोग्य विभागाने पुढाकार घेतला आहे. बालमृत्यू रोखणे, आजाराची लक्षणे वेळीच ओळखणे आणि उपचारांबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १२ नोव्हेंबरपासून 'सांस' (SAANS) मोहिमेला सुरुवात होत आहे.

मात्र, केवळ जनजागृतीच्या घोषणा न करता प्रत्येक बालकापर्यंत प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर उपचार पोहोचविण्याचे आव्हान आरोग्य यंत्रणेसमोर असणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांच्या देखरेखीखाली ही मोहीम फेब्रुवारी २०२७ पर्यंत संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. सतत खोकला, ताप, जलद श्वासोच्छ्वास, श्वास घेताना छाती आत ओढली जाणे, दूध किंवा अन्न न घेणे, सुस्ती तसेच ओठ किंवा जीभ निळसर पडणे ही न्यूमोनियाची धोक्याची लक्षणे आहेत. अशा परिस्थितीत घरगुती उपचारांमध्ये वेळ न घालवता बालकाला तातडीने शासकीय आरोग्य संस्थेत दाखल करणे आवश्यक आहे. पहिले सहा महिने केवळ स्तनपान, त्यानंतर योग्य पूरक आहार, संपूर्ण नियमित लसीकरण, न्यूमोकोकल लस, स्वच्छता आणि धूर-धुळीपासून संरक्षण या उपायांवर मोहिमेत भर दिला जाणार आहे. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी भेटी, बालकांची तपासणी व पालकांचे समुपदेशन करण्यात येईल. बालकांचा जीव वाचविण्यासाठी केवळ मोहीम राबविणे पुरेसे नाही, तर तिची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रत्येक गरजू बालकाला वेळेवर उपचार मिळणे महत्त्वाचे आहे. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

अन्न व खाद्य तेलात भेसळ,यवतमाळ अन्न व औषधी प्रशासन वसुली करण्यात मग्न, नागरिकांचा आरोप!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. ११ : दूध,पनीर,खाद्यतेल व अन्नधान्यात मोठ्या प्रमाणात भेसळ दिसून येत आहे,बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्या खाद्य तेलात मोठ्या प्रमाणात भेसळ असल्याची खात्रीदायक चर्चा आहे.

या या भेसळयुक्त अन्न व तेलामुळे नागरिकांत हृदयाचे, पोटाचे व किडण्याचे आजार वाढलेले आहेत आणि याला एकमेव कारण खाद्यतेल व अन्नधान्यातील भेसळ आहे .सरकार ही भेसळ थांबविण्यात पूर्णपणे असफल झाले असून सध्या महाराष्ट्र शासनात असलेले आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वात अनेक ठिकाणी धाडी मारण्यात येत असल्या तरी



त्यांची यंत्रणा अपुरी पडत आहे. यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भेसळीचे प्रमाण वाढले असून येथील अन्न व औषधी प्रशासनाच्या टोले जंग इमारती आहेत पण अधिकारी व कर्मचारी आहेत की नाही असा प्रश्न पुसद तालुक्यातील सुज्ञ नागरिकांना व जाणकारांना पडला आहे. सगळीकडे हप्ते देऊन भेसळीचा उद्योग सर्रास सुरू आहे त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे असा गंभीर आरोप नागरिका कडून होताना दिसत आहे, या सर्व गोष्टीला कोण जबाबदार आहे आज नागरिकांचे जीव कवडीमोल झाले आहे का असा प्रश्न आता काही सामाजिक कार्यकर्ते करत आहे ही भेसळयुक्त होत असलेली बाब तात्काळ अन्न औषधी प्रशासन विभागाने थांबवावी अन्यथा पुढील काळात काही सामाजिक कार्यकर्ते तथा राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याकडून आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

मेलघाटच्या विकासासाठी सात कोटींचा निधी

धारणीतील मूलभूत समस्यांच्या सोडवणुकीकडे आमदारांनी लक्ष द्यावे!

मेलघाट/वार्ताहर

मेलघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार केवळरामजी काळे यांच्याकडून मतदारसंघाच्या विकासासाठी वेळोवेळी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला जात असल्याची माहिती आहे. नुकतेच आमदार महोदयांनी धारणी तालुक्याच्या विकासासाठी सात कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती समोर आली आहे. या निधीच्या माध्यमातून परिसरातील विविध विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, धारणी शहरासह संपूर्ण मेलघाटातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या मूलभूत समस्यांकडेही प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

धारणी शहराच्या दृष्टीने वन विभागाच्या नाक्यापासून ढाकणा फाट्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. या मार्गावरून नागरिकांसह सार्वजनिक वाहतूक आणि इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. आमदार महोदयांनी संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना देऊन या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आहे.

यासोबतच मेलघाटातील धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांमध्ये पाणीपुरवठ्याची समस्या अत्यंत गंभीर आहे. 'जल है तो जीवन है' या उक्तीप्रमाणे पाणी ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच प्रत्येक गावातील नागरिकांना स्वच्छ व मुबलक पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. पाणीटंचाईमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रश्न युद्धपातळीवर सोडविणे गरजेचे आहे.

पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेता, सिमेंट काँक्रीटच्या बांधकामांवर तूर्तास पुढील आठ महिन्यांसाठी स्थगिती देण्याबाबत विचार व्हावा. मात्र, अत्यंत आवश्यक आणि जनहिताच्या विकासकामांना यातून योग्य ती सूट देण्यात यावी. उपलब्ध पाण्याचा वापर करताना नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजेला सर्वाधिक प्राधान्य मिळणे आवश्यक आहे.

आ.केवळरामजी काळे यांनी धारणी तालुक्यासाठी आणलेल्या सात कोटी रुपयांच्या निधीच्या माध्यमातून विकासकामे मार्गी लावतानाच या मूलभूत समस्यांच्या सोडवणुकीसाठीही विशेष लक्ष द्यावे, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. विशेषतः पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांबाबत संबंधित विभागांच्या माध्यमातून ठोस कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मेलघाटचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर केवळ नवीन विकासकामे करणे पुरेसे नाही; तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित पाणी, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांचे प्रश्नही कायमस्वरूपी सोडविणे ही काळाची गरज आहे.

संक्षिप्त

नगरसेविका अर्चना पांडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालोपयोगी वस्तूंचे वाटप



अमरावती - संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्था, अमरावतीच्या वतीने महाजनपुरा येथील गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात गडगडेश्वर-रवी नगर प्रभागाच्या लाडक्या नगरसेविका अर्चना पांडे यांच्या वाढदिवसानिमित्त परिसरातील विद्यार्थ्यांना भव्य शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. हा सामाजिक उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून मा. नगरसेविका अर्चना पांडे, त्यांचे पती अशोक पांडे, नगरसेवव योगेश विजयकर, भूषण, पाटणे, , अरविंद सावरकर इत्यादी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने अर्चना पांडे यांचे स्वागत शाल, पुष्पगुच्छ आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संघर्ष योद्धा समितीचे सचिव रुपेश नांदुरकर यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडले. तसेच, अध्यक्षीय भाषण समितीचे अध्यक्ष शुभम सावरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन कार्य समितीचे उपाध्यक्ष अतुल बोरकर यांनी मानले. विशेषतः अशोक पांडे यांनी, 'संघर्ष योद्धा बहुउद्देशीय संस्था समाजासाठी अत्यंत फायदेशीर आणि स्तुत्य उपक्रम राबवत आहे,' अशा शब्दांत समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे पदाधिकारी कुणाल नांदुरकर, मुकेश बोरकर, मनोज विजयकर, जय सावरकर, सागर बोरकर, नयन विजयकर, आयुष सावरकर, विकी गायकवाड आणि आदित्य सावरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्यास परिसरातील नागरिक, पालक, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभल्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात झाला.

५ डिसेंबर राज्यस्तरीय ट्रस्ट सर्वसाधारण परिषद



अमरावती - महाराष्ट्र मंदिर संस्थांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र देवस्थान समिती आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संयुक्त उपस्थितीत शनिवार, ५ डिसेंबर रोजी रोसी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात राज्यस्तरीय विश्वस्त सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात येत आहे. मुंबईच्या धर्मादाय आयुक्त अमोघ कलोटी, सहयोगी धर्मादाय आयुक्त खोचे आणि राज्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. यावेळी पालकमंत्रीही उपस्थित राहतील. चंद्रशेखर बावनकुळे प्रमुख पाहुणे असतील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या उपस्थितीची शक्यता आहे. या परिषदेत मंदिर संस्थांचे कायदेशीर हक्क आणि कर्तव्ये, ट्रस्टच्या प्रशासकीय समस्या, आर्थिक व्यवहार आणि लेखापरीक्षण, देवस्थान इनाम जमीन, कृषी नुकसानीची भरपाई, मंदिर मालमत्तेचे संवर्धन, डिजिटल सक्षमीकरण, तीर्थक्षेत्र विकास आणि पर्यटन योजना यांवर चर्चा केली जाईल. किंवा परिषदेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

युवराज सिंग यादव विजय मर्चंट स्पर्धेत खेळणार



अचलपूर - युवराजासिंह यादव याचिकाकर्त्यांची विदर्भ क्रिकेट असोसिएशनतर्फे १६ वर्षाखालील विजय मर्चंट ट्रॉफी २०२६-२७ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नागपूरस्थित विदर्भ क्रिकेट असोसिएशन (व्हीसीए) संघातून ही स्पर्धा खेळेल.युवराजसिंग हा अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा क्रिकेटपटू असून तो गोल्डन किड्स ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता ११ वी मध्ये शिकत आहे. अमरावती येथे झालेल्या आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत युवराजसिंगने गोल्डन किड्स संघाचे विजेतेपद पटकावले.युवराज सिंगलाला 'मॅन ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच, २०२५-२६ च्या भास्कर जोशी चॅम्पियनशिपमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून त्याने सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान मिळवला असता. युवराज सिंगने दावखुरा फलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ही स्पर्धा १४ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर दरम्यान गुजरातच्या वडोदरा येथे होणार आहे. विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्पर्धेतील पाच सामन्यांसाठी ११ नोव्हेंबर रोजी नागपूरला रवाना होईल.

पोदार शाळेत क्रीडा महोत्सव

अमरावती - सिटी पोदार इंटरनॅशनल शाळेत नुकटेक वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आयएफएस अधिकारी कीर्ती जामदाळे-कोकाटे, जिल्हा न्यायाधीश सोनाली कनकदंडे आणि पी.टी.ए. सदस्य अमृता खोडस्कर, हेमलता वानखेडे, ताट्टे, श्री कृष्ण उबरहंडे, प्रांजली नागतोडे, इम्रान शाह, पंकज शिरभटे, मनीषा पाबाळे आणि पी.टी.ए. सदस्य रितेश जगताप, दत्ताकृष्ण मेटंगे, दीप्ती मेश्राम, जया काडू, अंजू खेडकर, रक्षा भलवी यांची उपस्थिती फलदायी ठरली. तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये आपले कौशल्य दाखवून सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके जिंकली.जिल्हा क्रीडा विभागाच्यावतीने आयोजन विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्राचार्या मनीषा संगर यांच्या मार्गदर्शनाखाली जितेंद्र बुटे, बिदिशा पात्रा, तुबा शेख, हर्षा सेवानी, सदफ अली, रुपाली गव्हाणे, सपना रिचार्य, वैष्णवी भोंड, सोनाली मांढरे, रोशनी लोणकर, पल्लवी उंबरकर यांनी विविध सत्रांचे संचालन केले. लुब्याना हाजी, स्वाती उंडे, अमेय कुलट, विश्वाससिंग राजपूत, दीपा मांडवधरे, वैशाली बुंदेले यांनी आभार व्यक्त केले.

प्रा. निखिल बोरोडे यांना प्राणिशास्त्र विषयात पीएचडी पदवी प्रदान

अमरावती/का.प्र.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने प्राणीशास्त्र विषयात प्रा. निखिल बोरोडे यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

निखिल बोरोडे यांनी 'स्टडी ऑन स्टेटस, डिस्ट्रीब्यूशन, हॅबिटॅट इकॉलॉजी अँड ब्रीडिंग बायोलॉजी ऑफ मलबार पाईड हॉर्नबिल इन पेंच टायगर रिझर्व अँड जॉइनिंग फॉरेस्ट' या विषयावर आपले संशोधन केले या संशोधनासाठी शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील प्राध्यापक व ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. गजानन वाघ यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. डॉ. निखिल बोरोडे यांनी पेंच व्याघ्र प्रकल्प, मध्य प्रदेश मध्ये असलेल्या मलाबार पाईड हॉर्नबिल या पक्षाची सध्याची स्थिती, विस्तार,अधिवास व त्याचे प्रजनन अशा अनेक बाबींचा सखोल अभ्यास केलेला आहे आणि नाविन्यपूर्ण गोष्टी त्यांनी या पक्षाविषयी शोधलेल्या आहे. या संशोधनादरम्यान प्रा. बोरोडे यांनी २०२३ मध्ये थायलंड येथे पार पडलेल्या आठव्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये या पक्षाविषयी आपले संशोधन सुद्धा मांडलेले होते. या यशाचे श्रेय त्यांची आई नलिनी बोरोडे, वडील अरविंद बोरोडे, पत्नी सौ प्रतीक्षा यांना दिले तसेच शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, मार्गदर्शक डॉ. गजानन वाघ, विभाग प्रमुख प्रा.डॉ.जे.डी. धोटे व मित्रपरिवार यांना दिले आहे. या संशोधनाकरिता मध्य प्रदेश वाइल्डलाइफ विभाग व पेंच टायगर रिझर्व यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे.निखिल बोरोडे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचाली करता शुभेच्छा दिलेला आहे.

एसआयईएसमध्ये पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश

विद्यार्थ्यांची फटाके न फोडण्याची शपथ

अमरावती/का.प्र.

प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देण्यासाठी अमरावती येथील रोझी शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूल (एसआयईएस) येथे पर्यावरण जागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका वैशाली ठाकरे, पर्यवेक्षिका शारदा फुले, शिक्षक प्रतिनिधी वर्षा काळमेघ आणि कल्याणी ठाकरे यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व देवी लक्ष्मी, सरस्वती आणि श्री गणेश यांच्या पूजनाने झाले.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी कमळ दिवे, आकाशकंदील आणि पर्यावरणपूरक साहित्यापासून आकर्षक स्वागत फलक तयार केले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनी प्रदूषण टाळून



प्रेम, ज्ञान आणि निसर्गसंवर्धनाचा संदेश दिला.

मुख्याध्यापिका वैशाली ठाकरे यांनी जैवविविधता, वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. जंगल, वन्यजीव आणि जैवविविधता ही देशाची खरी संपत्ती असून त्यांचे रक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडण्यासह निसर्ग, वनस्पती आणि प्राण्यांचे संरक्षण करण्याची सामूहिक शपथ घेतली.शिक्षिका नेहा काडू, नेहा पवार आणि रोहित टेकोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपाध्याय यांनी भक्तिगीत सादर केले.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोहित टेकोडे, शुभांगी जुमडे,मुक्ता शेळके,शुभांगी नांदवणकर आणि मयुरी पाटील यांनी सहकार्य केले. मुख्याध्यापिका वैशाली ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

शौर्य चव्हाणची वरिष्ठ राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात प्रथम स्थानी निवड

शिलाँग येथे राष्ट्रीय स्पर्धेत करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर



स्थानिक एकलव्य क्रीडा अकादमी व एकलव्य गुरुकुल स्कूलचा इयत्ता नववीमध्ये शिकणारा प्रतिभावान धनुर्विद्या खेळाडू शौर्य गजानन चव्हाण याने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आगामी वरिष्ठ राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात त्याची प्रथम क्रमांकाने निवड झाली असून, या संघातील सर्वांत कमी वयाचा खेळाडू होण्याचा मानही त्याने मिळविला आहे.

जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय वरिष्ठ धनुर्विद्या स्पर्धेत शौर्यने उत्कृष्ट कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले. या स्पर्धेतील दमदार प्रदर्शनाच्या जोरावर त्याची महाराष्ट्र संघात प्रथम स्थानी निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, वरिष्ठ गटातील राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला तो महाराष्ट्र संघातील सर्वांत कमी वयाचा खेळाडू ठरला आहे. इयत्ता नववीत शिक्षण घेत असतानाच वरिष्ठ गटात मिळविलेले हे यश त्याच्या जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाचे फलित आहे.

११ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत शिलाँग (मेघालय) येथे होणाऱ्या वरिष्ठ राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत शौर्य महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.शौर्यसह अकादमीतील इतर खेळाडूंनाही राज्य क्रीडा मार्गदर्शक अमर सदानंद जाधव, धनुर्विद्या प्रशिक्षक प्रतीक पोफळे व ऋषिकेश चांदूरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडू नियमित सराव करून विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांसाठी स्वतःला सज्ज करीत आहेत.शौर्यच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष प्रशांत देशपांडे, सचिव प्रमोद चांदूरकर, क्रीडा विभागाचे उपसंचालक अविनाश पुंड, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, एकलव्य धनुर्विद्या अकादमीचे मार्गदर्शक तथा शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त सदानंद जाधव, तसेच अकादमीचे पदाधिकारी उत्तमराव मुरादे, राजेंद्र लवंगे, विलास मारोटकर,विशाल ढवळे,अनुप काकडे,उमेश परसनकर,महेंद्र मेटकर,अनिल निकोडे, व पवन जाधव यांनी त्याचे अभिनंदन केले.याशिवाय अकादमीतील खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमींनीही शौर्यचे कौतुक करून शिलाँग येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

कष्टकऱ्यांच्या दारात यंदाची गोड भाऊबीज

महसूल मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत सोहळ्याचे आयोजन

अमरावती/का.प्र.



गोरगरीब शेतकरी आणि कष्टकरी महिलांच्या कष्टाचा सन्मान राखत यंदाची भाऊबीज थेट त्यांच्या वस्तीत साजरी करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला असून, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावतीतील वडरपुरा येथे हा अनोखा कौटुंबिक स्नेहमेळावा रंगणार आहे. उपेक्षित घटकांतील भगिनींच्या चेहऱ्यावर सणाचा खरा आनंद फुलवण्यासाठी या विशेष उपक्रमाची आखणी करण्यात आली आहे. मातीशी नाळ जोडलेल्या शेतमजूर, कष्टकरी आणि आदिवासी महिलांना भाऊरायाची भक्कम माया मिळवून देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न ठरेल. आ. रवी राणा, खा. नवनीत राणा यांच्या पुढाकाराने वडरपुऱ्यात हा भावनिक मेळा भरत असून परिसरातील प्रत्येक नागरिकाने या कौटुंबिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

वडरपुरा भागात होणाऱ्या या सोहळ्यात शेकडो भगिनींना सन्मानाने एकत्र आणून त्यांच्या हक्काचा आनंद वाटला जाईल. उपेक्षित वर्गातील प्रत्येक माऊलीला कुटुंबातील सदस्याप्रमाणे आदर देत परंपरेचा खरा गोडवा या निमित्ताने अनुभवता येईल.

पश्रोट येथे ढाल पूजन उत्साहात

पश्रोट - आधुनिकतेच्या प्रभावाखाली अनेक पारंपरिक चालीरीती बदलत असल्या तरी, पश्रोट आणि त्याच्या परिसरातील गोंड-ग्वारी समाजाने द्वापर काळापासून चालत आलेली ढाल पूजेची परंपरा आजतागायत मोठ्या भक्तीभावाने जपली आहे. या समाजासाठी दिवाळी म्हणजे केवळ लक्ष्मी पूजा नसून, ढाल पूजा हा सर्वात मोठा सण आहे. ढाल पूजनालाला गोंडी भाषेत जांगो, लिंगो पूजा म्हणतात. गावातील पाच ठिकाणांहून रामकृष्ण सायम, नारायणव वाघडे (गवारी) ढाळ पूजेसाठी कधलीला गेले, तिथे रामकृष्ण सायम, नारायणव वाघडे (गवारी) त्यांच्या घरी थांबले आणि तेलनखडी (रामपूर) येथून रामकृष्ण सोनावणे (गवारी), परासरम धुर्वे (गोंड), मिरवनुक अचडी गोठण देवबार गेली. यांनी तिथे भेटवस्तू आणि नैवेद्य अर्पण करून गुरधोरांची पूजा केली. नंतर, ते मुख्य ठाण्यातील बस स्टँडवर सुखदेव भलावी यांच्या घरी आले आणि निरोप दिला. हि मिरवणुक पहाण्यासाठी नागरिक गोठाण्यावर जमा होतात.

दिवाळीसाठी मोर्शी एसटी आगरातून जादा बसफेरी

मोर्शी - हिंदू धर्मीय लोक सर्वात महत्त्वाची दिवाळी: सानाला गावाला ये-जा करणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन, प्रवाशांच्या सोयीसाठी मोर्शी आगाराने मोर्शीहून शेगाव, यवतमाळ, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुणे या मार्गावर अतिरिक्त पाच बस चालवणार आहे. मोर्शी ते वरुड, अमरावती अशी जादा जिजाऊ बस सेवा उपलब्ध करुन दिल्या. मोर्शी आगारातून दररोज सकाळी ६.१५ वाजता मोर्शी ते बुलढाणा, सकाळी ६.१५ वाजता मोर्शी ते नागपूर आणि दुपारी १.३० वाजता मोर्शी ते माहूरसाठी नियमित बस फेरी उपलब्ध आहे.

धरणांत ठणठणाट; रब्बी सिंचनाला पाणी नाही!

उर्ध्व वर्धा व शहानूर प्रकल्पांतून पाणी सोडणे अशक्य

अमरावती/का.प्र.

यंदा मान्सूनचा अपुऱ्या पावसामुळे,'एल-निनो' आणि 'हिंदी महासागर द्विध्रुव' (आयओडी) यांमुळे जिल्ह्यातील प्रमुख जलप्रकल्पांमधील पाण्याचा दाब लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. परिणामी, २०२६-२७ च्या रब्बी हंगामासाठी जिल्ह्यातील महत्त्वाच्या ऊर्ध्व वर्धा (अप्पर वर्धा) मोठ्या प्रकल्पातून आणि शहानूर मध्यम प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी सोडणे पूर्णपणे अशक्य झाले आहे. जलसंपदा विभागाने अधिकृत माहिती प्रसिद्ध केली आहे की, उद्यानात उपलब्ध असलेले जलस्रोत केवळ पिण्याच्या पाण्यासाठी, जनावरांसाठी आणि



अत्यावश्यक वापरासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. धरण विभागाच्या या निर्णयामुळे निर्माण झालेल्या गोंधळामुळे शेतकऱ्यांसाठी सिंचनाचे मोठे संकट निर्माण झाले आहे.

९ नोव्हेंबर रोजी संपलेल्या तारखेनुसार, ऊर्ध्व वर्धा धरणाच्या एकूण क्षमतेपैकी केवळ ४१.८६ टक्के (२३६.१० दशलक्ष घनमीटर) पाणीपुरवठा सुयोग्य राहिला आहे. वार्षिक सरासरीनुसार, एकूण ८८.५१ दशलक्ष घनमीटर पाणी शिल्लक आहे.बाष्पीभवन आणि बाष्पोत्सर्जनामुळे घट होईल. अमरावती महानगरपालिका, विविध नगरपालिका, ग्रामपंचायती आणि इतर सरकारी पाणीपुरवठा योजनांसाठी वार्षिक ६६.८४ गॅलन पिण्याचे पाणी आणि उद्योगांसाठी २९.७५ गॅलन पाणी राखीव ठेवण्यात आले आहे. याशिवाय, सरकारी नियमांनुसार, ३३.०९ दलघमी (१० टक्के) पाणी आकस्मिक राखीव साठा म्हणून तर गुरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी १० दलघमी साठा बाजूला ठेवण्यात आला आहे. त्यामुळे शेतीला सिंचनासाठी धरणात थेबभरही पाणी शिल्लक राहिलेले नाही.

दुसरीकडे, अचलपूर मध्यम आणि लघु पाटबंधारे विभागांतर्गत येणा-या मध्यम प्रकल्पातही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत, शहानूर धरणात ३४.०९ दलघमी (७४.०५ टक्के) उपयुक्त पाणीसाठा नोंदवला गेला असला, तरी नियोजित आरक्षणामुळे शेतीसाठी पाणी देणे शक्य होणार नाही. या प्रकल्पातून बाष्पीभवनपोटी ५.५० दालघमी साठा गृहीत धरण्यात आला आहे. उरवरीत साठ्यातून परिसरातील नगरपालिका परिषद आणि ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठा २३.२८ दलघमी,आकस्मिक आरक्षित साठ्यासाठी ३.५० दलघमी (१० टक्के) आणि गुरांसाठी १.७५ दलघमी (५ टक्के) पाणी राखुन ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शहानूर प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामाही कोरडाच जाण्याची चिन्हे आहेत.

अनधिकृत उपोषण करणाऱ्यांवर कारवाई

जर धरणाटुन किंवा कलव्याटुन यांच्याकडून कोणत्याही प्रकारे पाण्याचा अनधिकृत वापर केल्यास, 'महाराष्ट्र पटबंधरे अधिनियम १९७६' नुसार संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संकेत पटबंधरे विभागाने दिला आहे.

दुष्काळाचे सावट, तरीही मेळघाटात घुंगरू बाजाराची तयारी

सर्वत्र दिवाळीचा माहोत सुरू असतानाच मेळघाटातील आदिवासी घुंगरू बाजाराच्या तयारीत गुंतला आहे. घरांची स्वच्छता, पशुधनाची निगा, गुराख्यांच्या सन्मानाची तयारी केली जात आहे. मात्र, धारणी आणि चिखलदरा हे दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाल्याने या उत्सवावरही टंचाईचे सावट आहे.



धारणी परिसरातील घुंगरू बाजार हे मेळघाटच्या दिवाळीचे प्रमुख आकर्षण आहे. दिवाळीनंतर धारणीसह हरिसाल, सेमाडोह, कोल्हा आदी गावांत भरणाऱ्या या बाजारात आदिवासी बांधव सहभागी होतात. गोंड समाजातील थाटच्या म्हणून ओळखले जाणारे गुराखी पारंपरिक वेशभूषेत पायात घुंगरू बांधून बाजारात येतात. ढोल, टिमकी, बासरी आणि म्हशीच्या शिंगापासून तयार केलेल्या वाद्यांच्या साथीने सादर होणारे नृत्य या उत्सवाचे वैशिष्ट्य आहे.बाजारातील हा सांस्कृतिक आविष्कार केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून वर्षभराच्या श्रमांनंतर एकत्र येण्याची आणि आपली सांस्कृतिक ओळख जपण्याची संधी असते. या परंपरेला पशुपालनाच्या अर्थव्यवस्थेची जोड आहे. वर्षभर गावकऱ्यांची गुरे जंगलात चरायला नेणे, देखभाल करणे ही जबाबदारी थाट्या गुराखी सांभाळतात.

दुष्काळातही परंपरेच्या जपणुकीसाठी आदिवासींची धडपड

त्यांच्या श्रमांचा सन्मान म्हणून धान्य, रोख रक्कम आणि जीवनावश्यक वस्तू दिल्या जातात. काही दिवस त्यांना विश्रांतीही मिळते. त्यामुळे घुंगरू बाजार हा गुराखी आणि पशुधन मालकांमधील नात्याचा उत्सव ठरतो. परस्परावलंबी नात्याचा उत्सव ठरतो.यंदा मात्र या परंपरांशी जोडलेल्या शेती आणि पशुपालन क्षेत्रालाच दुष्काळाचा फटका बसला आहे. धारणी, चिखलदऱ्यासारख्या बाजारपेठांमधून तो दिसूनही येत आहे. जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता हा प्रश्न महत्त्वाचा बनला आहे. शासनाने दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करून चारा आणि पाणी उपलब्धतेसाठी उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे पशुधनाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या दिवाळीच्या परंपरा यंदा अधिक आव्हानात्मक परिस्थितीत साजऱ्या होत आहेत.

मेळघाटातील अप्रतिम निसर्ग सौंदर्य प्रत्येकाच्या मनाला साद घालते. उंचच उंच पर्वतरांगा आणि त्यातून खळाळत वाहणाऱ्या नद्यांमधील पाण्याच्या आवाजात आठवडी बाजारातील घुंगरांचे आवाज समधूर स्वर जेंव्हा भर घालतात तेंव्हा मेळघाटाचे सौंदर्य अधिकच खुलते. दिवाळीच्या काळात लक्ष्मीपूजनानंतर मेळघाटातील गावागावात भरणाऱ्या साप्ताहिक बाजारहटांनाच 'घुंगरू बाजार' असे म्हणतात. मात्र, वर्षभर भरणारे आठवडीबाजार आणि दिवाळीच्या दिवसांतील बाजारहाट यात तुलनात्मक बरेच वेगळेपण आहे.सातपुडा पर्वतरांगाच्या कुशीत वसलेल्या आदिवासी गावांमध्ये ऐन दिवाळीतच हे घुंगरूचे सुमधुर स्वर निनादतात. या काळात भरणाऱ्या आठवडीबाजारातील आदिवासींचे नृत्य आणि नृत्यादरम्यान बाजारातील व्यापाऱ्यांकडून मिळणाऱ्या भेटवस्तू हे खास आकर्षण असते.

मेळघाटात कोरकूंप्रमाणेच मोठ्या संख्येने गोंड समाजाचे वास्तव्य आहे. गोंड समाजाशिवाय येथील गावांना पूर्णत्व नाही. गावातील गोधन चरण्यासाठी नेणे आणि आणण्याचे काम पारंपरिकरीत्या गोंड समाजातील लोक करतात. मेळघाटातील अनेक गावांमध्ये गोपालनाची ही जबाबदारी गोंड व्यक्तींना दिली असते. त्या बदल्यात त्यांच्या रोजच्या भाजी-भाकरीची तसेच वर्षभराच्या धान्याची सोय गोधन मालक करीत असतात. दिवाळीनंतर संपूर्ण गावाच्या वतीने या गोंड व्यक्तींचा सन्मान केला जातो. गुरांना बांधलेला कपडा त्यांच्या हाताने सोडविला जातो. त्यानंतर, मेळघाटातील घुंगरू बाजारांना सुरूवात होते. दिवाळीनंतरच्या काळात हे बाजार भरत असतात.

स्वतंत्र परंपरा व संस्कृतीचे जतन

मेळघाटातील प्रतिकूल परिस्थितीत होणारी निसर्ग शेती, आदिवासींचे वन्यजिवांवर असलेले प्रेम आणि तुटपुंज्या उत्पन्नातही जंगलाला केंद्रस्थानी ठेऊन दिवाळी सण साजरा केला जातो. पारंपरिक आदिवासी पोशाख परिधान करून ढोल, बासरी आणि घुंगरांच्या माळा अशा वाद्यवृंदांच्या सहाय्याने आठवडी बाजारात घुमणारे संगिताचे सुरेल सूर हे आजवर खास आकर्षण ठरले आहे. पुढील आठ दिवस घुंगरू बाजाराचा आनंदोत्सव पहावयास मिळणार आहे, सातपुड्याच्या शेवटचे टोक म्हणजे मेळघाट.

७० टक्क्यांहून अधिक वन असलेल्या मेळघाटात पुरातन काळापासून आदिवासींच्या विविध जमाती वास्तव्यास आहे. शहरी संस्कृतीपासून लांब राहणाऱ्या या आदिवासी बांधवांनी आपली स्वतंत्र परंपरा व संस्कृती जतन केली आहे.

अनोखा घुंगरू बाजार

गोंड किंवा थाट्या नावाने ओळखले जाणारा हा समाज दिवाळीत सामूहिक पूजन करतो. त्यावेळी पूजनाच्या स्थानी संपूर्ण गावातील पशू आणले जातात. पूजन करणाऱ्या गोंडांना टॉवेल, पंचा, साडी, धोतर वगैरे देतात. यावेळी देखील गोंड महिला आणि पुरूष गोंडी नृत्य सादर करतात. मेळघाटात हरिसाल, चाकर्दा, धारणी, सुसर्दा, सेमाडोह, चिखलदरा येथे घुंगरू बाजार भरत असतात. या बाजारांमध्ये गोंड लोक घुंगरू बांधून नृत्य सादर करतात. आदिवासी समाजातील पुरुष मंडळी विशेष पोषाखात घुंगरु बाजारात येतात. पांढरा शर्ट, पांढरे धोतर , डोक्यावर रंगीत पगडी, त्यावर तुरेदार सजावट आणि अंगात चढवलेला कोट. दोन्ही हाताला शंखांची भलीमोठी माळ, हातात तीन फूट लांब बासरी, गळ्यात लटकवलेली ढोलकी आणि पायाला घुंगरांच्या तोड्या अशा पारंपरिक वेशभूषेत आदिवासी लोक बाजारात सामूहिक नृत्य करतात.

असे दहा ते बारा समूह आठवडी बाजारात फिरतात. या समूहांपैकीच दोन ते तीन आदिवासी बांधव हातात झोळी घेऊन बाजारातील व्यापाऱ्यांकडे दिवाळीनिमित्त भेटवस्तूंची मागणी करतात. व्यापारीसुद्धा त्यांच्या दुकानातील विक्रीकरिता ठेवलेल्या वस्तू स्वखुशीने त्यांच्या झोळीत टाकतात. भाजीपाल्याच्या दुकानातून एक कांदा, एखादा बटाटा, कोबीचे फूल, बांगड्याच्या दुकानातून बांगड्या, सौंदर्यप्रसाधनांच्या दुकानातून बिंदी, अंगठी, दैनंदिन उपयोगातील विविध वस्तू असा खास संग्रहच या आदिवासींच्या झोळीमध्ये होतो.

गोंडी नृत्य करताना त्यांच्यात दोन लोकांजवळ कापडाची झोळी घेऊन बक्षीस मागणारे असतात. वर्षभर जनावरे चारल्यामुळे वर्षातून एकदा आपला हक्काने बक्षिसांचा स्वीकार करतात. यात रोख रकमेसह जे काही दुकानातील सामान दिले जाते, त्याचा स्वीकार प्रेमाने केला जातो.

मेळघाट परिसरातील धारणीपासून सुरू झालेला हा घुंगरू बाजार हरिसालच्या आठवडीबाजारापर्यंत असतो. यंदा या बाजारात आसपासच्या गावातून मोठ्या प्रमाणावर आदिवासी बांधव एकत्रीत झाले आहेत. मेळघाटातील कळमखार,बिजूधावडी, टिटंबा, देउतलई, बैरागड, सेमाडोह, हरिसाल काटकुंभ, चुर्णी, हतरू येथे घुंगरू बाजार आयोजित करण्यात आले आहे.

-सुशिला धांडे (मेळघाट)

यंदाही फटाक्यांचीच दिवाळी



दिवाळी खरेतर प्रकाशाचा, उत्साहाचा आणि मांगल्याचा सण. ४ दिवस चालणाऱ्या या सणाची सिद्धता एक महिना आधीपासून सुरु होते. दिवाळी सणाची आतुरता बच्चे कंपनीपासून मोठ्यांनाही असते. यानिमित्ताने संपूर्ण घराची साफसफाई होते, घराला रंगरंगोटी होते. जुने पडीक सामान बाहेर काढले जाते. नवनवीन वस्तू घरात येतात, नवीन कपडे शिवले जातात, दिवाळीनिमित्त घराला रोषणाई केली जाते, दाराजवळ आकाशकंदील लावला जातो, दरवाज्यापुढील रांगोळी आणि पणत्यांची मांडणी घराच्या सौंदर्यात आणखी भर टाकते. सुगंधी आणि रुचकर फराळाची मेजवानी घरातील प्रत्येकाला खुलवते. आप्तेष्टांना आणि मित्रमंडळींना शुभेच्छा दिल्या जातात, बच्चे कंपनीला फटाके वाजवायला मिळतात. पूर्वीच्या काळी मिळणारे फटाके हे मर्यादित आवाजाचे आणि मर्यादित धुराचे असायचे. आता मात्र फटाक्यांमध्येही नवनवीन प्रकार पाहायला मिळतात. बच्चे कंपनीसह मोठ्यांनी फोडायचे फटाके पुष्कळ प्रमाणात बाजारात येऊ लागले आहेत, ज्यामुळे लहानांसोबत तरुण मंडळीही मोठ्या प्रमाणात फटाके फोडताना दिसतात.

कुर्ला येथील सनराइज इस्टेटमधील गोदामाला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवताना दोन अग्निशमन कर्मचारी जखमी झाले. या दुर्घटनांमुळे मुंबई अग्निशमन दलावर प्रचंड ताण आला. मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा फटाक्यांमुळे लागलेल्या आगींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नवी मुंबईत दिवाळीच्या दोन दिवसांत ६२ आगींची नोंद झाली. कल्याण-डोंबिवली परिसरात ७० आगींच्या घटना घडल्या. त्यापैकी ६८ घटना फटाक्यांशी संबंधित होत्या. मीरा-भाईंदरमध्ये तीन दिवसांत १३७ आगींची नोंद झाली. वसई-विरारमध्ये ५५ आगींच्या घटना घडल्या. मुंबई महानगर प्रदेशात जवळपास ३९० आगींच्या घटना नोंदवल्या गेल्याचे वृत्त आहे. या घटनांमध्ये काही ठिकाणी इमारती, दुकाने आणि वाहनांचे नुकसान झाले. पुण्यात यंदा फटाक्यांमुळे आग लागण्याच्या प्रमाणात गतवर्षीच्या तुलनेत दुपटीने वाढ झाली. नागपूरमध्ये फटाक्यांमुळे १०० हुन अधिक नागरिक जखमी झाले असून त्यापैकी ३५ जणांच्या डोळ्यांना गंभीर दुखापत झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात घराला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. दिल्लीत एका १० वर्षाच्या मुलाच्या पोटात फटाक्यातील रॉकेट घुसून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. राजस्थानमधील पाली येथील फटाक्यांच्या दुकानाला आग लागून दोघांचा मृत्यू झाला. तामिळनाडूत फटाक्यांच्या कारखान्याला आग लागून २३ कामगारांचा मृत्यू झाला. तर गुजरातमधील कर्णावती येथील एका बेकायदेशीर फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट होऊन ९ कामगारांचा मृत्यू झाला. मध्य प्रदेशातील देवास येथील फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट होऊन तीन कामगारांचा मृत्यू तर २५ जण जखमी झाले.

फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण आणि अपघात लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी महत्त्वपूर्ण निर्बंध घातले आहेत. विशेषतः दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने फटाक्यांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंत आणि वापरापासून वेळेच्या मर्यादेपर्यंत विविध बाबींचे नियमन केले. यंदा २९ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, दिल्ली-एनसीआरमध्ये ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी केवळ प्रमाणित हरित फटाके सकाळी ६ ते ७ आणि रात्री ८ ते १० या वेळेत फोडण्याची परवानगी देण्यात आली. रुग्णालये, वृद्धाश्रम आणि अधिसूचित शांतता क्षेत्रांच्या ३०० मीटर परिसरात फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली. बेरियमयुक्त आणि मान्यताप्राप्त नसलेल्या फटाक्यांवरही निर्बंध घालण्यात आले. ९ नोव्हेंबरपासून पुन्हा संपूर्ण बंदी लागू करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. न्यायालयाच्या या भूमिकेमागे धार्मिक भावना दुखावण्याचा हेतू नसून नागरिकांचे आरोग्य, पर्यावरणाचे संरक्षण आणि सार्वजनिक सुरक्षितता यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. मात्र, न्यायालयाचे आदेश कागदावर राहून प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होत नसेल, तर अशा निर्बंधांचा अपेक्षित परिणाम साध्य होणार नाही. मुंबईतील दुर्घटनांनंतर प्रशासनाने २५ नोव्हेंबरपर्यंत रॉकेट आणि हवेत उडणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात हे निर्बंध ८ जानेवारी २०२७ पर्यंत वाढवण्यात आले आहेत. तीन मोठ्या आगींच्या घटनांनंतर घेतलेला हा निर्णय परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट करतो.

१० वर्षांपूर्वी दिवाळीत फटाक्यांच्या आवाजाला घाबरून भालूने जीव सोडला. भालूच्या मृत्यूमुळे गावातील ४५० नागरिक हळहळले. भालूच्या मृत्यूमुळे ग्रामस्थांनी गावात फटाके बंदीचा निर्णय घेतला. तेव्हापासून आजपर्यंत दिवाळीच्या काळात गावातील कोणीच फटाके वाजवत नाहीत. परंपरागत पद्धतीनुसार दिवाळी साजरी करतात. भालूच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रामस्थांनी गावात १० हजार झाडे लावली.त्यामुळे एकेकाळी ओसाड असलेले हे गाव आज हिरवळीने बहरले आहे. जी बाब चिंचणीसारख्या छोट्याशा गावातील लोकांच्या लक्षात आली ती शहरातील सुशिक्षित लोकांच्या केव्हा लक्षात येणार?

वास्तविकत: दिवाळी हा दिव्यांचा सण. तिमिराकडून तेजाकडे जाण्याची शिकवण देणारा सण; मात्र दिवाळीतील जीवघेण्या फटाक्यांमुळे आपला प्रवास तेजाकडून तिमिराकडे चालला आहे कि काय असे वाटू लागते. दिवाळी आणि फटाक्यांचा काहीच संबंध नाही. फटाक्यांची निर्मिती केवळ आतषबाजीसाठी करण्यासाठी करण्यात आली आहे. दिवाळीच्या काळात आतषबाजी करावी असा उल्लेख कोणत्याही प्राचीन ग्रंथांत अथवा धर्मशास्त्रात नाही, मग दिवाळीसारख्या पवित्र सणात ही प्रदूषणाची खैरात कशासाठी? यंदा देशातील हवेची गुणवत्ता वाईट श्रेणीत बिघडल्याने अनेक राज्यांनी फटाके फोडण्यावर बंदी घातली तर काही राज्यांनी केवळ हरित फटाके फोडण्यास अनुमती दिली. दरवर्षी दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांमुळे होणारी वित्त आणि जीवित हानी, फटाक्यांच्या बाबतीत न्यायालयाला करावा लागणार हस्तक्षेप, या दिवसांत प्रशासनावर पडणारा अधिक भार या सर्व बाबी लक्षात घेऊन दिवाळीच्या काळात फटाके फोडण्यावर केंद्र सरकारने देश पातळीवर बंदी आणायला हवी

जगन घाणेकर
मो.९६६४५५९७८०

दीपोत्सवात विघ्न नको!

दिवाळीचा उत्साह साजरा करताना क्षणभराचा निष्काळजीपणा जीवघेणा ठरू शकतो, याची येडशीतील दुर्घटनेने गंभीर जाणीव करून दिली आहे. आगीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची सतर्कता आणि प्रशासनाची सज्जता हीच सुरक्षित दीपोत्सवाची खरी गुरुकिल्ली आहे.



दिवाळीच्या काळात आगीच्या दुर्घटना घडत असल्या, तरी वेळीच सतर्कता आणि योग्य खबरदारी घेतल्यास अनेक दुर्घटना टाळता येऊ शकतात. मात्र, काही घटना इतक्या अचानक घडतात की बचावाची संधीही मिळत नाही. धाराशिव जिल्ह्यातील येडशी येथे लक्ष्मीपूजनाच्या रात्री घडलेली दुर्घटना याचेच दुर्दैवी उदाहरण आहे. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. रात्री अवघे गाव गाढ झोपेत असताना पणतीमुळे दुकानाला आग लागली आणि काही क्षणांतच आगीने जवळच्या घराला कवेत घेतले. आजोबांपासून नातीपर्यंत तीन पिढ्यांचा या अग्नितांडवात दुर्दैवी अंत झाला. एका क्षणात हसतेखेळते कुटुंब आगीत उद्ध्वस्त झाले.

छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांतही आगीच्या घटना घडल्या. या घटनांमध्ये जीवितहानी झाली नसली, तरी मोठी वित्तहानी झाली आहे. नांदेड जिल्ह्यातील नायगाव येथील घटना तर विशेष हृदयद्रावक आहे. कापड दुकानात नोकर म्हणून काम करणाऱ्या दोन बंधूंनी स्वकष्टातून आणि पत्नीच्या नावावर कर्ज काढून चार वर्षांपूर्वी कापडाचे दुकान सुरू केले होते. मात्र, सोमवारी सकाळी लागलेल्या आगीत त्यांचे दुकान जळून खाक झाले. अनेक वर्षांच्या कष्टातून उभे केलेले स्वप्न काही क्षणांत राख झाले. अशा दुर्घटना केवळ आर्थिक नुकसान करणाऱ्या नसतात, तर कष्टकरी कुटुंबांच्या जगण्यालाच मोठा धक्का देणाऱ्या असतात.

वास्तविक, दिवाळीचा सण जवळ आला की प्रशासनाकडून फटाके, विद्युत रोषणाई, पणत्या आणि दिव्यांमुळे होणाऱ्या संभाव्य दुर्घटनांबाबत नागरिकांना सावध केले जाते. सुरक्षिततेच्या सूचना दिल्या जातात. तरीही अनेकदा नागरिकांचा हलगर्जीपणा अंगलट येतो. आगीची घटना घडल्यानंतर अग्निशमन दलाला पाचारण केले जाते; मात्र घटनास्थळी पोहोचेपर्यंत अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. अरुंद रस्ते, बेशिस्त पार्किंग, अतिक्रमणे आणि बाजारपेठांमधील गर्दी यामुळे अग्निशमन दलाच्या वाहनांना घटनास्थळी पोहोचणे कठीण होते. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने बाजारपेठा आणि दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये अग्निसुरक्षेची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवणे, आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

दिवाळीचा आनंद जीव धोक्यात घालून साजरा करण्यासाठी नाही. फटाक्यांची आतषबाजी, विद्युत रोषणाई आणि आकर्षक सजावटीपेक्षा कुटुंबाचे सुरक्षित आयुष्य अधिक महत्त्वाचे आहे. क्षणभराच्या निष्काळजीपणामुळे आयुष्यभराची कमाई राख होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षिततेबरोबरच शेजाऱ्यांच्या आणि सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षेचीही काळजी घेतली पाहिजे.

यंदा दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दिवाळीचा उत्साह काहीसा कमी राहील, असे वाटत होते. मात्र, प्रत्यक्षात तसे चित्र दिसले नाही. फटाक्यांची आतषबाजी आणि घरांवरील विद्युत रोषणाईने दिवाळीचा उत्साह कायम असल्याचे दिसून आले. दिवाळीच्या काळात घरे, दुकाने, कार्यालये आणि इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई केली जाते. मात्र, निकृष्ट दर्जाच्या वायर, खराब प्लग, सैल जोडण्या आणि एकाच सॉकेटवर अनेक उपकरणांचा भार टाकल्यामुळे शॉर्टसर्किट होण्याची शक्यता वाढते. फटाके आणि पणत्यांप्रमाणेच विद्युत बिघाडही आगीचे मोठे कारण ठरू शकतो. त्यामुळे विद्युत रोषणाई करताना दर्जेदार साहित्य वापरणे आणि जोडण्यांची तपासणी करणे आवश्यक आहे.

दीपोत्सवाचा पहिला दिवस पार पडला आहे. बलिप्रतिपदा आणि भाऊबीजेला उत्साह आणखी वाढणार आहे. अशा वेळी आनंदाच्या वातावरणात आगीचे विघ्न पडू नये, यासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे आहे. दिवाळीचा प्रकाश प्रत्येक घरात आनंद घेऊन यावा; कोणाच्याही संसारात अंधार पसरवणारा ठरू नये. येडशीसारख्या हृदयद्रावक दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, हीच अपेक्षा. दिवे उजळू द्या; पण निष्काळजीपणाची ठिणगी पडू देऊ नका! दिव्यांची रोषणाई आणि फटाक्यांचा जल्लोष यापेक्षा कुटुंबीयांचे सुरक्षित आयुष्य अधिक मोलाचे आहे. दिवाळीचा प्रकाश घराघरांत आनंद पसरवणारा ठरावा.

-उमेश काळे

भूक निर्देशांकात सुधारणा केव्हा होणार?

अलीकडेच जागतिक अन्न दिवस जगभरात साजरा झाला. आणि त्याच दिवशी दरवर्षी भारतासह विविध देशांसाठी भूक निर्देशांक जाहीर होत असतो. जो यावर्षीदेखील जाहीर झाला. जगात आणि भारतात संपर्क, दळणवळण, तंत्रज्ञान, वित्त भांडवल, फॅशन, अन्नधान्य उत्पादन आणि वैविध्यपूर्ण खाद्यपदार्थ या सर्वच क्षेत्रात अतिशय वेगाने बदल होत आहेत. पण जागतिक भूक निर्देशांक फारसा हलत नसल्याचे निरीक्षण तज्ञांनी नोंदवले आहे. जगामध्ये अन्नधान्याचा तुटवडा आहे म्हणून कोट्यवधी लोकांना वर्षानुवर्षे असे आयुष्य कंठावे लागत आहे, असे मुळीच नाही. तर अन्नधान्य क्षेत्राची आणि एकूणच विविध गरीब देशांची राजकीय अर्थव्यवस्था अशी बनवली गेली आहे की, त्यामुळे कोट्यवधी लोक त्याच दारिद्र्याच्या दलदलीत खितपत पडले आहेत. भूक निर्देशांक काही निकषांवर घेतलेला असतो. त्यातील प्रमुख निकष म्हणजे पुरेसे उष्मांक मिळणे, लहान मुलांची खुंटलेली वाढ, बालमृत्यूचे प्रमाण इत्यादी.

२०२६ च्या जागतिक भूक निर्देशांकानुसार एकशे बावीस देशांमध्ये भारताचा क्रमांक शंभरावा आहे. क्रमांक जेवढे जास्त तेवढी त्या देशातील परिस्थिती वाईट आहे असे समजले जाते. भारताचा भूक निर्देशांक मागील काही वर्षांपासून सुधारलेला नाही. २०१९ मध्ये तो एकशे दोन एवढा होता. या आधीच्या काळातदेखील आपल्या देशाचा क्रमांक साठ ते सत्तर यामध्येच राहात होता. दक्षिण आशियातील काही छोटे देश भूक निर्देशकांत भारतापेक्षा बरेच वर आहेत. त्यामध्ये नेपाळ बहात्तर, बांगलादेश चौऱ्यांशी, श्रीलंका त्रेपन्न विशेष म्हणजे भारत, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान हे देश भूक निर्देशांकाच्या एकाच वर्गवारीत आहेत. आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकाकडे झेपावत असताना, दरवर्षी अर्थसंकल्पात लाखो कोटी रुपये विविध कल्याणकारी योजनांवर खर्च होत असताना, ऐंशी कोटी नागरिकांसाठी मागील सात वर्षांपासून मोफत धान्य योजना सुरु असताना तसेच त्याचबरोबर भारताचा जीडीपी, निर्देशांक आणि देशातील मूठभर श्रीमंतांची संपत्ती अनेकपटीने वाढत असताना भारताचा भूक निर्देशांक मात्र आहे.

प्रा. मधुकर चुटे
नागपूर-९४२०५६६४०४

■ गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

अकोल्याच्या वैभवात भर

सांस्कृतिक भवनासह जलतरण तलाव लोकार्पणासाठी सज्ज!

१८ ते २० नोव्हेंबरदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अकोला दौरा; शहर बससेवेसह विविध विकासकामांचेही उद्घाटन होणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

सांस्कृतिक, धार्मिक आणि शैक्षणिक वारसा लाभलेल्या अकोला शहराच्या वैभवात आता भव्य सांस्कृतिक भवन आणि अत्याधुनिक जलतरण तलावाची भर पडणार आहे. राज्य शासनाच्या विशेष निधीतून उभारण्यात आलेले हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प लोकार्पणासाठी सज्ज झाले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १८ ते २० नोव्हेंबरदरम्यान अकोला दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. या दौऱ्यात सांस्कृतिक भवन, जलतरण तलावासह शहरातील विविध विकासकामांचे उद्घाटन आणि शहर बससेवेचा शुभारंभ होणार असल्याने प्रशासन आणि भाजपच्या वतीने तयारीला वेग आला आहे.

अकोला शहरातील क्रीडाप्रेमी आणि कलारसिकांसाठी सांस्कृतिक भवन व जलतरण तलाव हे महत्त्वाचे प्रकल्प ठरणार आहेत. या प्रकल्पांची सुरुवात स्वर्गीय आमदार गोवर्धन शर्मा आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री संजय धोत्रे यांच्या पुढाकारातून झाली होती. मात्र, मध्यंतरी निधीअभावी कामे रखडली होती. त्यानंतर आमदार रणधीर सावरकर यांनी विशेष निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांतून क्रीडा संकुल आणि सांस्कृतिक भवनाच्या कामांना गती मिळाली आणि हे प्रकल्प आता पूर्णत्वाच्या टप्प्यावर पोहोचले आहेत.

दरम्यान, शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी



खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्र शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करून आणला. त्यातून सुरू होणारी अकोला महानगरपालिकेची शहर बससेवा शहरासह पंचक्रोशीतील नागरिकांसाठी महत्त्वाची सुविधा ठरणार आहे. सांस्कृतिक आणि क्रीडा सुविधांसोबतच सार्वजनिक वाहतुकीच्या क्षेत्रातही शहराला नवी दिशा देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या प्रस्तावित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. जिल्हाधिकारी मीनाताई मीना, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते प्रसाद पाटील, शरद जावळे, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी नियोजनात व्यस्त आहेत. या तयारीचा आढावा घेण्यासाठी आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, महापौर शारदा खेडकर, विजय अग्रवाल, जयंत मसने, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता मृणाली ढिगारे, अनिल गिरी, रंजीत खेडकर, गिरीश जोशी, पवन महाले, विवेक भरणे, आरती धोगलीया, निकिता देशमुख, हर्षद भाबरे, प्रकाश धोगलीया, पुरुषोत्तम मालानी, संजय मालानी, यश मालानी आणि क्रीडा अधिकारी सतीश भट आदींनी पाहणी केली.

सांस्कृतिक भवनातील विविध कामांची माहिती घेत आमदार रणधीर सावरकर यांनी संबंधितांना आवश्यक सूचनाही केल्या. अकोल्यातील क्रीडाप्रेमी आणि कलावंतांची अनेक वर्षांची मागणी पूर्णत्वास जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या प्रकल्पांच्या उभारणीसाठी योगदान देणारे स्वर्गीय राम जाधव, बाबासाहेब धाबेकर यांच्यासह शहरातील अनेक कलावंतांची त्यांनी आवर्जून आठवण काढली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राजेश्वर नगर परिसरात होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध उपक्रमांचेही नियोजन करण्यात येत आहे. अकोल्यातील फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने छायाचित्रांचे विशेष कलादालन उभारण्यात येणार आहे. तसेच वनविभागाच्या माध्यमातून अकोला जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती आणि उपक्रमांचे प्रदर्शनही आयोजित केले जाणार आहे.

एकूणच, सांस्कृतिक भवन, जलतरण तलाव आणि शहर बससेवा या प्रकल्पांच्या लोकार्पणामुळे अकोला शहराच्या विकासाला नवी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रखडलेल्या प्रकल्पांना गती देऊन ते प्रत्यक्षात आणण्याच्या प्रयत्नांना आता लोकार्पणाच्या निमित्ताने मूर्त स्वरूप मिळणार आहे.

जनजाती गौरव दिन सप्ताह; विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन



■ प्रतिनिधी | अकोला ■

आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी ११ ते १८ नोव्हेंबरदरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन - पालकमंत्री

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस देशभरात 'जनजाती गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त शासनाच्या वतीने ११ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत 'भगवान बिरसा मुंडा गौरव दिन सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांमध्ये आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल-जंगल-जमीन यांच्या संरक्षणासाठी आणि सामाजिक सुधारणांसाठी केलेला संघर्ष प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आदिवासी समाजाचे योगदान, संस्कृती, परंपरा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे, असे ॲड. फुंडकर यांनी सांगितले.

सप्ताहात विशेष कार्यक्रम घेऊन न्यूक्लियस बजेट, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान तसेच महिला बचत गटांच्या लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात येणार आहेत. याशिवाय स्वयंरोजगार, व्यवसाय आणि आर्थिक स्वावलंबनासाठी मार्गदर्शन करण्यात येईल.

त्याचप्रमाणे, आदिवासी स्मारकांची स्वच्छता, दीपोत्सव आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे कार्यक्रम आयोजित केले जातील. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात येणार असून, त्यांच्या प्रतिमांना माल्यार्पण व पुष्पांजली अर्पण करण्यात येईल. तसेच आदिवासी समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजनायकांचा गौरव करण्यात येणार आहे. १६ तारखेला आधार कार्ड व शासकीय कागदपत्र सेवा शिबिर, १७ नोव्हेंबर रोजी आरोग्य व पोषण जनजागृती शिबिर, तर १८ नोव्हेंबर रोजी आदिवासी आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सक्षमीकरण दिन आणि सप्ताहाचा समारोप होणार आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना शासकीय योजनांची माहिती, विविध प्रमाणपत्रे, कृषीविषयक मार्गदर्शन, आरोग्य तपासणी, शैक्षणिक संधी, कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगाराच्या योजनांची माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासन विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्नशील असून, या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांनी या सप्ताहातील कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी केले आहे.

'सामर्थ्य'च्या 'सामाजिक दिवाळी' उपक्रमातून मदतीचा हात



■ प्रतिनिधी | अकोला ■

वंचित, गरजू, निराधारांच्या जीवनात दिवाळसणाचा आनंद पेरुन 'सामाजिक उपक्रमांची दिवाळी पहाट' हा नावीन्यपूर्ण उपक्रम सामर्थ्य फाउंडेशनच्यावतीने गत चार वर्षांपासून निरंतर राबविण्यात येत आहे. यंदा दुष्काळी पार्श्वभूमी लक्षात घेता संकटातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या जीवनात दिवाळीचा गोडवा आणला. दुःखाच्या अंधारात मायेची पणती पेटवत या कुटुंबांना किराणा, धान्य, दिवाळी फराळ व साड्यांचे वाटप केले. त्यामुळे गरजू कुटुंबातील सदस्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

दीपोत्सवानिमित्त प्रत्येक घरात चैतन्याचे वातावरण असते. नवीन कपडे, फटाक्यांचे आतषबाजी व खमंग फराळाच्या मेजवानीचा आनंद घेतला जातो. समाजातील गरजू, निराधारांना सुद्धा सणाचा आनंद मिळण्यासाठी सामर्थ्य फाउंडेशनने पुढाकार घेतला. यंदा दुष्काळामुळे बळीराजा संकटात आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासमोर तर दुःख आणि आर्थिक अडचण सुद्धा. ही भीषण परिस्थिती लक्षात यंदा सामर्थ्य फाउंडेशनने 'सामाजिक उपक्रमाची दिवाळी पहाट' उपक्रमांतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला मदतीचा हात दिला. जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त त्यातही शासकीय मदतीसाठी अपात्र ठरलेल्या विविध गावातील कुटुंबाची भेट घेऊन त्यांना सुमारे एक महिन्याचा किराणा, धान्य, दिवाळी फराळ व मातृशक्तीला साडी भेट देऊन सन्मान केला. दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीजेच्या दिवशी हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला तहसीलदार कुणाल झाल्टे यांचे विशेष सहकार्य लाभले.

आरोग्य कर्मचाऱ्यांची समयसूचकता; अपघातग्रस्त गर्भवतीला मिळाले वेळीच उपचार

सुटीच्या दिवशीही आरोग्य सेविकांची घरी जाऊन तपासणी

■ प्रतिनिधी | अकोट ■



अपघातात जखमी झालेल्या गर्भवती महिलेला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समयसूचकतेमुळे वेळीच वैद्यकीय उपचार मिळाले. अकोट तालुक्यातील बोर्डी उपकेंद्रांतर्गत घडलेल्या या घटनेत आरोग्य सेवकांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे माणुसकीचे दर्शन घडले आहे.

मौजे रहानापूर येथील सौ. सुमी रमेश जांबुणकर या ७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४.१० वाजताच्या सुमारास दुचाकीने प्रवास करीत असताना वसाळी-नागापूर परिसरात दुचाकीवरून पडून जखमी झाल्या. याचवेळी बोर्डी उपकेंद्राचे आरोग्य सेवक अक्षय जराळे आणि शिवसिंग राजपूत हे त्याच मार्गाने जात होते. त्यांच्या निदर्शनास अपघात आल्यावर त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न करता मदतीसाठी धाव घेतली.

दोन्ही आरोग्य सेवकांनी तातडीने खासगी वाहनाची व्यवस्था करून जखमी गर्भवती महिलेला ग्रामीण रुग्णालय, अकोट येथे दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आवश्यक तपासण्या करून उपचार केले. उपचारानंतर वैद्यकीय सल्ल्याने त्यांना घरी सोडण्यात आले असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.विशेष म्हणजे, दुसऱ्याच दिवशी म्हणजे ८ नोव्हेंबरला रविवारची सुटी असतानाही आरोग्य सेविकांनी गर्भवती महिलेच्या घरी भेट देत तिची प्रकृती जाणून घेतली. आवश्यक आरोग्य तपासण्या करून पुढील काळात घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शनही केले.

अपघाताचे ठिकाण आपल्या कार्यक्षेत्रात येते की नाही, याचा विचार न करता संकटात सापडलेल्या महिलेला मदत करण्याला आरोग्य सेवकांनी प्राधान्य दिले. कर्तव्यापलीकडे जाऊन दाखविलेल्या या सेवाभावी वृत्तीचे महिलेच्या नातेवाइकांसह ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चव्हाण यांनीही अक्षय जराळे आणि शिवसिंग राजपूत यांच्या तत्परतेचे विशेष कौतुक केले. शासकीय आरोग्य सेवेतील कर्मचारी हे केवळ कार्यालयीन कामकाजापुरते मर्यादित नसून, संकटाच्या वेळी नागरिकांच्या मदतीला धावून जाणारे सेवक आहेत, याची प्रचिती या घटनेतून आली. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' या उक्तीचा प्रत्यय आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कृतीतून आला आहे.

ग्रामपंचायत अकोली यांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थी यांना ५ टक्के स्वनीधी वितरित

तेल्हारा : तालुक्यातील ग्रामपंचायत अकोली रुपराव प्रेशास कडून दिव्यांग लाभार्थी यांना ५ टक्के स्वनीधी वितरित करण्यात आला.

यावेळी नंदकिशोर दामदर प्रशासक तथा विस्तार अधिकारी कृषी तथा कैलास इंगोले ग्रामपंचायत अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गावातील दिव्यांग व्यक्ती अमोल बुरघाटे लक्ष्मण इंगळे अजय वानखडे बोदळे गजानन खापरकर विनोद मंजुळकर पंचायत कर्मचारी विलास भोंडे आदी उपस्थित होते.

जाहीरनामा

दिवाणी व फौजदारी न्यायालय क.स्तर, अकोला, यांचे न्यायालय क्र. ०३ अकोला

किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक १४१३ / २०२६ चौकशी तारीख : २३/११/२०२६

अर्जदार : १. भूषण संजयराव देशमुख

विरुध्द

गैरअर्जदार : महानगरपालिका जन्म - मृत्यू विभाग अकोला

वि.न्यायालयाच्या आदेशानुसार या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते आहे की अर्जदार नामे भूषण संजयराव देशमुख जन्म दिनांक २३-१०-१९९२ रोजी राहते घरी अकोला येथे जन्म झाला, असून त्यांचा जन्माची नोंद महानगरपालिका, अकोला येथे नसल्या कारणाने त्यांच्या जन्माची/मृत्यु नोंद होण्याकरीता त्यांनी Application Under Section 13 (3) of The Birth And Death Registration Act 1969 For Taking the Entry of Death/Birth अश्या स्वरूपाचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यावर पारीत झालेल्या आदेशानुसार या जाहिर नोटिसद्वारे त्यांचे जन्माची नोंद होणेसंदर्भात कुणालाही काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी पुढील चौकशी ता २३-११-२०२६.रोजी किंवा त्यापुर्वी स्वत: किंवा वकीलामार्फत आक्षेप नोंदवावा जर चौकशी तारीख २३-११-२०२६ पर्यन्त कोणाचेही काही आक्षेप आले नाही तर कुणाचेही काही आक्षेप नाही असे समजुन पुढील आदेश पारीत केल्या जातील असे सर्वांना या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे.

आज दिनांक ०४. माहे नोव्हेंबर, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय तथा न्यायदंडाधिकारी
प्र. श्रेणी कोर्ट क ०३. अकोला

शिक्का

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

विकासाची दूरदृष्टी असणारे नेते होते स्व. नानासाहेब वैराळे - विनायक वैराळे

बोरगाव वैराळे : अकोला जिल्ह्यात रस्ते, पाणी, धरण आणि वीज यांसारखी महत्त्वाची विकासकामे स्व. नानासाहेब वैराळे यांनी मंत्री आणि खासदार असताना केली होती, असे मत विनायक वैराळे यांनी व्यक्त केले. स्व. नानासाहेब वैराळे यांच्या जयंतीनिमित्त बोरगाव वैराळे येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ, शेतकरी, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व. नानासाहेब वैराळे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना विनायक वैराळे म्हणाले, नानासाहेबांनी कधीही स्वतःसाठी राजकारण केले नाही. त्यांनी नेहमी शेतकऱ्याचा आणि सामान्य माणसाचा विचार केला. काटेपूर्णा, मोर्णा, हनुमान सागर यांसारख्या प्रकल्पांमुळे आज जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पाणी मिळत आहे. अकोला-पातूर, अकोला-मानसगाव रस्त्यांमुळे गावागावांचा संपर्क वाढला. अकोला विमानतळ, आकाशवाणी, रेल्वे स्टेशन, न्यू क्लॉथ मार्केट ही कामेही त्यांच्या दूरदृष्टीचेच प्रतीक आहेत.



शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी दैनिक देशोन्नती सुरू केले. त्या माध्यमातून त्यांनी शासन दरबारी बळीराजाच्या समस्या पोहोचवल्या. आजही त्यांचे विचार आपल्याला मार्गदर्शन करतात, असेही ते म्हणाले.

नानासाहेबांचा विकासाचा वारसा पुढे चालवण्याची गरज आहे. केवळ जयंती साजरी करून चालणार नाही, तर त्यांच्या कामाची पद्धत अंगीकारली पाहिजे. गावाच्या विकासासाठी एकत्र येऊन काम करू, असे आवाहनही विनायक वैराळे यांनी यावेळी केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही नानासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या साध्या राहणीमानाचा आणि कामाप्रती असलेल्या निष्ठेचा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा, असे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाला सरपंच कल्पना वैराळे, उपसरपंच राजेश्वर वैराळे, सेवा सह सोसायटी अध्यक्ष सदाशिव गावंडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष मंगेश वैराळे, रामराव शेळके, दिलीप इंगळे, सागर डोंगरे, हरिभाऊ डांगटे, सचिन जाने, मारोती मात्रे यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते

कोठारी कॉन्व्हेंट व निशू नर्सरीचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक श्री ब्रजलाल बियाणी विद्यानिकेतन व्दारा संचालित निशु नर्सरी व कोठारी कॉन्व्हेंटमध्ये दोन दिवसीय वार्षिक स्नेह संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.प्रथम दिनी नर्सरी ते चौथीच्या चिमुकल्यां नी 'द कलाईडोस्कोप ऑफ चाईल्डहूड' या विषयावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रभात किड्स संस्थेचे संस्थापक डॉ. गजानन नारे व सौ. वंदना नारे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजन व दिप प्रज्वलनाने करण्यात आली. शाळेच्या प्राचार्या अंजली वडे यांनी भारतीय संस्कार या विषयावर माहिती दिली. याप्रसंगी डॉ. गजानन नारे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे कौतूक केले. तद्वतच त्यांनी आजच्या या एआय समाविष्ट आधुनिक युगात संवादाचे महत्व विषद केले.संचालन व आभार प्रदर्शन वर्ग ९ च्या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांचे स्वागत शाळेचे अध्यक्ष कमलकिशोर बाहेती यांच्या हस्ते करण्यात आले.

ऊर्जापर्व फाउंडेशनच्या विद्यार्थी निबंध स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद



■ प्रतिनिधी | अकोला ■

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजागर करण्यासाठी विविध रचनात्मक उपक्रम राबविणाऱ्या स्थानीय ऊर्जापर्व फाउंडेशनच्या वतीने इयत्ता आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या स्पर्धेत सहभागी संताजी इंग्लिश स्कूल,भिकमचंद खंडेलवाल विद्यालय, सेंट आन्स इंग्लिश स्कूल मूर्तिजापूर, समता विद्यालय, मोहरीदेवी खंडेलवाल कन्या विद्यालय व इतर शाळांच्या यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष श्रीमती डॉ.ताराताई हातवळणे यांच्या हस्ते मोमेन्टो, प्रेरणादायी पुस्तक व प्रमाणपत्र प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले.यावेळी मोहरीदेवी खंडेलवाल कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ रसिका वाजगे, समता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली पागृत,संताजी इंग्लिश हायस्कूल चे संस्थाचालक मंगेश वानखडे, मुख्याध्यापक राठोड ,भिकमचंद खंडेलवाल महाविद्यालयाचे मुख्याध्यापक अभय वानखडे ओझा, रावरकर, प्रभू बावणे,सौ नागे, उमेश कुळमेथे, खंडेलवाल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका धनश्री पांडे, सौ रत्नपारखी, मुख्याध्यापक सेंट अन्स हायस्कूल मुर्तीजापुर सिस्टर सुचिता डिआब्रिओ, पर्यवेक्षक सविता ठाकरे, सेंट आन्स इंग्लिश मीडियम हायस्कूल मुर्तीजापुरच्या मुख्याध्यापक सिस्टर रोजमेरी, पूनम बोनगिरे, ताले, ऊर्जापर्व फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. संजय पाटील, गजानन इचे, राहुल इंगळे, श्रीकृष्णा सावदेकर, शुभम बोन्डगांवकर, अरुण कावसकर,प्रमोद ठोंबरे, विजय तिकांडे आदी उपस्थित होते.

शिवसेना राबवत असलेल्या सामाजिक उपक्रमामुळे गरजू घटकाला मदत होईल : गोपीकिशन बाजोरिया

■ प्रतिनिधी | अकोला ■



राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती मुळे शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी वर्गासमोर उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे अशा कठीण परिस्थितीत दिवाळीचा सण प्रत्येकाच्या घरात आनंदाने साजरा व्हावा, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिवसेना अनुसूचितजाती मोर्चा जिल्हाप्रमुख डॉ. रामकृष्ण डोंगरे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उपनेते व मा. आ. गोपीकिशन बाजोरिया यांच्या हस्ते मजूर वर्गाला किराणा किट व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता मजूर कुटुंबांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत दिवाळीसारख्या आनंदाच्या सणाला गरजू कुटुंबांना किराणा साहित्य व फराळ उपलब्ध करून देणे, अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक कार्याचा वसा शिवसेना अनुसूचितजाती मोर्चाने घेतला आहे सोबतच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे, तसेच विविध रोगनिदान शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचारांची सुविधा उपलब्ध करून देणे, अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून शिवसेना अनुसूचितजाती मोर्चाचे जिल्हाप्रमुख डॉ. रामकृष्ण डोंगरे जपत असल्याचे शिवसेना उपनेते गोपीकिशन बाजोरिया प्रसंगी म्हणाले.

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

टाळ-मृदंगाच्या गजरात सिंदी रेल्वेची पहाट भक्तिरसात न्हाली

उठा उठा हो सकळ जन...'च्या अभंगाने मंदिरांमध्ये काकड आरतीचा मंगलमय सोहळा



सिंदी रेल्वे/जनमाध्यम

शहरातील मंदिरांमध्ये पहाटेच्या प्रहरी घुमणारा टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि 'उठा उठा हो सकळ जन, वाचे स्मरावा गजानन...' या अभंगाच्या भक्तिमय स्वरांनी सिंदी रेल्वे नगरीची पहाट भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. कोजागिरी पौर्णिमेपासून शहरातील विविध मंदिरांमध्ये पारंपरिक काकड आरतीला प्रारंभ झाला असून, या धार्मिक उपक्रमात भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत आहे.

हिंदू धर्मपरंपरेत काकड आरतीला विशेष महत्त्व आहे. ब्रह्ममुहूर्तावर देवाला जागे करण्याच्या भावनेतून साजऱ्या होणाऱ्या या परंपरेत भजन,अभंग आणि हरिनामाला विशेष स्थान आहे. पहाटेच्या शांत वातावरणात मंदिरांमध्ये एकत्र येत भाविक टाळ-मृदंगाच्या साथीने अभंगांचे गायन करतात. सामूहिक आरती आणि भक्तिगीतांमुळे मंदिर परिसरात चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण होत आहे.

पहाटेची थंडी, मंदिरातील दीपज्योती, टाळ-मृदंगाचा गजर आणि भक्तांच्या मुखातून निघणारा हरिनाम यामुळे शहराच्या धार्मिक वातावरणात नवचैतन्य संचारले आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमातून वारकरी संप्रदायाची भक्तीपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपला जात आहे.

आधुनिक जीवनशैलीच्या धावपळीतही पहाटे उठून काकड आरतीत सहभागी होणारे भाविक श्रद्धा आणि परंपरेशी असलेले नाते टिकवून आहेत. ज्येष्ठांसोबत नव्या पिढीचाही सहभाग या धार्मिक परंपरेला पुढे नेणारा ठरत आहे. त्यामुळे सिंदी रेल्वेतील प्रत्येक पहाट सध्या भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माच्या स्वरांनी मंगलमय होत आहे.

संक्षिप्त

अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

सेलू- पत्नीला भेटण्यासाठी धानोली मेघे येथे गेलेल्या दुचाकीस्वाराला अज्ञात वाहनाने मागून जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शामलाल साहू (५५, रा. अग्निहोत्री कॉलेज परिसर, वर्धा) यांचा मृत्यू झाला. ही घटना ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास नागपूर-वर्धा मार्गावरील भारतीय ढाब्यासमोर घडली.शामलाल साहू हे त्यांच्या बर्गमन दुचाकीने धानोली मेघे येथे पत्नीला लेप लावण्यासाठी गेले होते. तेथून वर्ध्याकडे परतत असताना भारतीय ढाब्यासमोर अज्ञात वाहनचालकाने त्यांच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. धडकेमुळे ते गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच त्यांना रुग्णवाहिकेने सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी रुग्णालयात जाऊन जखमीचा मृत्युपूर्व जबाब नोंदविला. त्याआधारे सेलू पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर घटनास्थळावरून पसार झालेल्या वाहनचालकाचा शोध सुरू आहे. पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

मित्राने डोक्यात वीट मारली

आर्वी- मित्राला उसने दिलेले एक हजार रुपये परत मागणे तरुणाच्या चांगलेच अंगलट आले. पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादात मित्राने डोक्यावर वीट मारून त्याला जखमी केल्याची घटना शिरपूर बोके येथे १० नोव्हेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी मयूर ऊर्फ आकाश कोल्हे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.महेश जीवनराव चोरे (३०, रा. शिरपूर बोके) यांनी दहा दिवसांपूर्वी मित्र मयूरला एक हजार रुपये उसने दिले होते. दिवाळीला पैसे परत करण्याचे त्याने सांगितले होते.

शेतकऱ्यांना बारमाही शेतरस्ते उपलब्ध करून देणार-पालकमंत्री

दत्ताजी मेघे यांच्या जयंतीनिमित्त पवनार येथे जिल्हास्तरीय पाणंद रस्त्यांचे भूमिपूजन

वर्धा/जनमाध्यम

शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी बारमाही रस्ते उपलब्ध व्हावेत, शेतीची मशागत सुलभ व्हावी तसेच शेतमालाची वाहतूक कोणत्याही अडथळ्याविना करता यावी, यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे. या रस्त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेती व्यवस्थेला बळकटी मिळणार असून शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यास मदत होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

दत्ताजी मेघे यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत जिल्हास्तरीय पाणंद रस्त्याच्या कामांचे भूमिपूजन पवनार येथील मामा-भाचा समाधीजवळ पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार सागर मेघे, स्मिता मेघे, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते समितीचे सहअध्यक्ष अशोक कलोडे, सुनील गफाट, संजय गाते, अजय गांडोळे आदी उपस्थित होते. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार असून शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठी वर्षभर शेतापर्यंत पोहोचणे आवश्यक असते. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतापर्यंत बारमाही रस्ते उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या रस्त्यांमुळे ट्रॅक्टर, कृषी यंत्रसामग्री तसेच इतर वाहनांची शेतापर्यंत ये-जा सुलभ होईल. पेरणी, नांगरणी, कापणी यांसारख्या शेतीच्या विविध कामांसाठी लागणारी साधने वेळेत शेतापर्यंत पोहोचविता येतील. तसेच कापणीनंतर शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी होणारा त्रास कमी होऊन वाहतुकीचा वेळ आणि खर्च वाचण्यास मदत होईल, असे पालकमंत्री डॉ. भोयर म्हणाले. पाणंद रस्ते हे केवळ शेतापर्यंत पोहोचण्याचे साधन नसून ग्रामीण भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा आहेत. या रस्त्यांच्या विकासामुळे शेतीची उत्पादकता वाढविण्यास, कृषी क्षेत्रातील आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर सुलभ करण्यास आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लागणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सुरवातीला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विनोद बोकडे यांच्या शेताजवळ कुदळ मारून पाणंद रस्त्याचे भूमिपूजन केले. यावेळी परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

जिल्ह्यात होणार ६७३ पाणंदरस्ते

जिल्ह्यात एकूण ६७३ पाणंदरस्ते करण्यात येणार आहे. त्यात आर्वी विधानसभा मतदारसंघात ११२, देवळी मतदारसंघात १६२, हिंगणघाट मतदारसंघात १९८ तर वर्धा विधानसभा मतदारसंघात २०१ कामांचा समावेश आहे. या कामांवर एकूण २७ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. सदर कामे गतीने आणि कालमर्यादेत करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी केल्या.

शेतजमिनीच्या ताब्यावरून दोन कोटींची मागणी;

डॉक्टरला कुटुंबासह जीवे मारण्याची धमकी

सिंदी रेल्वे- शेतजमिनीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादाचे रूपांतर धमकी आणि खंडणीच्या मागणीत झाल्याची घटना समुद्रपूर तालुक्यातील पारडी शिवारात उघडकीस आली. शेतजमिनीचा ताबा सोडण्यासाठी दोन कोटी रुपयांची मागणी केल्याची तसेच डॉक्टरच्या पत्नी व मुलीला पाहून घेण्याची धमकी दिल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली आहे.नागपूर येथील डॉ. राजेश लक्ष्मणराव शेरके (६४) यांची पारडी शिवारात सर्वे क्रमांक १९६ आणि २१० मध्ये शेतजमीन आहे. त्यांनी ११ ऑक्टोबर २०२५ रोजी युवराज रामहरी कारमोरे व महादेव रमेश वांदिले यांच्यासोबत २ कोटी ४८ लाख ८ हजार ६८० रुपयांचा विक्री करार केला होता. यापैकी एक कोटी रुपये चेक व रोख स्वरूपात स्वीकारल्याचे तक्रारीत नमूद आहे.

दरम्यान, विक्रीची नोंदणी प्रलंबित असताना योगेश साखरकर व कमलेश साखरकर यांनी मे २०२६ पासून संबंधित शेतजमिनीवर कब्जा करून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे. शेतात सोयाबीनचे पीक घेतल्यानंतर आता हरभऱ्याची पेरणीही सुरू केल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. ताबा सोडण्यासाठी दोन कोटी रुपयांची मागणी करून कुटुंबीयांना धमकावण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सिंदी रेल्वे पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

मनातील अंधार दूर करून घराघरांत शांतीचे दीप प्रज्वलित करा-नगराध्यक्ष

सेलू/जनमाध्यम

दिवाळी म्हणजे केवळ घरातील दिव्यांची रोषणाई नव्हे, तर मनातील नकारात्मकतेचा अंधार दूर करून विचारांमध्ये सकारात्मकतेचा प्रकाश निर्माण करण्याचा उत्सव आहे. प्रत्येक घरात सुख, समाधान आणि शांती नांदावी, यासाठी आध्यात्मिक मूल्यांची जोपासना आवश्यक आहे. घरा-घरात शांतीचे दीप प्रज्वलित करणे हाच ब्रह्माकुमारीज् परिवाराचा संदेश असल्याचे प्रतिपादन वर्धा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी केले.



स्थानिक ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्राच्या वतीने आयोजित दिवाळी उत्सवात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक रामेश्वरजी धर्मुळ, सेलू शिक्षण संस्थेचे नवीन चौधरी, हिंगणीच्या माजी सरपंच शुभांगीताई मुडे, वर्धा सेवाकेंद्राच्या संचालिका माधुरी दीदी, मधु दीदी आणि सेलू सेवाकेंद्राच्या संचालिका दर्शना दीदी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात माधुरी दीदी यांनी दिवाळीचे आध्यात्मिक महत्त्व विशद केले. मनातील राग, द्वेष, मत्सर आणि नकारात्मक विचारांची स्वच्छता केल्याशिवाय खऱ्या अर्थाने आंतरिक प्रकाश निर्माण होत नाही. मन शुद्ध आणि विचार सकारात्मक झाले, तरच जीवनात लक्ष्मी अर्थात सुख, शांती आणि समृद्धीचे आगमन होते, असे त्यांनी सांगितले. मधु दीदी यांनी शुभ आणि श्रेष्ठ कर्मांच्या माध्यमातूनच जीवनात खरे सुख व समाधान प्राप्त होते, असा संदेश दिला.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी स्वतःच्या अनुभवातून ध्यानधारणेचे महत्त्व अधोरेखित केले. मी स्वतः सात दिवसांचा मेडिटेशन कोर्स केला आहे. वर्धा सेवाकेंद्राच्या संपर्कात आल्यापासून माझ्या जीवनात सकारात्मक बदल आणि उन्नतीचा अनुभव आला.कार्यक्रमाची सुरुवात लक्ष्मीपूजन आणि आरतीने झाली. कु. शिवन्या हिने लक्ष्मीदेवीची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. भाविका मानकर आणि ब्रह्माणी यांच्या आकर्षक नृत्यप्रस्तुतीने सोहळ्यात सांस्कृतिक रंग भरले. दर्शना दीदी यांनी प्रास्ताविकातून पाहुण्यांचे स्वागत केले, तर वैष्णवी दीदी यांनी संचालन केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी 'आपण सर्वजण एकाच परमेश्वराची संतान आहोत' हा एकात्मतेचा आणि बंधुभावाचा संदेश देत उपस्थितांना भाऊबीजेचा टिळा लावण्यात आला. दिवाळीच्या निमित्ताने आध्यात्मिकता, प्रेम, सद्भावना आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अंतर्मनाला प्रसन्न करणारा ठरला.

डॉ.पंकज भोयर यांचे दिव्यांगांसोबत दीपावली स्नेहमिलन

दिव्यांगांच्या कल्याणसाठी सदैव कटिबद्ध-पालकमंत्री

वर्धा/जनमाध्यम

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या उपस्थितीत केळकरवाडी येथे दिव्यांग बांधवांसोबत दिपावली स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकमंत्र्यांनी दिव्यांगांशी संवाद साधला तसेच फराळ कीटचे वाटप केले. दिव्यांगांच्या कल्याणासाठी शासन सदैव कटिबद्ध असल्याचे ते यावेळी म्हणाले.



यावेळी माजी खासदार रामदास तडस, नगर परिषदेच्या बांधकाम सभापती राखी पांडे, संजय गाते, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष संजय जाधव, कामगार नेते मिलींद देशपांडे, भोजराज पाटील, रविंद्र शेंडे, कमलाकर निंबाळकर आदी उपस्थित होते.दिव्यांगांना शासनाच्या योजनांचा खऱ्या अर्थाने लाभ व्हावा यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागाची स्थापना केली आहे. विभागामार्फत दिव्यांगांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा लाभ त्यांना देण्यात येत आहे. संजय गांधी निरागार योजनेमध्ये सुध्दा दिव्यांगांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये विशिष्ट निधी दिव्यांगांच्या कल्याणासाठी राखीव ठेवण्यात आला असल्याचे पालकमंत्री म्हणाले.

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेस फंड योजनेतील दिव्यांगासाठी राखीव असलेला ५ टक्के निधी खर्च होत नव्हता. आता तो खर्च होत असल्याने दिव्यांगांना खऱ्या अर्थाने लाभ मिळत असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले. या निधीतून जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांसाठी त्यांना उपयुक्त असलेल्या योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

शारीरीक विकलांग असलेल्या आणि साहित्यापासून वंचित असलेल्या दिव्यांगाना मोफत साहित्य पुरविण्यासाठी शिबिराचे आयोजन केल्या जाते. साहित्याच्या लाभासाठी जिल्ह्यात लवकरच विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले. यावेळी पालकमंत्र्यांच्याहस्ते दिव्यांगांना फराळ कीटचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर दिव्यांग बांधव उपस्थित होते.

भक्तिरसाचा जागर रंगणार! साबाजी महाराज पुण्यतिथी उत्सव

देवळी/जनमाध्यम

भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा संगम घडविणारा श्री संत साबाजी महाराज पुण्यतिथी उत्सव यंदा १४ नोव्हेंबरपासून देवळी येथे सुरू होत आहे. स्थानिक साबाजी महाराज देवस्थानात अग्रवाल परिवाराच्या वतीने कार्तिक शुद्ध पंचमी ते द्वादशीदरम्यान, शनिवार १४ नोव्हेंबर ते रविवार २२ नोव्हेंबरपर्यंत या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात काकडा, अभिषेक, पूजन, हरिपाठ, महिला भजन, सामुदायिक प्रार्थना आणि कीर्तन अशा विविध कार्यक्रमांतून भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

दररोज सकाळी ७ ते ९ या वेळेत काकडा, अभिषेक, पूजन व आरती होईल. सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत वारकरी भजन मंडळ, देवळीच्या वतीने हरिपाठ सादर केला जाणार आहे. यामध्ये ह.भ.प. रत्नाकर कल्याणी, सत्यविजय येसनखेडे, संजय मुळे, रामूजी पाटील, बबनराव कुकडे, सुधाकर करलुके, शंकरराव वैरागडे आदी सहभागी होणार आहेत. सायंकाळी ७ ते ८ या वेळेत गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने सामुदायिक प्रार्थना होईल.

१४ ते २१ नोव्हेंबरदरम्यान दररोज रात्री ८ ते १० या वेळेत महिला भजन मंडळांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये मुंगसाजी भजन मंडळ, विठ्ठल-रुक्मिणी भजन मंडळ, नगाजी भजन मंडळ, दुर्गापूजा भजन मंडळ, मा भवानी भजन मंडळ आणि श्री मिरणनाथ महाराज भजन मंडळ, देवळी यांचा सहभाग राहणार आहे. उत्सवाची सांगता रविवार २२ नोव्हेंबर रोजी भक्तिमय वातावरणात होणार आहे. दुपारी ३ ते ६ या वेळेत ह.भ.प. सुरेंद्रबुवा मुळे महाराज यांचे गोपालकाल्याचे कीर्तन व दहीहंडीचा कार्यक्रम होईल. त्यानंतर सायंकाळी ६.३० ते ९.३० या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.श्रद्धा, सेवा आणि सामूहिक भक्तीचा हा सोहळा सर्वांसाठी खुला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष मोहनबाबू अग्रवाल आणि अग्रवाल परिवाराच्या वतीने करण्यात आले

विकासाच्या 'सुमित' पर्वाने आर्वी मतदारसंघाला नवी दिशा

डार्क झोनमुक्तीपासून २१०० कोटींच्या औद्योगिक गुंतवणुकीपर्यंत झेप; शेती, सिंचन, रोजगार आणि आरोग्य सुविधांसाठी आ. सुमित वानखेडे यांचा पाठपुरावा

आर्वी/जनमाध्यम

मातीशी नाळ जपणारे नेतृत्व आणि विकासासाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करणारा लोकप्रतिनिधी, अशी ओळख निर्माण करणारे आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार सुमित वानखेडे यांचा आज १२ नोव्हेंबर रोजी वाढदिवस. विधानसभा निवडणुकीत ४० हजारांच्या मताधिक्याने मिळालेल्या विजयातून जनतेने त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला. या विश्वासाला विकासकामांची जोड देत शेती, सिंचन, उद्योग, आरोग्य, रस्ते आणि सामाजिक सुविधांच्या क्षेत्रात विविध उपक्रमांना गती देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

७६ गावांच्या डार्क झोनमुक्तीसाठी पुढाकार

आष्टी आणि कारंजा तालुक्यांतील ७६ गावांना २०१५ पासून डार्क झोनच्या निर्बंधांचा सामना करावा लागत होता. यामुळे शेतकऱ्यांच्या सिंचन सुविधांवर मर्यादा आल्या होत्या. आमदार वानखेडे यांच्या पाठपुराव्यानंतर हा प्रश्न मार्गी लागून विहीर आणि बोअरवेलसंदर्भातील निर्बंध उठविण्याचा मार्ग मोकळा झाला. गाळमुक्त धरण ते गाळयुक्त शिवार उपक्रमातून जलसाठ्यांची क्षमता आणि जमिनीची सुपीकता वाढविण्यावर भर देण्यात आला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठीही त्यांनी शासनाकडे पाठपुरावा केला.

२१०० कोटींची गुंतवणूक; रोजगाराच्या आशा पल्लवित

आर्वी मतदारसंघाच्या औद्योगिक विकासासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले. वरुण बेव्हरेजेस लिमिटेडच्या पेप्सिको प्रकल्पासाठी २१०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यात आली. या प्रकल्पामुळे स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. धनोडी परिसरातील लोअर वर्धा प्रकल्पात ३००० कोटी रुपयांच्या निधीतून ५०५ मेगावॉट क्षमतेचा तरंगता सौरऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे. औद्योगिकीकरण आणि ऊर्जा क्षेत्रातील या घडामोडी मतदारसंघाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत.

७२० कोटींच्या विकासकामांना गती

मतदारसंघातील रस्ते आणि पुलांच्या कामांसाठी सीआरआयएफ निधीतून १५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ७२० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा कामांचे भूमिपूजन झाले. सारंगपुरी तलावाच्या विकासासाठी १३.८३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या कामांमुळे वाहतूक, पर्यटन आणि स्थानिक सुविधांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



आरोग्य सुविधांमध्ये मोठी भर

तळेगाव येथे ३०० खाटांच्या रुग्णालयाला मंजुरी मिळून कामाला सुरुवात झाली आहे. आर्वी उपविभागीय रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाचे कामही सुरू झाले आहे. आर्वी अग्निशमन दलासाठी ९० लाख रुपयांचे वाहन मंजूर करण्यात आले. आर्वी, तळेगाव, आष्टी आणि कारंजा आगारांसाठी नवीन लालपरी व हिरकणी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या. आर्वी बसस्थानकाच्या विकासासाठी ३.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रालाही विकासाची जोड

कारंजा घाडगे येथील संबोधी सोशल फोरमसाठी मेडिटेशन सेंटर, वाचनालय आणि बौद्ध विहार या एकात्मिक प्रकल्पाला ४ कोटी ५० लाख १३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. आष्टी तालुक्यातील भिष्णूर येथील श्री गोविंदप्रभू देवस्थानासाठीही निधी मंजूर करण्यात आला. त्यामुळे सामाजिक आणि धार्मिक वारशाच्या संवर्धनाला हातभार लागणार आहे.

घरकुल, पुनर्वसन आणि रोजगारावर लक्ष

'आमदार आपल्या दारी' उपक्रमातून शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न झाला. घरकुल लाभार्थ्यांसाठी सातबारा उताऱ्याची अट शिथिल करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. मोदी आवास, रमाई, शबरी आणि यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनांच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात आला. बोर व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसनाचा प्रश्न, तरुणांसाठी रोजगार मेळावे, महिलांच्या आरोग्यासाठी स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान आणि आदिवासी बांधवांसाठी कर्मयोगी अभियान अशा विविध उपक्रमांतून सामाजिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

वाढदिवसाच्या निमित्ताने विकासाच्या अपेक्षा

आ. सुमित वानखेडे यांच्या कार्यकाळात विविध विकासकामांना मंजुरी आणि गती मिळाली असली, तरी या कामांची प्रत्यक्ष पूर्तता आणि त्याचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न, तरुणांच्या हाताला रोजगार, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा आणि गावागावांतील पायाभूत विकास या जनतेच्या प्रमुख अपेक्षा आहेत. भूमिपुत्र म्हणून मतदारसंघाशी असलेली नाळ कायम ठेवत या अपेक्षा पूर्ण करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

पोलिस कर्मचाऱ्याच्या घरातून दागिने लंपास

वर्धा- घराचे मागील दरवाजे उघडे असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने कपाटातील सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामडी लेआऊट, पिपरी येथे उघडकीस आली. चोरीस गेलेल्या दागिन्यांची किंमत अंदाजे ६० हजार रुपये आहे. नम्रता प्रशांत जुमडे (४४) यांच्या घरी ही चोरी झाली. त्यांचे पती पोलीस विभागात कार्यरत असून सावंगी मेघे पोलीस ठाण्यात नियुक्त आहेत. ९ नोव्हेंबर रोजी दुपारी घरकाम आटोपून नम्रता घरीच होत्या. यावेळी घराचा मागील व बाजूचा दरवाजा उघडा होता.१० नोव्हेंबर रोजी सायंकाळी कपाटात पर्स ठेवण्यासाठी गेल्या असता त्यांना दुसरी पर्स दिसून आली नाही.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३४४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

डुप्लिकेट चावीने दुचाकी चोरणारे दोघे जेरबंद

नऊ दुचाकी जप्त; गाडगेनगर पोलिसांची कारवाई



अमरावती/प्रतिनिधीः- डुप्लिकेट चावीचा वापर करून शहरासह जिल्ह्यातील विविध भागांतून दुचाकी चोरणाऱ्या दोघांना गाडगेनगर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून तब्बल ३ लाख १५ हजार रुपये किमतीच्या नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. राजपूत ढाबा चौकात चोरीची दुचाकी विक्रीसाठी आणल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईमुळे अमरावतीसह वलगाव, परतवाडा, अकोट आणि वरूड परिसरातील वाहनचोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

गौरव दिनेश सोनवणे (२०, रा. जयसियारामनगर, अमरावती) आणि प्रथमेश ऊर्फ दुर्लभ राजू हरदे (२०, रा. विलासनगर, गल्ली क्रमांक २, अमरावती) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास गाडगेनगर पोलीस ठाण्याचे डीबी पथक परिसरात गस्त घालत असताना राजपूत ढाबा चौकाजवळ एक तरुण चोरीची दुचाकी विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. यावेळी दुचाकी विक्रीसाठी आलेल्या तरुणाने पोलिसांना पाहताच पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्याला शिताफीने पकडले. त्याच्या ताब्यातील स्प्लेंडर मोटारसायकलवर एमएच २७ सीई ७२८६ असा क्रमांक असलेली नंबरप्लेट होती. मात्र, दुचाकीची कागदपत्रे त्याच्याकडे नव्हती. त्यामुळे पोलिसांनी वाहनाचा चेचिस व इंजिन क्रमांकाच्या आधारे वाहतूक शाखेकडून माहिती मिळवली. त्यावेळी दुचाकीचा मूळ क्रमांक एमएच २७ सीक्यू ०६२९ असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी वाहनाच्या मूळ मालकाचा शोध घेऊन त्यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी संबंधित दुचाकी चोरीला गेल्याचे आणि याप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. यानंतर पोलिसांनी गौरव सोनवणे याची चौकशी केली असता त्याचा साथीदार प्रथमेश ऊर्फ दुर्लभ हरदे याचाही वाहनचोरीत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

दोघांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्यांनी डुप्लिकेट चावीचा वापर करून वेगवेगळ्या ठिकाणांहून दुचाकी चोरल्याची माहिती दिली. त्यांच्या माहितीवरून पोलिसांनी नऊ दुचाकी जप्त केल्या. या वाहनांची एकूण अंदाजे किंमत ३ लाख १५ हजार रुपये आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये स्प्लेंडर, अ?क्टिव्हा, युनिकॉर्न, डिस्कव्हर आणि सीडी १०० यांसारख्या दुचाकींचा समावेश आहे. यातील काही दुचाकी गाडगेनगर, वलगाव, फ्रेजरपुरा आणि सरमसपुरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील चोरीच्या गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. तसेच परतवाडा, अकोट आणि वरूड परिसरातून चोरीला गेलेल्या वाहनांबाबतही माहिती मिळाली आहे. उर्वरित वाहनांचे मूळ मालक आणि चोरीच्या गुन्ह्यांचा तपशील आरटीओ कार्यालयाकडून प्राप्त करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राह्मणे, गाडगेनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, गुन्हे पोलीस निरीक्षक प्रमोद पाचकवडे आणि प्रशासन पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

गाडगेनगर पोलीस ठाण्याचे डीबी पथकप्रमुख पोलीस उपनिरीक्षक सागर ठाकरे तसेच पोलीस अंमलदार निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिद्धार्थ शृंगारे, गुलरेज खान आणि सचिन गौरखेडे यांनी ही कारवाई केली.

अमरावतीत १४ नोव्हेंबरला 'आस्था-दीप संमेलन २०२६' चे आयोजन

'चलो जलाएं दीप वहाँ, जहाँ अभी भी अंधेरा है'

अमरावती/प्रतिनिधीः- आस्था ग्रुप महाराष्ट्र यांच्यातर्फे 'आस्था-दीप संमेलन २०२६' चे आयोजन शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, जोशी सभागृह, स्टेट बँक समोर, श्याम चौक, अमरावती येथे करण्यात आले आहे.

'चलो जलाएं दीप वहाँ, जहाँ अभी भी अंधेरा है' या ब्रीदवाक्याखाली होणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्ष आस्था नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता सिंचन विभाग प्रकाश नागपूरकर हे भूषवणार आहेत.

संमेलनाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या तथा सत्यशोधक व्याख्यात्या प्रा. डॉ. निलीमा मुळे (परतवाडा) यांच्या हस्ते होणार असून त्या 'सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत महिलांच्या पुढाकाराचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून दैनिक तरुण भारत नागपूरच्या संचालक तथा महिला समन्वय प्रमुख विदर्भ प्रांत मिरा कडबे (नागपूर) या 'कुटुंब प्रबोधन-समाज परिवर्तनाची पहिली पायरी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून 'रिंगण' वार्षिकांकाचे संपादक सचिन परब (मुंबई) उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनात 'आस्था गौरव पुरस्कार' ने उच्च पदप्राप्त व्यक्ती गौरव पुरस्कार संजय वैद्य (मुंबई), यांना तर विशेष शैक्षणिक व सामाजिक कार्य गौरव पुरस्कार शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा एकलव्य धनुर्विद्या अकॅडमीचे संस्थापक सदानंद जाधव (नांदगाव खंडेश्वर) यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक-सामाजिक-पर्यावरण क्षेत्रातील विशेष व्यक्तिमत्व प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू (लोणार-बुलढाणा) यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

या संमेलनात डॉक्टर, PhD प्राप्त व नवनियुक्त शासकीय कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ व शिल्ड देऊन जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

दीपावलीच्या पावन पर्वानिमित्त चौधरी चौकात वृक्षारोपण

व्यापाऱ्यांचा वृक्षसंवर्धनाचा संकल्प



अमरावती/प्रतिनिधीः- दीपावलीच्या पावन पर्वानिमित्त चौधरी चौक येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात परिसरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत लावण्यात आलेल्या रोपांची नियमित देखभाल, वेळोवेळी पाणी देणे तसेच त्यांचे संवर्धन करण्याचा सामूहिक संकल्प केला.

यावेळी उपस्थित पटवारी यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. प्रत्येक व्यापाऱ्याने आपल्या परिसरातील लावलेल्या रोपांची जबाबदारी स्वीकारून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला भारतीय जनता युवा मोर्चा, अमरावती शहर जिल्हाध्यक्ष विजय उर्फ विक्की शर्मा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, दीपावलीसारख्या मंगलमय सणाच्या निमित्ताने वृक्षारोपण करणे ही पर्यावरण संवर्धनासाठी प्रेरणादायी आणि समाजोपयोगी पहल आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित व्यापाऱ्यांनी लावण्यात आलेल्या सर्व रोपांची नियमित देखभाल, वेळेवर पाणी देणे आणि त्यांचे संरक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला, जेणेकरून ही रोपे भविष्यात मोठ्या वृक्षांमध्ये विकसित होऊन पर्यावरण संवर्धनात मोलाचे योगदान देतील.

या कार्यक्रमास ॲड. रवी बैस, अजय गोयल, विशाल आवारे, सत्यनारायण यादव, रितेश लड्ढा, वेंकटेश रतावा, प्रा. डॉ. रविंद्र काळे, प्रा. शेखर बंड, प्रवीण ढोलवाडे, अविनाश यादव, प्रा. योगेंद्र बैस, मनोज दारोकर यांच्यासह अनेक व्यापारी, मान्यवर नागरिक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

महाकुंभात १३ नोव्हेंबरला कृषी व रोजगार मेळावा

शेतीतज्ज्ञ ज्ञानेश्वर बोडके, उद्योजक सुदर्शन शेंडे करणार मार्गदर्शन







अमरावती/प्रतिनिधीः- अखिल भारतीय कलाल-कलार समिती व अखिल भारतवर्षीय हैद्य कलचुरी महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावतीत आयोजित तीन दिवसीय महाकुंभाच्या पहिल्याच दिवशी, १३ नोव्हेंबर रोजी शेतकरी-कृषी मेळावा तसेच रोजगार, उद्योग व व्यवसाय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन स्वतंत्र सत्रांमध्ये शेतीतज्ज्ञ ज्ञानेश्वर बोडके आणि विठोबा हेल्थकेअर ॲंड रिसर्च प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक सुदर्शन शेंडे हे मार्गदर्शन करणार आहेत.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात सकाळी ११ वाजता शेतकरी व कृषी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध शेतीतज्ज्ञ ज्ञानेश्वर बोडके समाजातील शेतकरी बांधवांशी संवाद साधणार आहेत. आधुनिक शेती, सेंद्रिय शेती तंत्रज्ञान, कृषी क्षेत्रातील नवनवीन प्रयोग, शेतीपूरक व्यवसाय आणि बाजारपेठेतील संधी या विषयांवर ते मार्गदर्शन करतील. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या माध्यमातून लाखो शेतकऱ्यांना यशाचा मार्ग दाखविणाऱ्या बोडके यांच्या मार्गदर्शनाचा समाजातील शेतकरी बांधवांना लाभ होणार आहे.

दरम्यान, याच सभागृहात सायंकाळी ५ वाजता रोजगार, उद्योग व व्यवसाय मेळावा पार पडणार आहे. या सत्रात विठोबा हेल्थकेअर ॲंड रिसर्च प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक सुदर्शन शेंडे मार्गदर्शन करणार आहेत. महाराष्ट्रासह देशभरात लोकप्रिय असलेल्या 'विठोबा मंजन' या उत्पादनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातून उद्योगाची सुरुवात करून त्याला राष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा यशस्वी प्रवास त्यांनी केला आहे. आपल्या उद्योजकीय अनुभवातून ते समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी, उद्योग उभारणी, व्यवसायातील आव्हाने आणि यशस्वी उद्योगनीती याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

समाजातील शेतकरी, युवक आणि नवउद्योजकांना आधुनिक शेती व उद्योग-व्यवसायाच्या नव्या दिशा मिळाव्यात, या उद्देशाने या दोन्ही मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाकुंभाचे प्रमुख आयोजक तथा अखिल भारतीय कलाल-कलार समाज समितीचे अध्यक्ष सुनील खराटे यांनी केले आहे.

गाडगेबाबा यांना भारतरत्न पुरस्कार देण्यासाठी दुचाकी यात्रा

वडिलांसोबत मुलाचाही सामाजिक ध्येयासाठी पुढाकार

वलगाव निर्वाणभूमी ते महाबळेश्वर प्रवासातून दहा सूत्री कार्यक्रमाचा प्रचार



अमरावती/प्रतिनिधीः- समाजाच्या डोळ्यांतील अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी आयुष्यभर हातात झाडू घेऊन स्वच्छतेचा संदेश देणारे, अंधश्रद्धेच्या बेड्या तोडून शिक्षण आणि मानवतेचा प्रकाश पसरविणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला भारतरत्न पुरस्कार मिळावा, ही केवळ मागणी नाही, तर महाराष्ट्राच्या जनमनातील कृतज्ञतेची भावना आहे. याच भावनेला कृतीची जोड देत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा सचिव नितीन मुळे यांनी आपल्या मुलगा सार्थक याच्यासोबत बुधवार (दि.११) रोजी वलगाव ते महाबळेश्वर अशी दुचाकी यात्रा सुरू केली आहे.

राष्ट्रसंत गाडगेबाबांची निर्माणभूमी असलेल्या वलगाव येथील निर्वाणभूमीतून या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. ही यात्रा केवळ किलोमीटर मोजणारी दुचाकी सफर नाही, तर गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आणि त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव व्हावा, यासाठी उचललेले एक प्रेरणादायी पाऊल आहे.गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजाला दहा सूत्री कार्यक्रमातून स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, मानवसेवा, सामाजिक समता आणि नैतिक जीवनाचा मार्ग दाखविला. देव शोधण्यासाठी मंदिरात जाण्यापेक्षा माणसातील देव ओळखा, भुकेल्याला अन्न द्या, तहानलेल्याला पाणी द्या, निराधारांना आधार द्या, हा त्यांच्या जीवनकार्याचा संदेश होता. आज समाजात वाढत असलेली अस्वच्छता, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक विषमता पाहता गाडगेबाबांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. याच विचारांचा प्रचार आणि प्रसार व्हावा, प्रत्येक गावात गाडगेबाबांच्या दहा सूत्री कार्यक्रमाची चर्चा व्हावी आणि त्यांच्या महान कार्याची दखल घेऊन केंद्र सरकारने त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे, या उद्देशाने नितीन मुळे पाटील यांनी आपल्या मुलालाही या प्रवासात सहभागी करून घेतले आहे. वडिलांसोबत मुलानेही या सामाजिक ध्येयासाठी रस्त्यावर उतरावे, ही बाब विशेष कौतुकास्पद ठरत आहे. एका पिढीने दुसऱ्या पिढीकडे केवळ संपत्ती नव्हे, तर सामाजिक बांधिलकी आणि महापुरुषांचे विचार सोपवावेत, असा सुंदर संदेश या बाप-लेकाच्या यात्रेतून मिळत आहे.

वलगाव येथील निर्वाणभूमीतून यात्रेला विविध मान्यवरांनी पाठिंबा दिला. यावेळी राजेंद्र निर्मळ, संजय काणे, मामासाहेब निर्मळ, गजानन कडू, राजेंद्र जोशी, डॉ. सोमेश्वर निर्मळ, प्रकाश बनारसे, डॉ. कैलास बोरसे, विष्णू बघल्ले, ज्ञानेश्वर सैरीसे, ज्ञानेश्वर लव्हाळे, संतोष खोहरे तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या यात्रेला शुभेच्छा देत नितीन मुळे यांच्या सामाजिक उपक्रमाला पाठिंबा दर्शविला.

दिवाळीच्या दिवशी २० ठिकाणी लागली आग

कॅम्प रोडवरील फ्लॅट, जवाहर गेट, भाजी बाजार, हिंदू स्मशानभूमीत घटना

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळीच्या उत्साहात फटाक्यांची आतषबाजी सुरू असतानाच शहरात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले. शहरातील विविध ठिकाणांवरून आग लागल्याबाबतचे तब्बल २० कॉल आल्याने अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ झाली आहे. यामध्ये एक फ्लॅट, एक दुकान, कचरा तसेच वाहनांना आग लागण्याच्या घटनांचा समावेश आहे. यामध्ये कॅम्प रोडवरील एका अपार्टमेंटमधील फ्लॅटमध्ये लागलेली आग, हिंदू स्मशानभूमी संस्थेच्या गोदामातील लाकडांना लागलेली आग आणि जवाहर गेट भाजी बाजारातील सायकल साहित्याला लागलेली आग मोठी होती.

माहितीनुसार, ८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री जयस्तंभ चौकातील पेट्रोल पंपाजवळ कचऱ्याला आग लागल्याची पहिली घटना घडली होती. त्यानंतर विलासनगर गल्ली क्रमांक चार येथे दोन दुचाकींना आग लागली. याच रात्री साबणपुरा येथे दुकानाच्या टेरेसवर फटाक्यांमुळे काडीकचऱ्याला आग लागली. बडनेरा रोडवरील एका शोरूमसमोरील मोकळ्या भूखंडात, दिल्ली पब्लिक स्कूलजवळ, नमुना गल्ली क्रमांक चार, जुना मोटार स्टँड परिसरात, बेलोरा येथील हॉटेल परिसर आणि जवाहर गेट परकोट येथेही काडीकचऱ्याला आग लागल्याच्या घटना घडल्या. तसेच पहाटे ५.१० वाजता अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या परिसरातील कचऱ्यालाही आग लागली होती. त्याचप्रमाणे ९ नोव्हेंबरच्या रात्रीनंतरही आगीच्या घटनांचे सत्र सुरूच राहिले. भुतेश्वर चौकातील पुलाखाली काडीकचऱ्याला आग लागली. पहाटे २.२५ वाजता हिंदू स्मशानभूमी संस्थेच्या गोदामातील लाकडांना मोठी आग लागली. यानंतर रेल्वे स्टेशन चौकातील शिवाजी चौक परिसरात हॉटेलजवळ, तसेच साबणपुरा मशीद परिसरात काडीकचऱ्याला आग लागल्याच्या घटना घडल्या. सकाळी १०.४० वाजता शेगाव नाका परिसरातील बनकर हॉस्पिटलजवळ कचऱ्याला आग लागली. दरम्यान, जवाहर गेट येथील भाजी बाजारात सकाळी ११.५५ वाजता सायकल साहित्याला आग लागली. अग्निशमनचे अधीक्षक अजय पंधरे व केंद्र प्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनात जवानांनी या आगी विझविण्यासाठी रात्रभर अथक परिश्रम घेतले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६९
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.७८/२०२६ ने.ता.०४/१२/२०२६

अर्जदार — अश्वीनी प्रकाश डकरे, वय ३८ वर्ष, व्यवसाय - घरकाम, रा.वार्ड नं.४,नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- सचिव तथा जन्म मृत्यू अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, नांदगाव खंडेश्वर,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार नामे **अश्वीनी प्रकाश डकरे** यांचा **जन्म दिनांक २९/०४/१९८८** रोजी नांदगाव खंडेश्वर,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथे झाला. अर्जदार नामे **अश्वीनी प्रकाश डकरे** यांच्या जन्माची नोंद, जन्म मृत्यू **नगरपंचायत कार्यालय,नांदगाव खंडेश्वर,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** यांचे जन्म व मृत्यू नोदवही मध्ये जन्माची नोंद करण्यात आली नाही. करिता उपरोक्त अर्जदाराने त्यांची जन्माची नोंद जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये घेण्याबाबत आदेश होण्याकरिता वि. दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात दिनांक २३/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशानुसार
सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
नांदगाव खंडेश्वर

शिक्का

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI
No.SGBAU/8/C-2718/2026 Date : 04/11/2026

WANTED

Name of the Society : **Bharatiya Vidya Mandir, Amravati.**
E-mail: bharatiyavidyamandir63@gmail.com

Name of the Colleges: 1) Bharatiya Mahavidyalaya, Amravati, 2) Bhagwantrao Shivaji Patil Mahavidyalaya, Paratwada, Dist. Amravati

Applications are invited for Full Time Regular Posts as per Following details in the faculty of Science & Technology / Humanities / Commerce & Management / Interdisciplinary Studies.

Vacancies for Grant-in-aid Courses / Programmes

Sr. No.	Name of the Post	Subject / Courses	Category as per NOC on dt. 01.10.2026
01	Assistant Professor	Botany - 02	ST - 02
02	Assistant Professor	Chemistry - 02	NT-B - 01
03	Assistant Professor	Commerce - 05	NT-C - 01
04	Assistant Professor	English - 01	NT-D - 01
05	Assistant Professor	Hindi - 01	SBC - 01
06	Assistant Professor	History - 02	OBC - 03
07	Assistant Professor	Home Economics - 01	SEBC - 02
08	Assistant Professor	Political Science – 01	EWS - 02
			Open - 02

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मायक्रो विभागाने निर्धारीत केलेले समांतर आरक्षण व संस्थेच्या जाहीरात मागणीपत्रानुसार समांतर आरक्षण महिला –०५– (०१–खुला, ०१–अज, ०१–इमाव, ०१ आदुब, ०१–सार्वसाप्र) दिव्यांग ०१–गट–ब (कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता मधून), अनाथ ००, खेळाडू ००).

(दि. २५–०१–२०२४, दि. २९–०१–२०२४ व दि. ३१–०७.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रक व शासन निर्णयानुसार समांतर आरक्षण भरण्याची जबाबदारी नियुक्त प्राधिकारण यांची राहील, त्यानुसार नियुक्ती प्राधिकरण हे कार्यवाही करतील.)

टिप : दि. ०८.०३.२०१९, दि. १०.०५.२०१९ व दि. ११.०४.२०२२ तसेच दि. ०५.०३.२०२४ व दि. ३१.०८.२०२६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

For more details about qualifications / Experience / Pay Scale and other details/conditions visit university website **www.sgbau.ac.in** and Society website **www.bharatiyavidyamandir.org**

PAY SCALE AS PER UGC & STATE GOVERNMENT NORMS.

Application form is available on payment of Rs.1000/- in cash / DD (in favour of **Bharatiya Vidya Mandir, Amravati)** from the office of Bharatiya Vidya Mandir, Badnera Road, Rajapeth, Amravati during 10.00 am to 2.00 pm on working days. Filled application form along with complete biodata and copies of all necessary educational certificates and testimonials should be sent to the office of **Bharatiya Vidya Mandir, Badnera Road, Rajapeth, Amravati** on or before 30/11/2026.Those who are already in employment shall furnish "NO OBJECTION CERTIFICATE" from the parent employer on or before the date of Interview. Services will be transferable within colleges run by society.

Note: Mention your E-mail id correctly in application form. Interview call letter will be sent on E-mail id. Online form shall also be accepted subject to the norms and conditions as above.

Dr. Aradhana G. Vaidya
President
Bharatiya Vidya Mandir, Amravati

Dr. Prashant V. Bhagwatkar
General Secretary
Bharatiya Vidya Mandir, Amravati

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

तुरीला १० हजारांचा भाव; शेतकऱ्यांच्या पदरात काय?

उत्पादन घटीचा अंदाज; वातावरणातील बदलामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढला

अमरावती : नवीन तुरीचे उत्पादन शेतकऱ्यांच्या हाती येण्यास आणखी दोन ते तीन महिन्यांचा कालावधी असताना अमरावती विभागातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये तुरीचे दर ९ हजार ५०० ते १० हजार रुपये प्रतिक्विंटलवर गेले आहेत. परंतु, सध्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे तूर शिल्लक नसल्याने बाजारात तुरीचे दर वाढून शेतक-यांच्या पदरात काहीही पडणार नसल्याचे चित्र आहे.

जिल्ह्याच्या खरीप हंगामाच्या प्रारंभी सलग व धुऱ्यांवर शेतकरी तुरीची लागवड होते. जुलै महिन्यात लागवड केलेली तूर दुसऱ्या वर्षीच्या जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात शेतकऱ्यांच्या हाती येते. हलक्या अल्पमुदतीची तूर असल्यास डिसेंबर महिन्यातच



शेतकऱ्यांच्या शेतकऱ्यांकडे जुनी तूर शिल्लक हाती येते. त्यामुळे सध्या नाही. तसेच नवीन तूर हाती येण्यास आणखी तीन महिन्यांचा कालावधी आहे. आवक घटल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीचे तसेच कडधान्यांचे दर वाढले आहेत.

सध्या वातावरणातील बदलामुळे लागला आहे. उत्पादनात घट येण्याचा अंदाज आहे. अमरावती विभागात पुरेसे सरासरी लागवड क्षेत्र सुमारे ५ ते ६ अमरावती विभागात तुरीचे लाख हेक्टर आहे. विदर्भातील एकूण तूर लागवड क्षेत्रापैकी मोठा वाटा हा अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांचा आहे. विभागात सोयाबीन आणि कापसानंतर तूर हे पीक आहे. अलीकडच्या वर्षात लागवडीकडे वाढला आहे. तुरीला चांगला बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल तूर अमरावती विभागात मुख्यत्वे सोयाबीन किंवा कापसामध्ये आंतरपीक म्हणून तुरीची मोठ्या प्रमाणावर पट्टापेर पद्धतीने लागवड केली जाते. तुरीच्यया भावात गेल्या तीन महिन्यांत चांगली तेजी आली आहे. तुरीचा भाव ऑगस्टपर्यंत प्रतिक्विंटल सात हजार रुपयांच्या आसपास होता. देशातील कमी पाऊस आणि उत्पादनात घट होण्याचा अंदाज आल्यानंतर अचानक तेजी आली. सप्टेंबर होता. आता सरासरी भाव १० महिन्यात भाव आठ हजार रुपयांपर्यंत सरासरी भाव ९ हजार ३०० रुपये पोहचला. ऑक्टोबर महिन्यात हजारांवर पोहचला आहे. चांदूर बाजार कृषी उत्पन्न बाजार दिवाळीआधी बाजारात तुरीची आवक कमीच होती. ६ ऑक्टोबरला समितीत १९८ क्विंटल तुरीची आवक झाली. तुरीला ९ हजार ५०० ते १० हजार म्हणजे सरासरी ९ हजार ६८० रुपये प्रतिकिवंटल दर मिळाला.

आयाती नंतर दरांवर दबाव

यंदा जून महिन्यात विक्रमी ११ हजार ३०० रुपयांपर्यंत दरपातळी पोहचली होती. सलग दोन वर्षे तुरीचा भाव हमीभावापेक्षा अधिक होता. त्यामुळे सरकारने मुक्त तूर आयातीचे धोरण स्वीकारले. परिणामी देशातील तुरीची आयात वाढत गेली आणि दरांवर दबाव आला.

कृषी कंपनीला लावला १०.२९ लाखांचा चुना

कंत्राटी सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

अमरावती/का.प्र

महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडच्या जिल्हा विभागीय कार्यालयाला तब्बल १० लाख २९ हजार १२९ रुपयांचा चुना लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पशुखाद्य विक्री तून मिळालेली रक्कम नियमा नुसार कंपनीच्या बँक खात्यात जमा न करता स्वतःच्या खात्यात जमा करून फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी कंत्राटी सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचे नाव सुबोध कदम (३०, रा. बरसोली) आहे. सत्यजित खंडूजी ठोसरे (५३) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.माहिती नुसार, महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडच्या चौधरी चौक येथील विभागीय कार्यालयात मॅनेजर पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी याबाबत तक्रार दिली आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून पशुखाद्याची विक्री केली जाते. कार्यालयात कंत्राटी सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून सुबोध कदम याची नियुक्ती करण्यात आली होती. त्याच्यावर दुकानदारां कडून विक्रीची रक्कम वसूल करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. आरोपा नुसार, १ नोव्हेंबर २०२५ ते १८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आरोपी सुबोध कदम याने गुरू माऊली ट्रेडर्स सह ६ दुकानदारांना पशुखाद्य विकले. या दुकानदारां कडून पशुखाद्याची रक्कम वसूल करणे त्याचे काम होते. वसूल केलेली रक्कम कंपनीच्या खात्यात जमा करणे अनिवार्य होते. मात्र आरोपीने ती रक्कम कंपनीच्या खात्यात जमा न करता आपल्या स्वतःच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा करून घेतली.

विभागाच्या अधिकाऱ्यांना हिशोबात तफावत आढळल्याने त्यांनी याबाबत सखोल चौकशी केली. चौकशीत दुकानदारांनी रक्कम दिल्याचे सांगितले, मात्र ती कंपनीच्या खात्यात जमा झालेली नव्हती. त्यानंतर आरोपीला विचारणा केली असता त्याने रक्कम स्वतःच्या खात्यात जमा केल्याचे समोर आले. एकूण १० लाख २९ हजार १२९ रुपयांचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी तक्रारदाराच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी सुबोध कदम याच्याविरुद्ध फसवणूक आणि विश्वासघाताच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक अनियमिततेचा संदेह असल्याने पोलिसांनी बँक खात्यांची माहिती मागवली असून पुढील तपास सुरू आहे.

सेमाडोह परिसरात ठिपकेदार राणपिंगळ्याची नोंद

अमरावती- जैवविविधतेने समृद्ध असलेल्या मेळघाटच्या जंगलात दुर्मिळ पक्ष्याची नोंद झाली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सिपना वन्यजीव क्षेत्रातील सेमाडोह परिसरात ठिपकेदार गरुडघुबड (ठिपकेदार राणपिंगळा) प्रथमच आढळून आले. मेळघाटातील या पक्ष्याची ही पहिलीच नोंद असून, मध्य भारतातील दुसरी नोंद ठरली आहे. यापूर्वी महाराष्ट्रातील पेंच व्याघ्र प्रकल्पात या पक्ष्याचे दर्शन झाले होते. विशेष म्हणजे, सेमाडोह परिसरात कार्यरत स्थानिक निसर्ग मार्गदर्शकांनी या दुर्मिळ पक्ष्याची नोंद केली असून, त्यामुळे मेळघाटच्या पक्षीवैविध्यात आणखी एका महत्त्वाच्या पक्ष्याची भर पडली आहे. मेळघाटच्या जंगलात विविध प्रकारचे वन्यजीव आणि पक्षी आढळतात. मात्र, ठिपकेदार गरुडघुबडाची नोंद होणे ही वन्यजीव अभ्यासकांसाठी महत्त्वाची बाब मानली जात आहे. यापूर्वी मध्य भारतात या पक्ष्याची पहिली नोंद पेंच व्याघ्र प्रकल्पात झाली होती.

त्यानंतर आता मेळघाटातील सेमाडोह परिसरात त्याचे अस्तित्व समोर आले आहे. या पक्ष्याची नोंद स्थानिक निसर्ग मार्गदर्शक भोला बाबू मावसकर, अविनाश एच. मसाराम, अशोक एस. मावसकर आणि अक्षय भोला मावसकर यांनी केली. जंगलातील पक्ष्यांचे बारकाईने निरीक्षण आणि निसर्गाविषयी असलेल्या आवडीमुळे ही महत्त्वाची नोंद शक्य झाली. या पक्ष्याचे पर्यावरणातील महत्त्व, जैवविविधतेतील स्थान आणि अन्नसाखळीतील भूमिका याबाबत अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक सौरभ पुरुषोत्तम जवंजाळ यांनी माहिती दिली. या नोंदीमुळे मेळघाटचे जंगल पक्षी निरीक्षक, संशोधक आणि वन्यजीव अभ्यासकांसाठी किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

मेळघाटचे महत्त्व वाढले

मेळघाटच्या जंगलात अनेक दुर्मिळ पक्ष्यांचे वास्तव्य आहे. ठिपकेदार गरुडघुबडाची नोंद ही केवळ पक्षी निरीक्षणापुरती मर्यादित नसून, या जंगलातील समृद्ध जैवविविधतेचा महत्त्वाचा पुरावा आहे. स्थानिक निसर्ग मार्गदर्शकांच्या निरीक्षणामुळे वन्यजीवांच्या अभ्यासाला नवी दिशा मिळाली असून, अशा नोंदी भविष्यातील संशोधनासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

श्रीक्षेत्र वरखेड येथे अडकुजी महाराजांचा पुण्यतिथी सोहळा

तिवसा/वार्ताहर

१९ ते २४ नोव्हेंबर २०२६ दरम्यानचे संकीर्ण कार्यक्रम

वैश्विक मानवतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज, गुरुवर्य परमहंस श्री समर्थ अडकुजी महाराज यांच्या १०५ व्या पुण्यतिथीनिमित्त, म्हणजेच प्रार्थना दिन उत्सव, श्रीक्षेत्र वर्केड येथे मंगळवार १७ नोव्हेंबर ते मंगळवार २४ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येत आहे.

दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर, समाधी मंदिर परिसर, महाद्वार आणि आतील भाग आकर्षक रोषणाईने उजळण्यात आला आहे. यासाठी अडकुजी महाराजांनी संस्थेचे अध्यक्ष अभिजित बोके यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री क्षेत्र वरखेड किंवा महोत्सवाच्या जयंत तयारीचे नियोजन, तसेच वरखेड गाव परिसराचे नियोजन आणि भेट देणाऱ्या भाविकांच्या निवास व्यवस्थेसंदर्भात बैठक पार पडली.


सात दिवसांच्या पुण्यतिथीच्या उत्सवादरम्यान, दररोज सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना आणि आध्यात्मिक चिंतन, गाव स्वच्छता,ग्रामगीता प्रवचन, वारकरी कीर्तन, अभंग गायन, खंजेरी भजन, कार्यकर्ता संमेलन, महिला मेळावा, आरोग्य शिबीर, माहेरवाशिणी मुलीचा सातकर आदी धार्मिक व विधिमंडळ कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.तसेच प्रसिद्ध भारुडकार ह.भ.प.गणेश महाराज शिंदे आळंदीकर,पवन महाराज रोहणकर झाडगाव यांचे खास भारुड कार्यक्रम किंवा साप्ताहिक कार्यक्रम.

हा कार्यक्रम लवकरच पार पडणार आहे. मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी आशिष आहेर यांच्या हस्ते 'श्री' यांच्या महासमाधीचा महाभिषेक आणि तीर्थयात्रेची स्थापना करून पुण्यतिथी महोत्सवाला सुरुवात होईल. २३ नोव्हेंबर रोजी संत तुकडोजी महाराज, संत लहानुजी महाराज, सत्यदेव बाबा इत्यादी पादुका पालखीत येतील आणि महाद्वारवर अडकुजी महाराज संस्थानचे विश्वासू अध्यक्ष अभिजीत बोके, मनोहर बोके आणि त्यांचे विश्वासू सहकारी यांचे स्वागत करतील.भक्तांना या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आहे.अडकुजी महाराज संस्थान ही एक विश्वासार्ह संस्था आहे.

२४ नोव्हेंबर काढा व महाप्रसाद

प्रभाती आद्य पूजन, श्रींच्या महासमाधीची महापूजा व ध्वजारोहण अभिजित बोके, अध्यक्ष, श्री अडकुजी महाराज संस्थान, वरखेड यांच्या हस्ते होणार आहे.

कला आणि अभंगवाणी हरीचे भक्त श्री श्याम नारायण दास महाराज अयोध्याजींना आदरांजली वाहतील. याप्रसंगी जनार्दन बोठे सरचितनीस, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज, श्री संत सचिन देव महाराज यांचे प्रबोधन होणार आहे. सयाजी महाराज, सचिनदेव महाराज, संत गणेश महाराज, संत शंकर महाराज, विविध संस्थांचे अधिकारी, विविध सरकारी पक्षांचे नेते, खासदार,आमदार यांना



कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

दुपारी काला व महाप्रसाद, सामुदायिक प्रार्थना 'श्रींच्या पालखीची' मिरवणूक, पालखीतील सर्व संतांचे पूजन, भजन संध्याकाळ व दहीहंडी त्यानंतर कार्यक्रम होणार आहे.

काकड आरतीचे पहाटे गुंजले सूर!



दर्यापूर- ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या दर्यापूर शहरात, समाजातील वडीलधाऱ्यांकडून सामुदायिक काकड आरती करण्याची एक अनोखी परंपरा आहे. जुन्या दर्यापूरच्या नागरिकांच्या पहाट काकड आरतीचे सूर भक्तिपूर्ण असत. दिवाळीची ही परंपरा आनंदाने भरलेली असते. विकास काकडा आरती मंडळ, जुनी वस्ती राम मंदिराजवळ शेवनेपुरा दर्यापूर हा परिसर काकडा आरतीच्या मंजुळ स्वराणे डुमडुमुन जातो. इथेच कै. रामकृष्ण चौधरी यांची अनोखी परंपरा सुरू झाली असावी. केवळ त्या काळातील जागरूक नागरिकांनीच ही परंपरा पुढे चालू ठेवली. काकड आरतीची परंपरा गेल्या ८४ वर्षांपासून आजही सुरळीतपणे सुरू आहे. दररोज सकाळी श्री गजानन महाराज मंदिरापासून चंद्रभाग्याचेय नदीमार्गे श्री गणेश, महादेव, हनुमान यांच्या मंदिराकडे आणि पुढे विठ्ठल-रुक्मिणी मंदिराकडे होडी जात असे. शेकडो नागरिक मोठ्या उत्साहाने उपस्थित असत. यामध्ये प्रामुख्याने किशोर माहुलकर, राम दियालकर, राम वानखडे, अशोक शेवाणे, बबन शेवाणे, शेखर शेवाणे, गणेश गावंडे, विवेक जवंजाळ, शेखर रहाटे, अभय शेवाणे, पूर्वेश शेवाणे, प्रजल धोटे, कविराज शेवाणे, सुजल हिंगणकर, बोंडेकर, बोंडेकर, भाऊराव शेवळे आदींचा समावेश आहे. प्रथमेश सवाईकर, कृष्णा पाथरे, संग्राम हिंगणकर, शाहू यात धर्माळे, मोहित बोरेकर, विवान शेवणे, अभंग जवंजाळ, सोहम सव्वालाखे, अंशुमन नेवारे आदींचा समावेश आहे.

तीन वाहनांतून अवैध गोवंश वाहतूक; सहा बैलांची सुटका

वलगाव पोलिसांची कारवाई; तीन आरोपींसह ९ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

टाकरखेडा संभू/वार्ताहर

वलगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने अवैध गोवंश वाहतुकीविरोधात कारवाई करत तीन चारचाकी वाहनांमधून निर्दयतेने वाहतूक करण्यात येणाऱ्या सहा गोवंश बैलांची सुटका केली. या कारवाईत तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, तीन वाहनांसह एकूण ९ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.४५ ते रात्री ८.३० वाजता वरिष्ठ पोलीस निरीक्षक रीता उईके यांच्या मार्गदर्शनाखाली वलगाव पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. यावेळी तीन वाहनांमधून प्रत्येकी दोन याप्रमाणे सहा गोवंश बैलांची अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले.

पोलिसांनी टाटा एस वाहन क्रमांक एमएच ०४ ईएल ००३७ (किंमत १ लाख ५० हजार रुपये), टाटा एस वाहन क्रमांक एमएच २७ एक्स ८३०६ (किंमत २ लाख ५० हजार रुपये) आणि अशोक लेलँड वाहन क्रमांक एमएच १५ डीके ४२२९ (किंमत २ लाख ५० हजार रुपये) अशी तीन वाहने जप्त केली. तसेच सहा बैलांची एकूण किंमत २ लाख ८० हजार रुपये आहे. वाहनांची ६ लाख ५० हजार रुपये आणि बैलांची २ लाख ८० हजार रुपये अशी एकूण ९ लाख ३० हजार रुपयांची जप्ती करण्यात आली.



या प्रकरणात शेख रिझवान अब्दुल शहादत (वय ४१), शोहेब खान अफसर खान (वय २४) आणि फारुख खान अफसर खान पठाण (वय ३०) या तिघांविरुद्ध कारवाई करण्यात आली. वाहनांमध्ये बैलांना दाटीवाटीने बांधून ठेवण्यात आले होते. त्यांच्या चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने वाहतूक केली जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी सहाही बैलांची सुटका केली. सुटका करण्यात आलेल्या बैलांना दस्तूरनगर चौकातील गौरक्षण संस्थेत (नोंदणी क्रमांक १२) संरक्षण व देखभालीसाठी ठेवण्यात आले आहे. या पथकात पोलीस निरीक्षक रीता उईके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार इशा खांडे (ब.नं. १२०५), पोलीस अंमलदार पंकज येवले (४९९), सोमनाथ घोलप (६९७), अमरदीप सोळंके (६७८) आणि निशांत पंधरे (३५९) यांनी ही कारवाई केली.

देविदासजी चौधरी यांचे निधन



कुऱ्हा- अंजनवती येथील जेष्ठ नागरिक तथा जेष्ठ वारकरी देविदास लक्ष्मणराव चौधरी यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी रविवार ८ नोव्हेबर ला प्रदीर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुषा जावाई, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

मराठा पाटील कुणबी समाजभूषण पुरस्काराने ॲड. अमोल ठाकरे सन्मानित



अमरावती/का.प्र.

शिव संभाजी स्वराज्य प्रतिष्ठान, अमरावती यांच्या वतीने आयोजित डमराठा पाटील कुणबी समाज परिचय मेळावा व वधू-वर संमेलन अभियंता भवन, शेगाव नाका, अमरावती येथे झाला. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवून समाजाची मान उंचावणाऱ्या निवडक व्यक्तींचा 'समाजभूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये अमोल अरुण ठाकरे यांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'मराठा पाटील कुणबी समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सागरदादा देशमुख होते, तर उद्घाटन आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आ. रवी राणा, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, मनपा उपमहापौर मनोज भेंडे, युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश साबळे, निलेश उभाड आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल ॲड. अमोल ठाकरे यांनी शिव संभाजी स्वराज्य प्रतिष्ठानचे आभार मानले असून, समाजाचे त्रृण फेडण्यासाठी सदैव तत्पर राहीन, अशी भावना व्यक्त केली. त्यांच्या या गौरवाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या हस्ते स्वप्नील केवदे यांचा गौरव!

कुऱ्हा/वार्ताहर

संकटाच्या क्षणी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दुसऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी धावून जाणे हीच खरी माणुसकी आणि समाजसेवेची ओळख आहे.अशाच धाडसी आणि प्रसंगावधान राखणाऱ्या कौंडण्यपूर येथील नाव चालक स्वप्नील केवदे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कुऱ्हा पोलीस स्टेशनच्या वतीने तक्रार निवारण दिन व 'ऑपरेशन कवच' अंतर्गत आयोजित शांतता समितीच्या बैठकीत हा गौरव सोहळा पार पडला.

गणेश विसर्जन आणि दुर्गा विसर्जनाच्या काळात कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासमोरील वर्धा नदीच्या घाटावर मोठ्या संख्येने भाविक विसर्जनासाठी येत असतात. यावेळी नदीपात्रातील परिस्थिती धोकादायक बनण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी नाव चालक स्वप्नील केवदे यांनी प्रसंगावधान राखत अनेक भाविकांना मदतीचा हात देऊन त्यांचे प्राण वाचविले. त्यांच्या या धाडसी कार्यामुळे अनेक कुटुंबांवर ओढवणारे संकट टळले.

स्वप्नील केवदे यांनी दाखविलेली तत्परता, धाडस आणि सामाजिक बांधिलकी ही समाजातील इतर युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे कौतुक यावेळी करण्यात आले. समाजात शांतता व सुरक्षितता राखण्याबरोबरच संकटकाळी नागरिकांच्या मदतीला धावून जाणाऱ्या अशा व्यक्तींचा सन्मान होणे गरजेचे असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम, पत्रकार अशोक पवार, चांदूर रेल्वेचे उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश तातोड, स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रामीणचे दीपक लांडे, कुऱ्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिवहरी सरोदे, प्रविण बाखडे, अनिल निंघोट, सागर निमकर आदी मान्यवर उपस्थित



होते. स्वप्नील केवदे यांच्या या निस्वार्थी आणि धाडसी कार्याचा पोलीस प्रशासनाकडून झालेला गौरव कौंडण्यपूरसह परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे. खऱ्या अर्थाने माणुसकी जपणाऱ्या या युवकाच्या कार्यामुळे 'माणुसकी अजूनही जिवंत आहे' याची प्रचिती आली आहे.

शिराझगाव मोझरीत ५० वर्षांची नाट्य परंपरा

तिवसा- तालुक्यातील शिरजागाव मोजारी गावने यांची केवळ ५० वर्षे जुनी नाट्य परंपरा आजही जिवंत ठेवण्यात आली आहे. जुन्या रुझविले नाट्यकलेचा वारसा नव्या पिढीकडून त्याच उत्साहाने पुढे नेला जात आहे. १२ नोव्हेंबर रोजी, गवतील थिएटर ड्रामा ग्रुपच्या वतीने रोझी यशवंत मान लिखित 'चौथारा' हे नाटक सादर केले जाईल. तिवासा तालुक्यातील शिरजागाव मोजारी गाव 'पंचक्रोशित शिरजागाव दांडर' म्हणून ओळखले जाते. गावातील नाट्य कलेची परंपरा १९७२ मध्ये 'मच्छिंद्रनाथ' किंवा 'नाटकाच्या' सादरीकरणाने सुरू झाली. या दरम्यान गवतील कलावंतनी यांनी अनेक नाटके सादर केली.

गेल्या पाच दशकांत अनेक कलाकारांनी आपल्या अभिनयातून सांस्कृतिक गौरव प्राप्त करून दिला आहे. यावर्षी, रोझी यांच्या सन्मानार्थ १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या 'चौथारा' या नाटकाचे दिग्दर्शन ज्येष्ठ नाट्य कलाकार आणि मार्गदर्शक विठ्ठल गिरी करणार आहेत. सचिन सोनटक्के, नीलेश गिरी, अमोल वावरे, तुषार वाघ, निखिल अंबुलकर, प्रवीण पाचगरे, गणेश गाडगे, अतुल डफ, शेख सलीम, पूजा देशमुख, कोमल मोंढे आणि चैताली वावगे या नाटकात भूमिका साकारत आहेत. नाट्य परंपरा कायम ठेवण्यासाठी मंचर नाटय समूहाचे अध्यक्ष नरेश येरणे यांच्यासह शंकर हगवणे, संदीप हगवणे, नंद किशोर घाटोळ, चंदू वानखडे, किशोर वाघ, बंडू खवळे, चेतन मात्रे, रोशन जोल्हे, आशिष जोल्हे, प्रकाश बन्सोड, शेख वाशिम संस्थेचे अनेक सहकारी लाभ घेत आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मोर्शीत ३५ लाखांचा गुटका जप्त

मध्यप्रदेशातून तस्करी, ट्रकसह ५५.०९ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

चालकाला अटक, तिघांविरुद्ध गुन्हा



मोर्शी/प्रतिनिधीः-
प्रतिबंधित गुटख्याची मध्यप्रदेशातून अमरावती जिल्ह्यात तस्करी करण्यासाठी वापरण्यात येणारा ट्रक मोर्शी पोलिसांनी पकडला. ट्रकमधून तब्बल ३५ लाख ९ हजार रुपये किमतीचा गुटखा आढळून आला. पोलिसांनी गुटख्यासह ट्रक असा एकूण ५५ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, ट्रकचालकाला अटक केली आहे. या प्रकरणात गुटख्याचा पुरवठा आणि वितरण साखळीतील अन्य तिघांविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटका, पानमसाला,सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थांची निर्मिती,साठवणूक, वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या अवैध व्यवसायाला प्रोत्साहन देणारे,वाहतुकीस मदत करणारे तसेच विक्री व वितरणामध्ये सहभागी असणाऱ्या व्यक्तींनाही कायद्याच्या कक्षेत आणण्यात येणार असून नागरिकांनी अशा अवैध प्रकारांची माहिती पोलिसांना द्यावी.

-राहुल आठवले, ठाणेदार मोर्शी.

मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा ट्रकमधून जिल्ह्यात आणला जात असून, त्याची विविध ठिकाणी विक्री केली जाणार असल्याची माहिती विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, अमरावती परिक्षेत्र येथे कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश देशमुख यांना मिळाली होती. त्यांनी ही माहिती तातडीने मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांना दिली. त्यानंतर पोलिसांनी संशयित ट्रकचा शोध घेण्यासाठी नाकाबंदी सुरू केली. दरम्यान, एमएच १९ सी ०९८२ क्रमांकाचा ट्रक येताना दिसताच पोलिसांनी तो थांबवून तपासणी केली. ट्रकमध्ये प्रतिबंधित गुटख्याचा ☞(पान २ वर)







दीपावली स्नेहभेट

अमरावती : प्रहार चे संस्थापक तथा शिवसेनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी दीपावली निमित्त दै.जनमाध्यमचे संपादक प्रदीप देशपांडे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी जनमाध्यम दीपावली २०२६ विशेषांकाचे अवलोकन करून शुभेच्छा दिल्या. तसेच घरगुती फराळाचा देखील आस्वाद घेतला. अंक संचालक अभिराम देशपांडे यांचे देखील अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध राजकीय,सामाजिक विषायावर चर्चा देखील करण्यात आली.

दिवाळीनंतर चोरट्यांचा शहरात धुमाकूळ

तीन बंद घरातून लाखोंचा ऐवज लंपास

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळीनंतर अज्ञात चोरट्यांनी शहरात बंद घरांना लक्ष्य करून लाखोंचा ऐवज लंपास केला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अराफात कॉलनी, अफान पार्क आणि मोरबाग परिसरात वेगवेगळ्या घटनामध्ये लाखोंचा मुद्देमाल लंपास झाल्याच्या तक्रारी पोलिसांत आज दाखल करण्यात आल्या आहेत.एकाच रात्रीत तीन ठिकाणी झालेल्या या चोऱ्यांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिवाळी नंतर चोरट्यांचे धाडस वाढल्याचे दिसून येत आहे. नागरिकांनी पोलिसांकडे रात्रीची गस्त वाढवण्याची आणि या चोरीच्या घटनांचा तात्काळ छडा लावण्याची मागणी केली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

पहिली घटना मोरबागमध्ये अमेय सुनील इंगोले यांच्या दुकानात घडली. इंगोले आज सकाळी दुकानावर पोहोचले असता, सगळे सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तपासणी केली असता ८० हजार रोख, चांदीचे २५ सिक्के, सोन्याचा १० ग्रॅमचा सिक्का, टायटन कंपनीच्या दोन घड्याळी, शेजारील दुकानातून ३० हजार नगदी आणि चांदीचे ६ सिक्के चोरीला गेल्याचे लक्षात आले.

चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून ही चोरी केली. त्यांनी तात्काळ सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. पोलीस घटनास्थळी पाहणी केली असून, आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या घटनेमुळे मोरबागमध्ये खळबळ उडाली आहे.

यासह नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलगांव रोडवरील अराफात कॉलनीमध्ये राहणारे शिक्षक मो. फैसल शेख रहीम हे सहकुटुंब बाहेरगावी गेल्याचा फायदा चोरट्यांनी घेतला. आज मो. फैसल घरी परतले असता, कपाटाचे कुलूप तुटलेले दिसले. तपासणी केली असता एक लाख रुपयांची नगद रक्कम चोरीला गेल्याचे आढळून आले. त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

अन्य एक घटना अफान पार्कमध्ये मो. इमरान यांच्या घरी घडली. ३२ वर्षीय इमरान हे घरी परतले असता, घरातून ३० हजार रुपयांची रोख आणि ९ ग्रॅम सोने गायब असल्याचे दिसले. चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून ही चोरी केल्याचे समोर आले आहे.

भाऊबीजेच्या दिवशी विवाहितेने केली आत्महत्या

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- भाऊबीज सारख्या पवित्र सणाच्या दिवशी शहापूर गावात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. येथील २५ वर्षीय विवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती समोर येताच गावात सणाचा आनंद शोकात बदलला आहे.

शारदा दिनेश चौधरी (वय २५, रा. शहापूर) असे मृत महिलेचे नाव आहे. शारदा आपल्या मागे पती आणि दोन निरागस चिमुकल्या मुलींना सोडून गेली आहे. माहितीनुसार, भाऊबीजच्या दिवशी शारदा चौधरी हिने घरात कोणी नसताना गळफास घेऊन आपले जीवन संपवले. काही वेळाने कुटुंबातील सदस्य घरी परतले असता ही धक्कादायक घटना उघडकीस आली. कुटुंबीयांनी तात्काळ तिला खाली उतरवून रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. भाऊबीजच्या दिवशी घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण गावत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शारदा हिने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे वास्तविक कारण अद्याप समोर आलेले नाही. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, घरात कोणताही मोठा वाद नव्हता. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी पोलिस कुटुंबीय आणि नातेवाईकांचे जबाब नोंदवत आहेत.

ऑटो चालक अफजलची ईमानदारी

रोख व दागिने असलेली पर्स महिलेला केली परत




चांदूरबाजार/प्रतिनिधीः- चांदूर बाजार तालुक्यातील तालुक्यातील ऑटो चालक शेख अफजल शेख उस्मान यांनी ईमानदारी आणि माणूसकी आजही जीवंत असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी रोख आणि दागिनेने भरलेली बॅग महिलेला परत केली. माहिती नुसार, मालीपुरा निवासी एक महिला स्थानिक बस डेपोतून अफजल यांच्या ऑटो मध्ये बसून गेली होती. अफजल यांनी महिलेला तिच्या घरी सोडले आणि परत बस स्टँडवर परत आले. यावेळी त्यांची नजर ऑटोच्या मागच्या सीटवर पडलेल्या एका पर्सवर पडली. पर्समध्ये महिलेचे मौल्यवान सामान ठेवलेले होते.अफजल यांनी कोणताही लोभ न करता पर्स तिच्या मालकिणी पर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला आणि महिलेच्या घरी पोहोचून ती पर्स परत केली. कविता यावतकर यांची ती पर्स होती.या पर्समध्ये ५ हजार रुपये रोख, २० हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि सुमारे २ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने होते. आपला संपूर्ण ऐवज सुरक्षितपणे परत मिळाल्याने कविता भावुक झाल्या. त्यांनी ऑटो चालक शेख अफजल शेख उस्मान यांचे आभार मानले.अफजल यांच्या या ईमानदार आणि सराहनीय कार्याची परिसरात प्रशंसा होत आहे. त्यांनी सिद्ध करून दाखवले की, आजही समाजात ईमानदारी आणि मानवता जिवंत आहे.

वलगांव टी-पॉईंटवर गोवंश तस्करीचा पर्दाफाश

तीन आरोपी ताब्यात,६ जनावरांना जीवदान

अमरावती/प्रतिनिधीः- गोवंशाला अवैधरित्या कत्तलीसाठी नेण्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. मंगळवारी रात्री गस्ती दरम्यान वलगाव पोलिसांनी वलगांव टी-पॉईंटवर सापळा रचून गोवंशाने भरलेले तीन लोडिंग वाहने पकडली. या कारवाईत पोलिसांनी तीन चालकांना अटक करून ६ गोवंशाला सुरक्षितपणे मुक्त केले आहे. वाहने आणि जनावरांसह एकूण ९ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पकडण्यात आलेल्या आरोपींची ओळख



शेख रिझवान अब्दुल शहादत (वय ४१), शोएब खान अफसर खान (वय २४, दोघे रा. रिद्धपूर) तथा फारूक खान अफसर खान पठाण (वय ३०, रा. शनिवारपेठ, वरुड) अशी झाली आहे.

माहितीनुसार, मंगळवारी रात्री वलगाव ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल इशय खांडे आपल्या पथकासह पेट्रोलिंग करत होते. त्याचवेळी त्यांना खबऱ्याकडून पक्की माहिती मिळाली की, तीन लोडिंग ऑटोमधून अवैधरित्या गोवंशाची वाहतूक केली जात आहे. माहिती मिळताच पोलीस पथकाने तात्काळ वलगाव टी-पॉईंटवर नाकाबंदी केली. काही वेळातच संशयास्पद अवस्थेत एकामागोमाग एक येणाऱ्या तीन वाहनांना पोलिसांनी थांबवले. झडती घेतली असता प्रत्येक वाहनात क्रूरपणे बांधलेले दोन-दोन गोवंश आढळून आले. पोलिसांनी तिन्ही वाहनांमधून एकूण ६ गोवंशाला सुरक्षितपणे बाहेर काढले आणि त्यांना देखरेखीसाठी नांदगावपेठ येथील गोरक्षण संस्थेकडे सुपूर्द केले. वलगाव पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा तथा इतर संबंधित ☞(पान २ वर)

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

अमरावती/प्रतिनिधीः- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. दौऱ्यानुसार, बावनकुळे दुपारी ३.१५ वाजता भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१व्या जयंती व दिवाळी निमित्त निमगुंड, ता. अचलपूर येथे आदिवासी कोरकू बांधवांची भेट घेतील. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता वडरपुरा, अमरावती येथे कामगार, मजूर, आदिवासी, गरजू शेतकरी व शेतमजूरांसोबत 'दिवाळी मिलन' कार्यक्रमात सहभागी होतील. सायंकाळी ७ वाजता अमरावती येथून नागपूरकडे रवाना होतील.



जबरी चोरीचा गुन्हा उघड, दोन हद्दपार आरोपी ताब्यात

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील जबरी चोरी, घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास तसेच हद्दपार आरोपींवर कारवाई करण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाने जबरी चोरीच्या गुन्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले, तर दोन हद्दपार आरोपींना पकडले. यातील एका आरोपीकडून कोयता आणि घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे गुन्हे शाखेने तीन वेगवेगळ्या प्रकरणांत महत्त्वाची कामगिरी केली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील जबरी चोरी, घरफोडी तसेच हद्दपार आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय बातमीदारांकडून माहिती संकलित करून ही कारवाई केली. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे पथक करीत होते. दरम्यान, ११ नोव्हेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे या गुन्ह्यातील विधिसंघर्षग्रस्त बालक मालटेकडी परिसरात असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने घटनास्थळी धाव घेत संबंधित बालकाला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता खिशात वन प्लस कंपनीचा मोबाईल आढळला. विश्वासात घेऊन चौकशी केली असता, काही दिवसांपूर्वी फरशी स्टॉप परिसरातून एका व्यक्तीचा मोबाईल जबरीने हिसकावल्याची माहिती त्याने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्याकडून १० हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त करून ☞(पान २ वर)

कोकर्ड्यातील आमरण उपोषणाची लेखी आश्वासनानंतर सांगता



खाल्लार/प्रतिनिधीः- कोकर्डा परिसरातील प्रलंबित विकासकामे आणि शेतकऱ्यांच्या विज समस्यांसह विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या साखळी उपोषणानंतर युवकांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाची आज (दि.११)सांगता झाली. आमदार गजानन ☞(पान २ वर)

प्रवेशद्वार कोसळल्या प्रकरणी दोन कंत्राटदारांवर गुन्हा दाखल

रामपुरी कॅम्प परिसरातील घटना -एनओसी शिवाय सुरू होते काम

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील रामपुरी कॅम्प परिसरात निर्माणाधीन असलेल्या सच्चूराम प्रवेशद्वाराचा स्लॅब कोसळून चार मजूर जखमी झाले असून, त्यांच्यावर इर्विन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन गाडगेनगर पोलिसांनी आज बुधवार ११ नोव्हेंबर रोजी दोन्ही कंत्राटदाराविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस तपासात समोर आले आहे की, बांधकामासाठी वाहतूक पोलिसांकडून आवश्यक ना



हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले नव्हते. तसेच कामाच्या ठिकाणी मजुरांच्या सुरक्षेची कोणतीही पक्की व्यवस्था करण्यात आली नव्हती. ना हेल्मेट, ना सेफ्टी बेल्ट, ना बॅरिकेडिंग, मजूर अशाच अवस्थेत २२ फूट उंचीवर काम करत होते. पोलिसांनी कंत्राटदार पंकज जितेंद्र शर्मा (रा. रायली प्लॉट) आणि आदित्य धनराज गुप्ता (रा. साईनगर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोप आहे की, मंगळवारी संध्याकाळी सुमारे २२ फूट उंच स्लॅब अचानक कोसळल्या नंतर दोन्ही कंत्राटदार घटनास्थळी पोहोचले होते, मात्र स्थानिकांचा रोष पाहून तेथून पळ काढला.या अपघातात मोहम्मद एहफाज मोहम्मद सईद (वय २०, वलगाव रोड), जमीर खान शमशेर खान पठाण (वय ३२, मुस्कान नगर), ☞(पान २ वर)

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त विद्यापीठातर्फे

आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धा

अमरावती/प्रतिनिधीः- भगवान बिरसा मुंडा जयंती अर्थात जनजातीय गौरव दिवसाच्या निमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आदिवासी अध्यासन केंद्र आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन १४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या प्रेरणा व प्रोत्साहनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, स्पर्धेचा मुख्य विषय ' आदिवासी अभिमान : इतिहास, अस्मिता आणि भविष्य ' हा आहे.

भारतातील आदिवासी समाजाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, सद्यस्थितीतील आव्हाने आणि भविष्यातील आकांक्षा यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये चिंतन, संशोधन व लेखनाची आवड निर्माण करणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे. विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. सदर निबंध मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषांमध्ये सादर करावा . स्पर्धेसाठा ☞(पान २ वर)

माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यवतमाळकरांशी साधणार संवाद

१५ नोव्हेंबरला व्याख्यान

यवतमाळ/प्रतिनिधीः- सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश डॉ. धनंजय यशवंत चंद्रचूड हे १५ नोव्हेंबर रोजी यवतमाळकरांशी संवाद साधणार आहेत. विद्या प्रसारक मंडळ संचालित स्वतंत्रता सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ यांच्या वतीने आयोजित 'स्वातंत्र्य संग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा स्मृती व्याख्यानमाले'त त्यांचे 'कायदा आणि न्यायशास्त्र' या विषयावर व्याख्यान होणार आहे. रविवारी सायंकाळी ५ वाजता येथील गोधनी रोडवरील अमोलकचंद महाविद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम होईल.



या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळनकर आणि यवतमाळचे जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद एल. यावलकर यांचीही प्रमुख उपस्थिती राहील. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा लोकमत मीडिया समूहाचे चेअरमन, माजी खासदार डॉ. विजय दर्डा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. कायदा, न्यायव्यवस्था, न्यायशास्त्र तसेच बदलत्या सामाजिक परिस्थितीत न्यायसंस्थेची भूमिका या विषयांवर डॉ.चंद्रचूड ☞(पान २ वर)

कमलाबाई शर्मा यांचे निधन

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- येथील दैनिक लोकमत समाचार चे तालुका प्रतिनिधी अतुल शर्मा यांच्या मातोश्री कमलाबाई केदारप्रसादजी शर्मा (वय ७७) यांचे आज बुधवारी दुपारी एक वाजता निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा दोन मुली सुन,नातवंड असा परिवार आहे. गुरुवारी (दि.१२) सकाळी नऊ वाजता त्यांच्या नेहरू नगर निवासस्थान येथून अंत्ययात्रा निघेल.



दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या मदतीला शिवसेना!

बच्चू कडुंच्या पुढाकाराने दर्यापुरात पहिले शेतकरी सेवा केंद्र

खल्लार/प्रतिनिधीः- येत्या काळात दुष्काळाचे संभाव्य सावट लक्षात घेता शिवसेना (शिंदे गट) यांच्या वतीने राज्यभरातील शहर व तालुका स्तरावर शेतकरी सेवा केंद्र उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाची सुरुवात अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथून आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत आज (दि.११) पासून करण्यात आली. या मदत केंद्राच्या माध्यमातून शेतकरी, दिव्यांग, अपंग तसेच एकल महिलांसह संकटग्रस्त घटकांची गावनिहाय



यादी तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची नोंद घेऊन त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी शिवसेना पुढाकार घेणार आहे.

केवळ राजकारण न करता संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी उभे राहणे हीच आमची भूमिका आहे. येणाऱ्या काळात शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी मजबुतीने उभी राहील आमदारांना पगारच नाही तर वाहन भत्ते सुद्धा देण्यात येऊ नये, हा सर्व खर्च दिव्यांग अपंगांकरिता खर्च करायला पाहिजे अशी ठाम प्रतिक्रिया आमदार बच्चू कडू यांनी मीडीया समोर बोलताना दिली. या कार्यक्रमाला शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.